आजचा सामना
कोलकाता नाईट रायडर्स वि. लखनौ सुपर जायंटस्
वेळ : दुपारी ३.३० वाजता
ठिकाण : कोलकाता

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आजचा सामना
पंजाब किंग्ज वि. चेन्नई सुपर किंग्ज
वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : मुल्लानपूर

सोलापूर | मंगळवार, ८ एप्रिल २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १५० | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



नित्य ठरलेल्या वेळी आणि निश्चित स्थानावर नेहमी भेटणे, मातृभूमीबद्दल समान विचार, समान स्मरण, समान प्रार्थना करणे हे सर्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यपद्धतीचे आवश्यक भाग आहेत. संघाची प्रार्थना आत्मसात करण्याचा अर्थ म्हणजे संघाचे विचार आणि भाव आत्मसात करणे हा होय.
**- कुप्पू. सी. सुदर्शनजी,**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

## चैत्री एकादशीनिमित्त

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.७ एप्रिल -**

चैत्री यात्रेनिमित्त श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर, मंदिर परिसर, श्रीसंत तुकाराम भवन व श्रीसंत ज्ञानेश्वर दर्शन मंडप या ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

'श्री' च्या गाभा-यावरील कळसास रोषणाई करण्यात आली असल्याने भाविक कळस दर्शना बरोबर विद्युत रोषणाईचा आनंद घेत आहेत. संपूर्ण परिसर प्रकाशमय झाला आहे. मंदिरावरील ही विद्युत रोषणाई श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीमार्फत करण्यात आली असून याची जबाबदारी विभाग प्रमुख शंकर मदने यांना देण्यात आली आहे.

यासाठी एलईडी माळा, लटकन, तोरणे, रोप लाईट, आर्टीकल, व्हाईट व वॉर्म फोकस इत्यादी अत्याधुनिक साधनांचा वापर करण्यात आला आहे. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने देखील अत्याधुनिक मशिनरी बसविण्यात आलेल्या आहेत.




## महत्त्वाचे

### अमेरिकी सुप्रीम कोर्टाने फेटाळली तहव्वूरची याचिका

**न्यू यॉर्क :** भारतात होणाऱ्या प्रत्यार्पणाला स्थगिती दिली जावी, अशी मागणी करीत मुंबई हल्ल्याचा कटकर्ता तहव्वूर राणाने दाखल केलेली याचिका अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. मूळचा पाकिस्तानी आणि सध्या कॅनडाचे नागरिकत्व असलेल्या तहव्वूर राणाला सध्या लॉस एंजेलिसच्या मेट्रोपॉलिटिन डिटेन्शन सेंटरमध्ये ठेवण्यात आले आहे. प्रलंबित खटल्याला स्थगिती देण्यासाठी राणाने २७ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या असोसिएट जस्टिस आणि नवव्या सर्किट न्यायाधीश एलेना कागन यांच्याकडे याचिका दाखल केली होती. या महिन्याच्या सुरुवातीला कागन यांनी राणाची एक याचिका फेटाळली होती. त्यानंतर राणाने कागन यांच्याकडे पुन्हा प्रत्यार्पणाला स्थगिती देण्यासाठी आपत्कालीन याचिका दाखल केली होती.

# स्वयंपाकाच्या गॅसचा भडका

## अबकारी करात वाढ होऊनही पेट्रोल, डिझेल स्थिर

◆ **नवी दिल्ली, ७ एप्रिल**

केंद्र सरकारने सोमवारी पेट्रोल आणि डिझेलच्या अबकारी दरात प्रत्येकी दोन रुपये लिटरप्रमाणे वाढ केली. असे असले तरी, या दोन्ही इंधनांच्या किमतीत कुठलीही वाढ होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. सोबतच घरगुती गॅस सिलेंडरच्या किमतीत ५० रुपयांनी वाढ करण्यात आली आहे.

केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी याबाबतची माहिती दिली. अबकारी करात प्रत्येकी २ रुपयांची वाढ झाल्यामुळे पेट्रोलवरील अबकारी कर प्रतिलिटर १३ रुपये, तर डिझेलवरील अबकारी दर १० रुपये झाला आहे.

गॅस सिलेंडरवरील अबकारी करातील वाढ सामान्य तसेच सबसिडीवाल्या सिलेंडरवरही लागू होणार आहे. ५० रुपये वाढीमुळे पंतप्रधान उज्ज्वला योजनेतील सिलेंडरची किंमत ५०० रुपयांवरून ५५० रुपये तर सामान्य श्रेणीतील सिलेंडरची किंमत ८०३ रुपयांवरून ८५३ रुपये होणार आहे. याच महिन्याच्या १ तारखेला सरकारने व्यावसायिक वापराच्या सिलेंडरच्या किमतीत ४१ ते ४५ रुपयांनी घट करण्याचा निर्णय घेतला होता.

अबकारी करातील दरवाढीचा बोझा पेट्रोलियम कंपन्या ग्राहकांवर टाकणार नसल्याचे सरकारने स्पष्ट केले. आज मध्य गॅस सिलेंडरवरील दरवाढ लागू होणार आहे. अबकारी दरातील वाढीमुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत कोणताही बदल होणार नाही, याची दक्षता



घेण्याच्या सूचना पेट्रोलियम मंत्रालयाने सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांना दिल्या आहेत, असे पुरी यांनी सांगितले. अबकारी दरातील वाढीचा येत्या काही आठवड्यांत आम्ही पुन्हा आढावा घेऊ, असे ते म्हणाले. जागतिक पातळीवर तेलाच्या किमतीत होत असलेले चढउतार तसेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टेरिफ धोरणामुळे सरकारला हा निर्णय घ्यावा लागल्याचे समजते. *(तभा वृत्तसेवा)*

# सीमांच्या संरक्षणासाठी इलेक्ट्रॉनिक्स प्रणाली

◆ **जम्मू, ७ एप्रिल**

देशाच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी सरकार इलेक्ट्रॉनिक देखरेख प्रणाली तैनात करीत आहे आणि जम्मू-काश्मीरमध्ये अतिरेक्यांची घुसखोरी रोखण्यासाठी भूमिगत सीमापार बोगदे शोधण्यासाठी आणि ते पाडण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी सांगितले.

कठुआ जिल्ह्यातील हिरानगर सेक्टरमधील आंतरराष्ट्रीय सीमेजवळील सीमा चौकी 'विनय'ला भेट देताना बीएसएफ कर्मचाऱ्यांना संबोधित करताना शाह यांनी बीएसएफ जवानांच्या योगदानाचे आणि आव्हानात्मक परिस्थितीत कर्तव्य बजावल्याबद्दल जवानांचे कौतुक केले.

आम्ही सीमेवर इलेक्ट्रॉनिक देखरेख प्रणाली तैनात करीत आहोत. त्याचे दोन मॉडेल असतील. शत्रूच्या बाजूने काहीही घडले तर तुम्ही त्वरित प्रत्युत्तर देऊ शकाल, असे अमित शाह म्हणाले. तंत्रज्ञानामुळे सुलभता वाढण्यासही मदत होईल आणि त्याच वेळी भूमिगत बोगदे हुडकून काढण्यासाठी आणि ते पाडण्यासाठी तांत्रिक साधने वापरली जातील, अशी माहिती त्यांनी दिली. *(वृत्तसंस्था)*




सिक्कीममधील चीनच्या सीमेवर असलेल्या आणि बाराही महिने हिमनगांनी वेढलेली डोकलाम चौकी आता प्रकाशाने उजळली आहे. कारण, डोकलाम हे सीमेवरील पहिले गाव आहे जेथे आता वीज पोहचली आहे

# छत्तीसगडमध्ये २६ नक्षली शरण

◆ **दंतेवाडा, ७ एप्रिल**

छत्तीसगडमधील दंतेवाडा जिल्ह्यात २६ नक्षलवाद्यांनी सोमवारी सुरक्षा दलांसमोर शरणागती पत्करली. यापैकी तीन जणांच्या शिरावर बक्षीस जाहीर करण्यात आले होते, अशी माहिती पोलिसांनी दिली.

माओवाद्यांच्या पोकळ आणि अमानवी विचारसरणीचा तसेच जंगलामध्ये सातत्याने लढण्याचा कंटाळा आल्याने नक्षलवाद्यांनी केंद्रीय राखीव पोलिस दल अर्थात् सीआरपीएफच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर शरणागती पत्करली, अशी माहिती दंतेवाडाचे पोलिस अधीक्षक गौरव राय यांनी दिली.

शरणागती पत्करलेले नक्षलवादी जनमिलिशिया, क्रांतिकारी पक्ष समिती आणि माओवाद्यांच्या जनताना सरकार शाखा आणि दंडकारण्य आदिवासी किसान मजदूर संघटना तसेच चेतना नाट्य मंडळीसारख्या त्यांच्या फ्रंटल युनिट्सचे सदस्य होते.

आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांपैकी राजेश कश्यप हा आमदई क्षेत्र जनमिलिशिया कमांडर म्हणून सक्रिय होता आणि त्याच्यावर तीन लाख रुपयांचे बक्षीस होते, तर जनता सरकार पथकाचा प्रमुख कोसा मडावी आणि सीएनएमचा सदस्य छोटू कुंजमवर अनुक्रमे एक लाख आणि ५० हजार रुपयांचे बक्षीस होते, असे अधिकाऱ्याने सांगितले. *(वृत्तसंस्था)*

### ट्रम्प टेरिफसमोर तैवान, व्हिएतनामचे लोटांगण!

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगभरातील १८० देशांवर टेरिफची घोषणा केल्यावर आता अनेक देश त्यावर उतारा शोधण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. त्याचाच भाग म्हणून टेरिफच्या घोषणेनंतर जगभरातील जवळपास ५० देशांनी व्हाईट हाऊसशी संपर्क साधला. तैवान, व्हिएतनाम या देशांनी तर ट्रम्प टेरिफसमोर लोटांगण घालत व्यापारी चर्चेसाठी अमेरिकेच्या सर्व वस्तुंवरील शुल्क पूर्णतः रद्द करण्याचीही तयारी दर्शवली आहे.



## बंगळुरूने मुंबईला नमविले

**मुंबई, दि. ७ एप्रिल-**

आयपीएल २०२५ मध्ये सोमवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने मुंबई इंडियन्सवर १२ धावांनी रोमांचक विजय मिळवला. बंगळुरूने १० वर्षांनी वानखेडे स्टेडियमवर मुंबईला हरवले. त्यांना शेवटचा विजय २०१५च्या हंगामात मिळाला होता.

मुंबईने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. बंगळुरूने२० षटकांत ६ गडी गमावून २२१ धावा केल्या. प्रत्युत्तरात मुंबईला २० षटकांत ९ बाद २०९ धावाच करता आल्या. कर्णधार हार्दिक पंड्या (४२) आणि तिलक वर्मा (५६) यांनी ३४ चेंडूत ८९ धावांची भागीदारी करून संघाला धावांचा पाठलाग करण्यास मदत केली. परंतु हे दोघे बाद झाल्यानंतर मुंबईने लगेचच सामना गमावला. बंगळुरूकडून कृणाल पंड्याने ४ विकेट्स घेतल्या. यश दयाल आणि जोश हेझलवूड यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या.

बंगळुरूकडून विराट कोहली (६७ धावा) आणि कर्णधार रजत पाटीदार (६४ धावा) यांनी अर्धशतके झळकावली. जितेश शर्माने नाबाद ४० आणि देवदत्त पडिक्कलने ३७ धावांचे योगदान दिले. ट्रेंट बोल्ट आणि हार्दिक पंड्याने प्रत्येकी २ विकेट घेतल्या. विघ्नेश पुथूरने एक विकेट घेतली.

# स्वत:वर गोळी झाडलेल्या आयुक्तांना एयरलिफ्ट करून मुंबईला हलवलं

**लातूर, ७ एप्रिल -**

स्वत:वर गोळी झाडून घेऊन जीवन संपविण्याचा प्रयत्न केलेले महापालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्यावर रविवारी पहाटे तब्बल साडेतीन तास शस्त्रक्रिया करण्यात आली. ते उपचाराला प्रतिसाद देत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. दरम्यान, अधिक उपचारांसाठी आयुक्त मनोहरे यांना आज सकाळी एयरलिफ्ट करून मुंबईला हलविण्यात आले. यासाठी शहरात साडेदहा वाजेच्या दरम्यान, सह्याद्री हॉस्पिटल ते एयरपोर्ट दरम्यान ग्रीन कॉरिडॉर करण्यात आले.



आयुक्त मनोहरे यांनी शनिवारी रात्री ११.१५ वाजेच्या सुमारास बार्शी रोडजवळील शासकीय निवासस्थानी स्वत:च्या डोक्यात बंदुकीने गोळी झाडली होती. उजव्या कानशिलाच्या बाजूने गोळी डाव्या दिशेने आरपार गेली. घटनेच्या वेळी पत्नी, दोन लहान मुले, सुरक्षा रक्षक घरात होते. अगदी पंधरा ते वीस मिनिटांत आयुक्तांना जखमी अवस्थेत सह्याद्री रुग्णालयात दाखल करण्यात आले. आयुक्त मनोहरे यांनी स्वत:वर बंदुकीने गोळी का झाडून घेतली, याचे कारण अद्यापी पोलिस दप्तरी नोंदविलेले नाही. पोलिस कुटुंबीयांशी बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत.

# चिमुकल्यांच्या शिक्षणालाही महागाईचा फटका

**प्राथमिक शाळांच्या शुल्कात ५० ते ८० टक्क्यांनी वाढ**

**तीन वर्षांतील आकडेवारी**

◆ **नवी दिल्ली, ७ एप्रिल**

दिवसेंदिवस शाळांच्या शुल्कामध्ये होत असलेली भरमसाठ वाढ पालकांसाठी चिंतेचा विषय बनली आहे. प्राथमिक शिक्षण महाग होत चालले असून, गेल्या तीन वर्षात देशभरात शाळांनी ५० ते ८० टक्के शुल्कवाढ केली आहे. एका सर्वेक्षणातून ही माहिती समोर आली आहे.

लोकल सर्कलने हा सर्व्हे केला आहे. मुलांच्या शिक्षणाचा खर्च हा पालकांसाठी महत्त्वाचा मुद्दा बनला आहे. कारण दरवर्षी शाळांकडून शुल्क वाढवले जात असून, यापोटी पालकांकडून भरमसाठ वसुली केली जात असल्याचेच चित्र आहे. एक कम्युनिटी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म असलेल्या लोकल सर्कलने यासंदर्भात सर्व्हे केला आहे.

सर्व्हेक्षणामध्ये पालकांनी शुल्काबद्दल वाढ केल्याचे सांगितले. ४४ टक्के पालकांनी सांगितले की त्यांच्या मुलांच्या शाळांनी मागील तीन वर्षात ५० ते ८० टक्के शुल्कवाढ केली आहे. ज्यांची मुले शाळेत शिक्षण घेत आहेत अशा ३१००० पालकांनी या सर्व्हेक्षणामध्ये सहभाग घेतला. देशातील ३०९ जिल्ह्यात हा सर्व्हे करण्यात आला.

शाळांची शुल्कवाढ सगळीकडचाच विषय आहे, पण तामिळनाडू आणि महाराष्ट्र हे राज्य शुल्कवाढीवर लक्ष ठेवतात, असेही या सर्व्हेक्षणात पालकांनी म्हटले आहे.

जेव्हा शाळा सुरू होतात, तेव्हा पालकांवर याचे सगळ्यात मोठे दडपण असते की होणाऱ्या शुल्कवाढीला सामोरे कसे जायचे. कारण खाजगी शाळांमध्ये सर्वच वर्गांचे शुल्कवाढ केली जाते. *(वृत्तसंस्था)*

**सर्वेक्षणातील निष्कर्ष कोणते**

४६ टक्के लोकांनी शाळांच्या शुल्कवाढीसाठी राज्य सरकारांना जबाबदार धरले आहे. तर ४७ टक्के पालकांनी सांगितले की, सरकार या विषयाकडे बघतही नाही. ९३ टक्के पालकांनी सर्व्हेमध्ये सांगितले की, सरकार शाळांच्या शुल्कवाढीवर प्रभावीपणे अंकुश लावत नाही. जर शासनाने मनात आणले तर अगदी लहानपणापासून शिक्षणावरील खर्चाचा विषय निकालात निघेल.

# बिनधास्त खा! हापूसच्या दरात घसरण

### आंबाप्रेमींसाठी पर्वणीचा काळ

◆ **मुंबई, ७ एप्रिल**

एप्रिल महिन्यापासून हापूस आंब्याचा हंगाम मोठ्या प्रमाणात सुरू होतो. मे महिन्यात मोठ्या प्रमाणात हापूस आंबा बाजारात येत असतो. मात्र, यंदा १ एप्रिल ते १० मे पर्यंत मोठ्या प्रमाणात हापूस आंबा बाजारात उपलब्ध झाला आहे. त्यामुळे या एप्रिल महिन्यापासून आंबाप्रेमींना आंबा खाण्यासाठी एक पर्वणीच मिळाली आहे. तसेच, कमी दरात आंब्याचा आस्वाद घेता येणार आहे.

मे महिन्यात आंब्याच्या उत्पादनावर परिणाम होणार असल्याने दर सुद्धा वाढण्याची शक्यता आहे. सध्या हापूस आंब्याच्या एका पेटीला जवळपास ३ हजार ते ४ हजार रुपयांपर्यंतचा बाजार भाव मिळतोय. कोकणातील हापूस आंब्याला १५०० ते ३५०० रुपयांचा दर हा चार डझनाच्या पेटीला मिळत आहे. मे महिन्याच्या १० तारखेपर्यंत हापूस आंब्याचा हंगाम चांगला असल्याने खवय्यांनी याच काळात आंबा खरेदी करावे असे आवाहन व्यापारी वर्गाने केले आहे. हापूस आंब्या सोबतच तोतापुरी, बदामी या जातीचे आंबे सुद्धा बाजारात येऊ लागले आहेत.



नवी मुंबईतील एपीएमसी मार्केटमध्ये हापूस आंब्यांच्या पेट्यांची बंपर आवक झाली आहे. सोमवारी १ लाख हापूस आंब्यांच्या पेट्या एपीएमसीत दाखल झाल्याने दर कमी झाले आहेत. ८० हजार हापूस आंब्याच्या पेट्या कोकणातील रायगड , रत्नागिरी , सिंधुदुर्ग जिल्ह्यातून आल्या आहेत. तर उर्वरित २० हजार पेट्या परराज्यातून आल्या आहेत. यामध्ये कर्नाटक, केरळ राज्यांचा समावेश आहे. कर्नाटकचा हापूस ६० ते १२० रुपये किलोने विकला जात आहे.

कोकणातील हापूस हा आपल्या वेगळ्या चवीसाठी जगभर प्रसिद्ध असून त्याला जगभरातून मोठी मागणी आहे. नैसर्गिक संकट आणि असंख्य आव्हाने पेलत हापूस आंबा आता सातासमुद्रापार पोहोचला आहे. कोकणातील प्रमुख शहरांमध्ये हापूसला योग्य दर मिळाला नसला तरी आखाती देशात हापूस आंब्याला चांगला दर मिळत आहे. फळ बाजारात हापूसची आवक वाढत असून, परदेशातून देखील हापूसची मागणी वाढत आहे. त्यामुळे याचा फायदा कोकणातील आंबा बागायतदारांना होणार आहे. *(वृत्तसंस्था)*

# तुम्हीच खरे वकील आहात का?

### न्या. नागरत्ना पडल्या संभ्रमात

◆ **नवी दिल्ली, ७ एप्रिल**

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात् एआयशी संबंधित एका प्रकरणात एक वरिष्ठ वकील आभासी माध्यमातून सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी उपस्थित झाले. मात्र, हा क्षण न्यायालयात गोंधळ उडविण्यासाठी कारणीभूत ठरला. आभासी माध्यमातून वकील समोर येताच या प्रकरणाची सुनावणी करणाऱ्या न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी त्यांना, तुम्हीच खरेखुरे वकील आहात ना? असा प्रश्न केला आणि वकील गोंधळात पडले.

न्यायालयाने विचारलेल्या प्रश्नामुळे काही क्षण गोंधळात पडलेले वकील लगेच म्हणाले, मी तुम्हाला खात्री देतो महोदय, मी खराखुरा वकील आहे.

विशेष म्हणजे, अलीकडेच अमरिकेच्या न्यू यॉर्क येथील एका न्यायालयात एआयच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या वकिलाने युक्तिवाद केला होता. याबाबतचे वृत्तही विविध माध्यमांमधून समोर आले होते. तिथेही एआयच्याच मुद्यावर सुनावणी सुरू होती. त्यामुळे संभ्रम निर्माण होऊन न्या. नागरत्ना यांनी या वकिलाला अशी विचारणा केली.

मुला तुमच्या खऱ्या अस्तित्वावर शंका घ्यायची नव्हती, पण न्यू यॉर्कच्या न्यायालयातील प्रकार समोर आल्यानंतर खात्री करून घेण्यासाठी मी तुम्हाला हा प्रश्न विचारला. मला केवळ शहानिशा करायची होती, असे न्या. नागरत्ना यांनी स्पष्ट केले. *(वृत्तसंस्था)*



**काय होता प्रकार?**

न्यू यॉर्क येथील न्यायालयात एआय प्रकरणी सुनावणी सुरू असताना, एका वकिलाने चक्क एआयच्या माध्यमातून आपल्यासारखा दिसणारा कृत्रिम वकील तयार केला आणि या वकिलाने युक्तिवादही केला. काही वेळानंतर न्यायालयाच्या लक्षात हा प्रकार आला आणि न्यायाधीशांनी यावर आक्षेप घेत, वकिलाला चांगलेच खडसावले होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# युद्धाचे नवीन क्षेत्र म्हणून विकसित होतेय् अंतराळ

### सीडीएस अनिल चौहान यांचे प्रतिपादन

◆ **नवी दिल्ली, ७ एप्रिल**

मानवता अशा एका युगाच्या उंबरठ्यावर उभी आहे, जिथे अंतराळ



एक युद्धाचे नवीन क्षेत्र म्हणून उदयास येत आहे, असे प्रतिपादन सीडीएस जनरल अनिल चौहान यांनी सोमवारी येथे केले.

आता अंतराळ संस्कृती विकसित करण्यात यावी, असे त्यांनी ठामपणे सांगितले. यात सिद्धांत संशोधन समर्पित युद्धशाळेच्या विकासाचा समावेश असू शकतो. नजीकच्या भविष्यात सेवा दलांकडे स्वतःची अंतराळ युद्धशाळा असणे महत्त्वाचे आहे, असे इंडियन डिफेन्सस्पेस सिम्पोजियमच्या तिसऱ्या आवृत्तीतील उद्घाटन सोहळ्याला संबोधित करताना अनिल चौहान यांनी सांगितले.



शतकानुशतके सागरी आणि अंतराळ संस्कृती युद्धात महत्त्वाची भूमिका बजावत असताना लष्करी नीतिमत्ता कशी विकसित झाली, हे अधोरेखित करताना अनिल चौहान यांनी म्हटले की, समुद्री संस्कृती किंवा सागरी संस्कृती पोर्तुगीज, स्पॅनिश, इंग्रज किंवा डच लोकांना जगावर वर्चस्व गाजवण्यास मदत करीत असावी. त्याचप्रमाणे एरोस्पेस संस्कृतीमुळे अमेरिका आणि युरोपियन राष्ट्रांनी अंतराळावर वर्चस्व निर्माण केले आणि दोन्ही क्षेत्रांचा युद्धावर कायमचा प्रभाव पडतो.

लष्करी शक्ती प्रत्यक्षात या विशिष्ट संस्कृतीच्या विकासाभोवती केंद्रीत होती आणि त्या दिशेने क्षमता निर्माण करणे महत्त्वाचे आहे, असे अनिल चौहान यांनी स्पष्ट केले. आज आपण अशा युगाच्या उंबरठ्यावर आहोत, जिथे अंतराळ युद्धाचे एक नवीन क्षेत्र म्हणून उदयास येत आहे आणि ते युद्धावर वर्चस्व गाजवणार आहे. युद्धाचे तिन्ही घटक (जमीन, समुद्र, हवा) अंतराळावर अवलंबून असतील, असे चौहान म्हणाले. (वृत्तसंस्था)

### युद्धाचा निकाल सागरी क्षेत्रातच

सागरी क्षेत्रात युद्धाचा विस्तार होत असला, तरी युद्धाचा निकाल सागरी क्षेत्रातच ठरवला जाऊ शकतो किंवा त्याचा जमिनीवरील युद्धावर मोठा प्रभाव पडतो. जेव्हा हवाई शक्ती युद्धाचे एक प्रमुख साधन बनली, तेव्हाही तसेच झाले. एक तर तुम्ही हवाई क्षेत्रात लढाईचा निर्णय घ्या किंवा जमिनीवरील किंवा सागरी क्षेत्रावरील लढाईवर मोठा प्रभाव पडेल, असे अनिल चौहान म्हणाले. ■



कोलंबियाची राजधानी बोगोटा येथील बॉटनिकल गार्डनमध्ये मांसाहारी वनस्पतींचे प्रदर्शन भरले आहे. पहिल्या छायाचित्रात कार्निव्होरस प्रकारातील रोसेरा कॅपेन्सिस वनस्पतीचे पूर्ण वाढलेले फूल दिसत असून दुसऱ्या छायाचित्रात याच रोपट्याच्या पानाने कीटक पकडला आहे. ही वनस्पती प्रामुख्याने दक्षिण आफ्रिकेत आढळते.

# ‘वक्फ’च्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालय करणार सुनावणी

◆ **नवी दिल्ली, ७ एप्रिल**

वक्फ सुधारणा विधेयक-२०२५ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर तातडीने सुनावणी घेण्याचा विचार करण्यास सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी सहमती दर्शवली.

या मुद्यावर आणखी काही याचिका दाखल करण्यात आल्या आडेत आणि त्यावर तातडीने सुनावणी घेण्याची गरज आहे, या जमात उलेमा-ए-हिंदच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी केलेल्या युक्तिवादाची दखल सरन्यायाधीश संजीव खन्ना प्रमुख आणि न्या. संजयकुमार वन्या. के.




व्ही. विश्वनाथन् यांचा समावेश असलेल्या न्यायासनाने घेतली.

सिब्बल यांच्याव्यतिरिक्त ज्येष्ठ विधिज्ञ अभिषेक सिंघवी आणि वकील निझाम पाशा यांनीही दाखल केलेल्या याचिकांवर तातडीने सुनावणी घेण्यात यावी, अशी मागणी केली आहे. तातडीने सुनावणी घेण्याची तोंडी मागणीची प्रथा बंद करणाऱ्या सरन्यायाधीशांनी, तातडीने सुनावणीसाठी न्यायासनासमोर दाखल करण्यासाठी पत्र द्या किंवा मेल पाठवा, असे वकिलांना सांगितले.

ते अगोदरच पाठवले असल्याची माहिती सिब्बल यांनी न्यायालयाला दिला. मी ते पत्र पाहून निर्णय घेईल, असे सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले. खा. असदुद्दिन ओवैसी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर पाशा युक्तिवाद करीत आहे. (वृत्तसंस्था)

# चकमकीत दोन आरोपी, एक पोलिस जखमी

◆ **मेरठ, ७ एप्रिल**

हस्तिनापूर परिसरात पोलिसांशी झालेल्या चकमकीत हत्येचा आरोप असलेले दोन जण जखमी झाले, असे एका अधिकाऱ्यांनी सांगितले. रविवारी रात्री झालेल्या चकमकीत एक हेड कॉन्स्टेबललाही गोळी लागली. या दोघांची छग्गा उर्फ बलवीर आणि फौता ऊर्फ मनमीत अशी ओळख पटली आहे. ही दोघे हस्तिनापूरमधील किशनपूर गावातील रहिवासी आहेत. त्या प्रत्येकावर २५ हजार रुपयांचे बक्षिस होते.

बलवीर आणि मनमीत हे २ एप्रिलला हस्तिनापूरमध्ये झालेल्या परमजीत सिंग ऊर्फ गुल्ला याच्या हत्येत सहभागी होते, असे अतियिक्त पोलिस अधीक्षक राकेश कुमार मिश्रा म्हणाले. नियमित तपासणी करणाऱ्या पोलिस पथकाने जम्मूदीप क्रॉसिंगजवळ मोटारसायकलवरून आलेल्या दोन पुरुषांना संशयास्पद वागणुकीमुळे थांबवण्याचा प्रयत्न केला तेव्हा ही चकमक झाली. गुन्हेगारांकडून एक पिस्तूल आणि एक रिव्हॉल्व्हर जप्त केली. (वृत्तसंस्था)

# भगव्या रंगासह रामनामात रंगले संभल



रामनवमीनिमित्त उत्तर प्रदेशातील अतिसंवेदनशील समजल्या जाणाऱ्या संभल शहरात मिरवणुका निघाल्या

### प्रथमच रामनवमीची भव्य मिरवणूक

◆ **संभल, ७ एप्रिल**

उत्तरप्रदेशातील संभल जिल्हा गेल्या काही काळापासून जातीय हिंसाचार आणि मशिदीच्या वादामुळे चर्चेत आहे. याच संभलमध्ये रामनवमीनिमित्त विश्व हिंदू परिषदेतर्फे पहिल्यांदाच भव्य भगवी मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक संपूर्ण शहरासाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू होता. यामध्ये परंपरा, संस्कृती आणि श्रद्धेचा अप्रतिम संगम पाहायला मिळाला.

रामनवमीच्या मिरवणुकीत तरुणींनी हातात तलवारी घेऊन स्टंट केले. धाडस आणि आत्मविश्वासाचे अनोखे उदाहरण त्यांनी यावेळी मांडले. त्याचबरोबर भगवे झेंडे हातात घेऊन तरुणाई मोठ्या उत्साहात नाचताना दिसली. या मिरवणुकीत भगवान राम, हनुमान आणि इतर देवी-देवतांची सुंदर झाकी समाविष्ट होती. संपूर्ण मार्गावर भक्तिसंगीत, जयघोष आणि भाविकांचा उत्साह दिसून येत होता. (वृत्तसंस्था)

### कानाकोपऱ्यात सुरक्षा

मिरवणुकीसाठी शहरात कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. रॅपिड ॲक्शन फोर्स आणि स्थानिक पोलिस दलाचे कर्मचारी प्रत्येक कोपऱ्यावर तैनात करण्यात आले होते, जेणेकरून मिरवणूक शांततेत आणि सुरक्षितपणे पार पडावी. संभलचा गौरवशाली भूतकाळ आता परतत असल्याचे विश्व हिंदू परिषदेचे क्षेत्रीय संघटन मंत्री यावेळी म्हणाले. ■

### बंगालमध्ये हिंदू संघटनांची मिरवणूक

रामनवमीनिमित्त पश्चिम बंगालच्या विविध भागांतून मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत हिंदू संघटना आणि भाजपाचे नेते व कार्यकर्ते सहभागी झाले होते. या रामनवमीच्या निमित्ताने बंगालमध्ये अनेक दिवसांपासून प्रचंड राजकारण सुरू आहे. यामुळेच राज्यात विविध ठिकाणी कडोकोट सुरक्षा बंदोबस्त तैनात होता. ■

# कुणाल कामराची मुंबई उच्च न्यायालयात धाव

◆ **मुंबई, ७ एप्रिल**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात आक्षेपार्ह वक्तव्य केल्याबद्दल दाखल करण्यात आलेला एफआयआर रद्द करण्याच्या मागणीसाठी विनोदी अभिनेता कुणाल कामराने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. उच्च न्यायालय मंगळवारी याचिकेवर सुनावणी करणार आहे.



कुणाल कामराचे वकील नवरोज सीरवई यांनी न्या. सारंग कोतवाल आणि न्या. एस. एम. मोडक यांच्या खंडपीठासमोर सोमवारी ही याचिका दाखल करीत त्यावर तातडीने सुनावणी करण्याची मागणी केली. मद्रास उच्च न्यायालयाकडून कुणाल कामराला अंतरिम दिलासा मिळाला आहे. असे असतानाही मुंबई पोलिस वारंवार समन्स पाठवत असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला.

याचिकेवर मंगळवारी सुनावणी केली जाईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले. आपल्याविरोधातील तक्रारीमुळे भाषण, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, कोणताही व्यवसाय करण्याचा अधिकार आणि भारतीय संविधानाने हमी दिलेल्या जीवन आणि स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करतात, असे कुणाल कामराने ५ एप्रिल रोजी दाखल केलेल्या याचिकेत म्हटले आहे.

मागील महिन्यात कुणाल कामराला मद्रास उच्च न्यायालयाने त्याच्याविरुद्धच्या खटल्यात ७ एप्रिलपर्यंत अंतरिम संक्रमण अटकपूर्व जामीन मिळवून दिला. तो तामिळनाडूचा कायमचा रहिवासी आहे. (वृत्तसंस्था)

### अडीच लाख चोरून मागितली माफी

◆ **खरगोन, ७ एप्रिल**

मध्यप्रदेशातील खरगोन शहरात चोरट्याने एका दुकानातून अडीच लाख रूपये चोरी केले आणि नंतर दुकानातच चिठ्ठी लिहून माफीही मागितली. रामनवमीच्या दिवशी मला चोरी करावी लागली पण माझ्यावर बँकेचे मोठे कर्ज आहे. याशिवाय अनेकांची देणी असल्याने त्रासून गेलो आहे. त्यामुळे मला नाईलाजास्तव चोरी करावी लागली. याबद्दल मला माफ करावे, असा मजकूर चोरट्याने चिठ्ठीत लिहिला . जमीदार मोहल्यातील जुजार अली बोहरा यांच्या दुकानात चोरी झाल्याचे कोतवाली पोलिस स्टेशनचे ठाणेदार अर्शद खान यांनी सांगितले. जुजार यांनी घरी जाताना पिशवीत २ लाख ८४ हजार रूपये ठेवले होते. चोरट्याने यातील २ लाख ४५ हजार चोरून नेले. उर्वरीत रक्कम तशीच ठेवली. चोरलेले पैसे सहा महिन्यात परत करणार असल्याचे वचनही चोरट्याने दिले, असे खान यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### ‘संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई’चा ट्रेलर प्रदर्शित

**मुंबई :** अत्यंत भक्तिमय वातावरणात ‘संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई’ या भव्य आध्यात्मिक चित्रपटाचा नेत्रदीपक ट्रेलर प्रदर्शनाचा सोहळा पार पडला.




अल्पावधीतच या ट्रेलरला उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. दिग्पाल लांजेकर यांचे दिग्दर्शन असणारा हा चित्रपट १८ एप्रिलला प्रेक्षकांच्या भेटीला येतो आहे. संत ज्ञानेश्वरांच्या भूमिकेत अभिनेता तेजस बर्वे दिसणार असून संत मुक्ताबाईंची भूमिका नेहा नाईक हिने साकारली आहे. संत निवृत्तीनाथांच्या भूमिकेत अक्षय केळकर तर सोपानकाकांची भूमिका सूरज पारसनीस यांनी केली आहे. सोबत समीर धर्माधिकारी, मृणाल कुलकर्णी, अजय पुरकर, मनोज जोशी, योगेश सोमण, स्मिता शेवाळे, सचिन देशपांडे आणि आदिनाथ कोठारे यांच्याही भूमिका आहेत. ■

### तेजश्रीचे पहिले पुस्तक आले भेटीला




**मुंबई :** ‘होणार सून मी या घरची’ या मालिकेद्वारे घराघरात पोहोचलेली जान्हवी अर्थात तेजश्री प्रधान अनेकांची आवडती अभिनेत्री आहे. अनेक चित्रपटांतूनही तिने आपल्या अभिनयाची चुणूक दाखवली. आता तिचे पहिले पुस्तक प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. या पुस्तकात तेजश्रीच्या निवडक मुलाखतींचा संग्रह करण्यात आला आहे. ‘अभिनेत्री तेजश्री प्रधान निवडक मुलाखती’ असे या पुस्तकाचे नाव असून त्याचे संपादन सुनील पांडे यांनी केले आहे. प्राजक्त प्रकाशनने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. वेगवेगळ्या मुलाखतीत तेजश्रीने मांडलेले विचार या पुस्तकाच्या निमित्ताने एकाच ठिकाणी चाहत्यांना वाचता येणार असून हे पुस्तक ॲमेझॉनवर उपलब्ध आहे. ■



### आयुष्मानच्या पत्नीला पुन्हा कर्करोगाचे निदान

**मुंबई :** अभिनेता आयुष्मान खुराणाची पत्नी ताहिरा कश्यप हिला पुन्हा कर्करोगाचे निदान झाले आहे. नुकतीच तिने इन्स्टाग्रामवर इक भावनिक पोस्ट शेअर करत आपल्या प्रकृतीविषयी माहिती दिली. २०१८ मध्ये तिला कर्करोग झाला होता. तेव्हा तिने त्यावर मात केली. आता ती त्याला ‘राऊंड २’ म्हणत आहे आणि त्याच सकारात्मक दृष्टिकोनाने ती त्याला तोंड देत आहे. सर्व महिलांनी नियमितपणे आपली मॅमोग्राफी केली पाहिजे, असे तिने आवर्जून सांगितले आहे. विशेष म्हणजे, जागतिक आरोग्य दिनानिमित्त तिने ही पोस्ट शेअर केली आहे. प्रत्येकाने आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी जे काही करता येईल ते करावे, असे ती सांगते. ■

# बंगालच्या शाळांमध्ये नोकरी गमावलेल्यांच्या पाठीशी उभे राहू

## सेवेत खंड पडू न देण्याचे ममता बॅनर्जींचे आश्वासन

◆ **कोलकाता, ७ एप्रिल**

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर शालेय नोकरी गमावलेल्या पात्र उमेदवारांना पूर्ण पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले. त्यांचे सरकार त्यांना बेरोजगार राहू देणार नाही किंवा त्यांच्या सेवेत खंड पडणार नसल्याची ग्वाही त्यांनी दिली. सर्वोच्च न्यायालयाने ३ एप्रिलला बंगालमधील सरकारी आणि अनुदानित शाळांमधील २५,७५३ शिक्षक आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती अवैध ठरवली होती आणि संपूर्ण निवड प्रक्रिया दूषित आणि कलंकित असल्याचे म्हटले होते.

ज्यांची नोकरी अन्याय पद्धतीने गेली आहे. त्यांच्या पाठीशी उभी राहीन. इतर काय विचार करतील याची मला पर्वा नाही. तुमची प्रतिष्ठा पुनर्संचयित करण्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करेन, असे बॅनर्जी यांनी उमेदवार आणि शालेय कर्मचाऱ्यांसोबत बैठकीत सांगितले. पात्र उमेदवारांना सेवेत कोणताही अडथळा येऊ नये यासाठी आमच्याकडे स्वतंत्र योजना आहेत. आम्ही त्यांना बेरोजगार राहू देणार नाही, असे त्या म्हणाल्या.



मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासमोर व्यथा मांडताना नोकरी गमावलेले शिक्षक

ज्याबद्दल कल्पनाही नाही, त्या प्रकरणांमध्ये नावे ओढली जात आहेत, असा दावा शालेय नोकऱ्यांच्या नियुक्त्यांमधील विसंगतीबद्दल बोलताना मुख्यमंत्र्यांनी केला. शाळेतील नोकरी गमावलेल्यांच्या बाजूने उभे राहिल्याबद्दल जर कोणी मला शिक्षा करू इच्छित असेल तर मी तुरुंगात जाण्यासही तयार आहे, असे बॅनर्जी यांनी ठामपणे सांगितले. संपूर्ण शिक्षण व्यवस्था मोडण्याचा कट रचला जात आहे. काही लोकांकडून एक घाणेरडा खेळ खेळला जात आहे, असे त्या म्हणाल्या. (वृत्तसंस्था)

# मणिपुरात सुरक्षा दलाने केले बंडखोरांचे तळ उद्ध्वस्त

◆ **इम्फाळ, ७ एप्रिल**

बंदी घातलेल्या कांगलेईपाक कम्युनिस्ट पार्टी (पीडब्ल्यूजी) संघटनेच्या बंडखोरांशी झालेल्या एका छोट्या चकमकीनंतर सुरक्षा दलांनी मणिपूरच्या थौबल जिल्ह्यातील बंडखोरांच्या एका तळावरून शस्त्रास्त्रे व दारूगोळा जप्त केला, असे पोलिसांनी सोमवारी सांगितले.

ही घटना रविवारी सुरक्षा दल हेरोक भागात शोध मोहीम राबवत असताना घडली. सुरक्षा दलांना पाहताच बंडखोरांनी त्यांच्यावर गोळीबार केला व सुरक्षा दलानेही प्रत्युत्तर दिले. चकमकीत गोळीबार झाला व नंतर बंडखोर घटनास्थळावरून पळून गेले, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.सुरक्षा दलांना बंडखोरांचा एक मोठा तळ सापडला, या तळातून शस्त्रास्त्रे व दारूगोळ्याचा साठा जप्त करण्यात आला.

या तळातून एक मॅगझिन असलेली एक सेल्फ-लोडिंग रायफल, १२ बोअरची सिंगल-बॅरल बंदूक, ७.६२ मिमीची २१ काडतुसे, तीन बुलेटप्रूफ जॅकेट व दोन प्लेट्स, कॅमफ्लाज कपडे, सिरिंज, औषधे व तीन चारचाकी वाहने जप्त करण्यात आली आहेत, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, पोलिसांनी रविवारी इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील नागामपाल भागात एका केसीपी (पीडब्ल्यूजी) बंडखोराला अटक केली. वैखोम लव्हसन सिंग (३१) असे या बंडखोराचे नाव असून तो खंडणीच्या कारवायांमध्ये सहभागी होता. अन्य एका कारवाईत पौराबी गावाजवळ शस्त्रे जप्त केली. (वृत्तसंस्था)




# आता टाटा पॉवर स्थापन करणार बॅटरी ऊर्जा साठवण प्रकल्प

◆ **नवी दिल्ली, ७ एप्रिल**

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडून १०० मेगावॅट क्षमतेचा बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टम प्रकल्प बसविण्यास मान्यता मिळाली आहे, असे टाटा पावरने सोमवारी सांगितले. हा प्रकल्प पुढील दोन वर्षांत मुंबईतील १० मोक्याच्या ठिकाणी बसवला जाईल, असे टाटा पॉवरने एक्सचेन्ज फाइलिंगमध्ये म्हटले आहे.

प्रगत ब्लॅक स्टार्ट फंक्शनॅलिटीने सुसज्ज असलेले, बीइएसएस ग्रिडमध्ये बिघाड झाल्यास मेट्रो, रुग्णालये, विमानतळ आणि डेटा सेंटरसह महत्त्वाच्या पायाभूत सुविधांना वीजपुरवठा जलद पुनप्राप्त करण्यात सक्षम करेल.

याव्यतिरिक्त, ही प्रणाली रिॲक्टिव्ह पॉवर मॅनेजमेंटला ऑप्टिमाइझ करेल, पीक डिमांड कार्यक्षमता सुधारेल आणि शहराच्या वीज पायाभूत सुविधांना बळकटी देईल. संपूर्ण १०० मेगावॅटची ही प्रणाली १० धोरणात्मकदृष्ट्या स्थित असलेल्या ठिकाणी, विशेषतः मुंबई वितरणातील लोड सेंटरजवळ स्थापित केली जाईल, ज्याचे केंद्रीय निरीक्षण आणि नियंत्रण टाटा पॉवरच्या पॉवर सिस्टम कंट्रोल सेंटरद्वारे केले जाईल.

भविष्यातील योजनांमध्ये ऑपरेशनल कार्यक्षमता वाढविण्यासाठी बीइएसएसचे डिस्ट्रिब्युटेड एनर्जी रिसोर्स मॅनेजमेंट सिस्टममध्ये एकत्रीकरण समाविष्ट आहे, असे टाटा पॉवरने म्हटले आहे. टाटा पॉवर ही एक आघाडीची एकात्मिक वीज कंपनी आहे आणि तिच्याकडे १५.६ चा वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओ आहे. (वृत्तसंस्था)

# विमानात महिलेचा मृत्यू

### छत्रपती संभाजीनगरात आपात्कालीन लॅण्डिंग

◆ **छ. संभाजीनगर, ७ एप्रिल**

इंडिगो एअरलाइन्सच्या एका विमानाचे महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथील विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले असल्याचे विमानतळ अधिकाऱ्यांनी सोमवारी सांगितले.

मुंबई-वाराणसी विमानाचे रविवारी रात्री चिकलठाणा विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. उत्तर प्रदेशातील मिर्झापूर येथील रहिवासी सुशीला देवी मुंबईहून विमानात चढल्या आणि हवेतच त्यांना अस्वस्थ वाटू लागले.

रात्री १० वाजण्याच्या सुमारास वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीमुळे विमान चिकलठाणा विमानतळावर उतरले. वैद्यकीय पथकाने लँडिंग करताना महिलेची तपासणी केली. परंतु आधीच तिचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी औपचारिकता पूर्ण केल्यावर विमान वाराणसीकडे गेले. महिलेचा मृतदेह सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात आणि रुग्णालयात पाठविण्यात आला. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# बोर्डाची वेबसाईट सायबर सुरक्षित करा : मंत्री शेलार

**तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ७ एप्रिल:**



दहावी, बारावी बोर्डाच्या वेबसाईटची क्षमता वाढवणे व सायबर सुरक्षित करण्याबाबत येता सात दिवसात अहवाल सादर करा, असे निर्देश माहिती तंत्रज्ञान मंत्री अँड आशिष शेलार यांनी आज दिले. दहावी, बारावी निकालाची तारीखेला विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून वेबसाईट बाबत आढावा घेण्यासाठी आज बोर्डाचे अधिकारी आणि माहिती तंत्रज्ञान विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक मंत्री शेलार यांनी घेतली. महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा बोर्डाचे अध्यक्ष शरद गोसावी, शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन आणि माहिती तंत्रज्ञान विभागाचे संचालक अनिल भंडारी आणि सचिव सदाम आंधळे या बैठकीला उपस्थित होते. यावेळी बोर्डाच्या वेबसाईटची क्षमता व त्यामध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी याबाबत माहिती मंत्री अँड आशिष शेलार यांनी जाणून घेतली.

१० व१२ वीचे निकाल जाहिर झाल्यावर महाराष्ट्रातली लाखो मुले एकाच वेळेस रिझल्ट वेबसाईट वर लॉगईन करुन बघतात. अशा वेळेस सदर वेबसाईट वर ताण येउन ती साईट कँश होते व मुलांची गैरसोय होते. सदर वेबसाईट प्रणालीचे सतत लोड टेस्टंग करुन घेणे आवश्यक आहे व त्यानंतर त्याची क्षमता वाढवण्याची आवश्यक्ता आहे. त्यासाठी सध्याच्या वेबसाईटचा क्षमतेचा अहवाल तयार करा, त्या वेबसाईटची क्षमता वाढवण्यासाठी काय करता येईल याबाबत अहवाल तयार करा.

तसेच सायबर सेक्युरिटी हा आता महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यामुळे यासाठी काय करावे लागेल याचाही अहवाल सात दिवसात द्या असे निर्देश विभागाला देण्यात आले.

# त्या ५ पोलिसांवर हत्येचा गुन्हा दाखल करा

## उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश; अक्षय शिंदे बनावट चकमक प्रकरण

**तभा वृत्तसेवा/जमीर काझी**
**मुंबई,दि.७ एप्रिल:**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा बनावट एन्काऊंटर प्रकरणी अडचणीत आलेल्या राज्य सरकारला उच्च न्यायालयाने सोमवारी आणखी एक मोठा दणका दिला. या प्रकरणी सरकारच्या भुमिकेवर

कडक ताशेरे ओढत संबंधित पाच पोलिसांवर तातडीने हत्येचा गुन्हा दाखल करून या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथक (एसआयडी) नेमण्याचे आदेश दिले. न्या. रेवती मोहिते- डेरे आणि न्या. नीला गोखले यांच्या खंडपीठाने हे आदेश दिले. सरकारच्या भूमिकेमुळेच आपल्याकडे हे आदेश देण्याशिवाय पर्याय उरलेला नसल्याचेही स्पष्ट करीत करताना त्याला आव्हान देण्यासाठी स्थगिती देण्याची विनंतीही फेटाळून लावली. बदलापुरातील शाळेतील बालिकावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या अक्षय शिंदेला गेल्या वर्षी ७ सप्टेंबरला तळोजा जेल मधून पोलीस व्हॅनमधून घेऊन जात असताना मुंब्रा येथे एन्काऊंटर करण्यात आला. बंदोबस्तातील पोलिसाची रिवाल्वर हिसकावून त्याने गोळीबार केल्याने प्रत्युत्तर दाखल केलेल्या गोळीबारात शिंदे मारला गेला असे पोलिसांकडून सांगण्यात आले होते मात्र याबाबत ठाणे महानगर दंडाधिकारी यांनी दिलेल्या चौकशी अहवालामध्ये हा बनावट एन्काऊंटर असून त्यासाठी बंदोबस्तातील पाचही पोलीस जबाबदार असल्याचा अहवाल दिला होता त्यानुसार उच्च न्यायालयाने याबाबत संबंधितावर गुन्हे दाखल करण्याचे आदेश सरकारला दिले होते मात्र या प्रकरणाचा सीआयडी कडून तपास सुरू असल्याचे सांगून सरकारकडून विलंब लावला जात होता, तसेच मयत अक्षय शिंदे यांचे आई-वडिलांनी खटला मागे घेण्याची लेखी विनंती न्यायालयात केली होती. मात्र कोर्टाने ते फेटाळून लावत सुनावणीवेळी ते हजर राहण्याची आवश्यकता नसल्याचे सांगितले होते. याप्रकरणी आज झालेल्या सुनावणीवेळी न्या. रेवती ढेरे- पाटील व न्या.गोखले यांनी सरकारच्या भुमिकेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

संबंधित पाच पोलिसांवर गुन्हा दाखल करण्यास सरकार टाळाटाळ करीत आहे, असे नमूद करून हे प्रकरण आपल्याला चालवायचे नाही, त्यामुळे ते प्रकरण मागे घेण्याची विनंती अक्षय शिंदेंच्या आई-वडिलांनी केली होती. त्यामुळे हे प्रकरण आम्ही बंद करून शकलो असतो. हे प्रकरण बंद करणे आमच्यासाठी सोपे होते. परंतु, घटनात्मक न्यायालय म्हणून आम्ही शांत बसू शकत नाही किवा या प्रकरणाकडे दुर्लक्ष करू शकत नाही, असे खडसावले. या प्रकरणाच्या पुढील तपासासाठी मुंबई क्राईम ब्रँच सह पोलीस आयुक्त लख्मी गौतम यांच्या नेतृत्वाखालील एसआयटी स्थापन करावी. तसेच, राज्य गुन्हे अन्वेषण गुन्हे विभागाने आतापर्यंतच्या तपासाची सगळी कागदपत्रे एसआयटीकडे सोपवावीत, असे आदेशही न्यायालयाने दिले. ठाणे दंडाधिकाऱ्यांनी चकमकीचा चौकशी अहवाल उच्च न्यायालयात सादर करताना शिंदे याच्या मृत्युसाठी त्यावेळी वाहनात असलेले पाच पोलीस जबाबदार असल्याचा निष्कर्ष नोंदवला होता. तसेच, शिंदे याच्या वडिलांनी चकमक बनावट असल्याच्या आरोपांमध्ये तथ्य असल्याचे म्हटले होते. दंडाधिकाऱ्यांच्या या अहवालाची खंडपीठाने दखल घेत गुन्हा नोंदवण्याची सूचना केली होती. तथापि, या चकमकीची गुन्हे अन्वेषण विभागातर्फे स्वतंत्र चौकशी सुरू आहे. शिवाय, सरकारनेही चौकशीसाठी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निवृत्त मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील आयोगही स्थापन केला आहे. त्यामुळे, सीआयडीच्या चौकशीअंतीच या प्रकरणी गुन्हा दाखल करायचा की नाही ?याचा निर्णय घेतला जाईल, अशी भूमिका सरकारने न्यायालयात मांडली होती. ती अमान्य करून तात्काळ गुन्हा दाखल करीत तपास सीआयडी करून काढून या साईड कडे वर्ग करण्याचे आदेश दिले.

### या पोलिसांवर होणार गुन्हा दाखल

दंडाधिकाऱ्यांनी अहवालात ठाणे गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय शिंदे, सहाय्यक निरीक्षक नीलेश मोरे, हवालदार अभिजीत मोरे आणि हरीश तावडे, तसेच वाहन चालक सतीश खाटळ यांना शिंदेच्या मृत्युसाठी जबाबदार ठरवले आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल होऊन तपास केला जाईल

# व्हीव्हीपॅटची १०० टक्के मॅन्युअली मोजणी नाही

## सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली याचिका

**नवी दिल्ली, ७ एप्रिल**



मतदानादरम्यान व्होटर व्हेरिफायड पेपर ऑडिट ट्रेल (व्हीव्हीपॅट) स्लिपची १०० टक्के मॅन्युअल मोजणी आणि नियंत्रण युनिटद्वारे इलेक्ट्रॉनिक मोजणी करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला द्यावेत, अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर विचार करण्यास सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी नकार दिला. मागील वर्षी लोकसभा आणि राज्यातील विधेनसभेच्या निवडणुका पार पडल्या. या दोन्ही निवडणुकांमध्ये विरोधकांनी ईव्हीएम मशीनवर शंका उपस्थित केली. दरम्यान, व्हीव्हीपॅट मशीनवरील मॅन्युअली मोजणीबाबत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. सोमवारी या याचिकेवर सुनावणी घेण्यात आली. सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्या. संजय कुमार आणि न्या. केव्ही विश्वनाथन यांचे न्यायासन या प्रकरणावरील दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध हंस राज जैन यांच्या याचिकेवर विचार करत होते. यावर सोमवारी कोर्टाने निर्णय दिला. या याचिकेवर सरन्यायाधीश संजीव खन्ना म्हणाले की, दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्याचा कोणताही आधार मिळाला नाही. ही याचिका फेटाळण्यात येत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायसनाने यापूर्वीही असेच मुद्दे उपस्थित करणारा निकाल दिला होता. एकच वाद पुन्हा पुन्हा होऊ शकत नाही. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र डेटाचे रेकॉर्डसह १०० टक्के क्रॉस-व्हेरिफिकेशन करण्याची मागणी करणाऱ्या याचिका फेटाळून लावताना, सर्वोच्च न्यायालयाने त्यावेळी म्हटले होते की, ईव्हीएम सुरक्षित, उपयोगकर्ते अनुकूल आहेत.

# दिव्यांगांच्या रोजगारासाठी धोरण आणणार

## मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली माहिती

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ७ एप्रिल**

जन्मजात किंवा काही कारणास्तव दिव्यांगत्व आलेल्या दिव्यांग बांधवांना आयुष्य जगत असताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या बांधवांच्या आयुष्यात समृद्धी निर्माण करण्यासाठी काल सुसंगत नवनवीन योजना, धोरणांची निर्मिती करण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या धोरणांची योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही दिल्या.

सह्याद्री अतिथिगृह येथे दिव्यांग बांधवांच्या विविध समस्यांबाबत आयोजित आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी राज्यमंत्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, मुख्य सचिव सुजाता सौनिक उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, दिव्यांग बांधवांना अधिक सुलभतेने लाभ मिळावा यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असून, लाडकी बहीण योजनेप्रमाणे दिव्यांग बांधवांचे अर्थसहाय्य थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. दिव्यांग लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य वाढवण्याबाबतही शासन सकारात्मक असून दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी शासन सकारात्मक आहे., असे सांगून ते म्हणाले, राज्यातील दिव्यांग नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष सहाय्य योजनेचे अर्थसाहाय्य थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाले पाहिजे. ज्या लाभार्थ्यांचे बँक खाते आधार लिंक झाले नाही यासाठी जिल्हाधिकारी यांनी कालबद्ध कार्यक्रम हाती घ्यावा. योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी डीबीटी प्रणालीचा अवलंब करणे गरजेचे आहे.



दिव्यांग सर्वेक्षण व प्रमाणपत्रासाठी एक विशेष मोहीम राबविण्यात यावी. दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या अपंगत्वाचं प्रमाणपत्र नसल्यामुळे शासकीय योजना, सवलती, शिक्षण, नोकरी आणि आरोग्यविषयक सुविधा मिळण्यासाठी अडचणी येतात. यासाठी आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभागाने दिव्यांग प्रमाणपत्र वाटपासाठी विशेष मोहीम राबवावी.

राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणात सुलभ व सन्मानपूर्वक प्रवेश मिळावा यासाठी प्रत्येक विद्यापीठात दिव्यांगांसाठी स्वतंत्र व्यवस्था तयार करण्यात यावी. यामध्ये दिव्यांग अनुकूल पायाभूत सुविधा, सहाय्यक उपकरणे, विशेष मार्गदर्शन केंद्रे आणि समुपदेशन सेवा यांचा समावेश असावा. शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात दिव्यांग विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत शासन सकारात्मक विचार आहे. याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाने प्रस्ताव तयार करून मंत्रिमंडळ बैठकीत सादर करावा.

### अंत्योदय योजनेत दिव्यांगांचा समावेश

अंत्योदय अन्न योजनेत पात्र दिव्यांगांचा तातडीने समावेश केला जाणार असून, ज्यांचा समावेश विद्यमान निकषांमध्ये होऊ शकत नाही, अशा दिव्यांग व्यक्तींसाठी राज्य शासन स्वतंत्र योजना तयार करणार आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागाने पात्र दिव्यांग व्यक्तींना शिधापत्रिका वाटप करण्यात येत आहेत. राज्यातील दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणाकरिता जिल्हा वार्षिक योजनेत सन २०२५-२६ पासून प्रत्येक वर्षी नियमित योजनांसाठी अनुज्ञेय असलेल्या निधीमधून कमाल १ टक्का निधी राखीव ठेवण्यात येणार आहे. या निधीमधून दिव्यांग व्यक्ती साठीच्या सर्व सोयी सुविधा एका छताखाली उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा दिव्यांग भवन उभारण्यात येईल.

### स्वतंत्र घरकुल योजना

दिव्यांग नागरिकांना हक्काचा निवारा मिळावा यासाठी राज्य शासन स्वतंत्र घरकुल योजना तयार करणार आहे. ज्यांच्याकडे स्वतःची जमीन नाही, अशा लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी आवश्यक जागेसाठीही शासन मदत करणार आहे.

# मातीची बेकायदेशीर वाहतूक ठेकेदारांवर गुन्हे दाखल करा : महसूल मंत्री बावनकुळे

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ७ एप्रिल**



शासनाची फसवणूक करणाऱ्या कोणाचीही हयगय करणार नाही. रॉयल्टी बुडवणाऱ्या ठेकेदारांवर गुन्हे दाखल करून याप्रकरणी दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशीचे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी दिले.

ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये भुयारी गटार योजनेच्या ठेकेदारांनी मातीची बेकायदेशीर वाहतूक करून रॉयल्टी बुडविल्याबाबत विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. त्या अनुषंगाने आयोजित बैठकीत. आ. किसन कथोरे, आ. प्रशांत ठाकूर उपस्थित होते.

ठाणे महानगरपालिका हद्दीतील भुयारी गटार योजनेसाठी नेमलेले कंत्राटदार आनंद कंस्ट्रवेल यांनी मातीचे उत्खनन करून पुन्हा भरणी केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या मातीची रॉयल्टी न भरता तसेच परवानगी न घेता मातीची बेकायदेशीर वाहतूक केली होती. या ठेकेदाराने सुमारे ४,६५२ ब्रास मातीच्या वाहतुकीपोटी ४ कोटी ८३ लाख ८० हजार ८०० रुपये स्वामीत्व धन (रॉयल्टी) बुडविल्याचेही निदर्शनास आले होते. त्याचबरोबर ठाणे महानगरपालिका हद्दीतील मौजे कोपरीगाव येथे ठेकेदार मे.एन.सी.सी. व एस.एम.सी. यांनी बांधकाम करण्यासाठी मातीचा भराव केला असून हजारो ब्रास स्वामित्व धन (रॉयल्टी) बुडविली आहे. या रॉयल्टी बुडवणाऱ्यांवर कारवाईत झालेल्या दिरंगाईबाबत मंत्री बावनकुळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांची कानउघडणी केली. सन २०१८ पासून शासकीय अधिकाऱ्यांना या विषयाची माहिती असतानाही कारवाईसाठी विलंब का झाला ?असा सवाल विचारून महसूल विभाग हा शासनाचा चेहरा असून पारदर्शक आणि गतिमान कामकाज करणे आवश्यक आहे,'' असेही सांगितले.

# सायबर गुन्हेगारीवर नियंत्रणासाठी सायबर प्रयोगशाळांचे जाळे सक्षम करा

## मुख्यमंत्री फडणवीस

## मुंबईत तीन सायबर प्रयोगशाळांचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ७ एप्रिल :**



सायबर गुन्हेगारीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवण्यासाठी सायबर प्रयोगशाळा महत्वाची भूमिका बजावणार आहे. त्यासाठी शासन सायबर लॅबचे जाळे निर्माण करीत आहे. असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केले.

दक्षिण मुंबई विभागाच्या निर्भया सायबर प्रयोग शाळेचे डी. बी. नगर पोलीस स्टेशन येथे उद्घाटन करण्यात आले. यासोबतच मुंबई (मध्य) भागासाठी वरळी पोलीस स्टेशन येथील व मुंबई (पूर्व) भागासाठी गोवंडी पोलीस स्टेशन येथील सायबर प्रयोगशाळांचे ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन करण्यात आले.

यावेळी गृह राज्यमंत्री (शहरे) योगेश कदम, अप्पर मुख्य सचिव (गृह) इक्बाल सिंह चहल, मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, मुंबई शहरात पाच प्रस्तावित प्रयोगशाळापैकी तीन कार्यान्वित केल्या आहेत. या प्रयोगशाळांच्या माध्यमातून विशेषत्वाने सायबरच्या माध्यमातून महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे गुन्हे कमी कालावधीत सिद्ध करता येणार आहे. तसेच गुन्हा लपवण्यासाठी किंवा पुरावा नष्ट करण्यासाठी कुठल्याही इलेक्ट्रॉनिक उपकरणातील डाटा डिलीट केल्यास, मोबाईलची तोडफोड केल्यास किंवा मोबाईल टेम्पर केल्यास अशा सर्व इलेक्ट्रॉनिक उपकरणांमधील सर्व डेटा आधुनिक संगणक प्रणालीच्या सहाय्याने रिकव्हर केला जाणार आहे. प्रयोगशाळा आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असून अद्ययावत संगणक प्रणालीने (सॉफ्टवेअर) सक्षम आहेत. असे सांगून ते म्हणाले, जगातील या क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञान या प्रयोगशाळांमध्ये उपयोगात आणले जाणार आहे. आर्थिक गुन्हेगारी संदर्भात ऑनलाईन पद्धतीने परस्पर पैशांची हेराफेरी करणे, बँक खाते हॅक करणे अशा पद्धतीच्या गुन्ह्यांवरही प्रयोगशाळेच्या माध्यमातून नियंत्रण मिळविण्यात येणार आहे.

### गुन्हे रोखण्यासाठी मुंबई पोलीस दल सक्षम

सायबर गुन्हेगारी रोखणे आणि सायबर गुन्हेगारांना पकडणे हे भविष्यातील सर्वात मोठे आव्हान असणार आहे. हे आव्हान पेलण्यासाठी मुंबई पोलीस दल सज्ज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुंबई पोलीस दलाच्या विविध उपक्रमांचे लोकार्पण आज मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आझाद मैदान पोलीस स्थानकातील उत्कर्ष सभागृहात झाले. त्यावेळी बोलताना ते म्हणाले, महाराष्ट्र हा सायबर गुन्हेगारी नियंत्रणामध्ये पहिल्या क्रमांकावर असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण मिळवण्याची मुंबई पोलीसांची मोठी क्षमता आहे. सायबर गुन्ह्याच्या एक प्रकरणात १२ कोटी रुपये वाचवण्यात पोलिसांना यश आले आह. भविष्यातील सायबर गुन्ह्यांचे आव्हान पेलण्यासाठी मुंबई पोलीस दलाने आतापासूनच अनेक उपक्रम हाती घेतले डीजिटल अरेस्ट सारख्या प्रकरणांमध्ये चांगले सुशिक्षीत लोकही पैसे देत असल्याचे दिसत आहे. त्यासाठी जनजागृती महत्वाची आहे. केंद्र सरकारने आणलेले नवीन तीन कायदे हे खऱ्या अर्थाने भारतीय असल्याचे सांगून गुन्हे प्रकटीकरण, पुरवा याविषयीच्या कायद्यामुळे आता गुन्ह्यांवर चांगल्या प्रकारे नियंत्रण मिळवणे शक्य होणार आहे. गुन्ह्याच्या तपासकामी तंत्रज्ञान वापरासही आता परवानगी मिळालेली आहे. महिलांमध्येही आता बदल होत असून पुर्वी समाजिक दबावांमुळे महिलांविषयीच्या गुन्ह्यांची नोदणी कमी होती आता त्यामध्ये वाढ झाली आहे, ही एक चांगली बाब आहे. महिलांविषयीचे गुन्हे रोखण्यासाठीही आणि महिलांना पोलिसांविषयी विश्वास वाटावा यासाठी पोलीस स्थानकांमध्ये महिला व बाल सहाय्यता कक्ष निर्माण करण्यात आला आहे. यामुळे महिलांविषयीचे गुन्हे नोंदवताना त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे दडपण येणार नाही याची खात्री असल्याचेही त्यांनी सांगितले

# सौदीची १४ देशांवर व्हिसा बंदी

**रियाध-** सौदी अरेबियाने भारत आणि पाकिस्तानसह १४ देशांच्या तात्पुरत्या व्हिसावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये उमरा, व्यवसाय आणि कुटुंब व्हिसावर बंदी घालण्यात आली आहे. सौदी अरेबियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने हा निर्णय घेतला असल्याची माहिती समोर आली आहे. हे निर्बंध जूनपर्यंत कायम राहणार असून ज्यांच्याकडे उमरा व्हिसा आहे ते १३ एप्रिलपर्यंत सौदी अरेबियात प्रवेश करू शकणार आहेत. या वर्षीच्या हज यात्रेच्या आधी सौदी अरेबियाने हा निर्णय घेतला आहे. सौदी अरेबियामधील अधिकाऱ्यांनी सांगितलं की, हज यात्रेशी संबंधित गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि योग्य नोंदणी केल्याशिवाय देशात प्रवेश करणाऱ्या व्यक्तींना रोखण्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

# जपानी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा प्रयत्न : फडणवीस

## जपानी शिष्टमंडळाने घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ७ एप्रिल :**

जपानचे तंत्रज्ञान शेतीच्या क्षेत्रात आणून कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानावर आधारित १ अब्ज लोकांना मदत करायची आहे. मातीचे पुनरुज्जीवन, मॉडेल फार्म तयार करणे, ग्रीन हाऊस तंत्रज्ञान यावर महाराष्ट्र शासन जपानी एम २ लॅबो संस्थेसोबत काम करणार आहे. विपणन साखळीतील गैरप्रकार कमी करून शेतकऱ्यांना सक्षम करायचे आहे. भारतीय शेतकऱ्यांना शिक्षित करून त्यांना जपानमध्ये रोजगार मिळवून देण्यात येणार आहे. जपानी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. या संस्थेच्या अध्यक्षा युरिको कातोसान यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची आज भेट घेतल्यानंतर ते बोलत होते.

कृषी क्षेत्राच्या विकासासाठी राज्य शासन विविध निर्णय घेत आहे. श कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञान शेतीच्या विकासासाठी उपयोगात आणण्यात येत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित धोरण जाहीर केले असून जपान व महाराष्ट्र तंत्रज्ञानाचा उपयोग करून एकत्र काम करण्याचे आवाहनही फडणवीस यांनी केले.

एम २ लॅबो जपान ही सुझुकीची कृषी क्षेत्रातील संस्था असून ही सुझुकीची मुंबई, महाराष्ट्रात नोंदणीकृत झालेली पहिली संस्था आहे. यावेळी एम २ लॅबो संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी युरिको कातो, मित्र संघटनेचे अध्यक्ष समीर खाळे, एम २ लॅबो भारतचे मुख्य व्यवस्थापकीय अध्यक्ष प्रसून अग्रवाल, देवांग ओझा, एम २ लॅबो जपानचे प्रबंधक मसाको मियाशीता आदी उपस्थित होते.

राज्यात संस्थेसोबत एकत्र काम करून ''एम२ स्मार्ट व्हिलेज लॅबो'' या संकल्पनेवर आधारित कृषी क्षेत्रातील एक जपानी उत्कृष्टता केंद्र शंस्थापन करण्याची इच्छाही संस्थेने भेटीदरम्यान व्यक्त केली. तसेच जपानमध्ये भारतीय शेतमजुरांना जपानी शेतांमध्ये काम करण्यास समर्थन देण्यासाठी अधिकृत परवाना प्राप्त असल्याने त्यांना संधी देण्याविषयी चर्चाही यावेळी झाली.

# गोखले इन्स्टिट्यूटच्या पालक मंडळ सचिवाला अटक

**पुणे, दि. ७ एप्रिल-**

येथील प्रतिष्ठि गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँण्ड इकॉनॉमिक्सची (जीआयपीई) पालक संस्था असलेल्या सर्व्हण्ट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या सचिवाला पोलिसांनी निधीचा गैरवापर आणि फसवणूक केल्याच्या आरोपाखाली अटक केली आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. जीआयपीईचे उपनिबंधक विशाल गायकवाड यांच्या तक्रारीवरून मिलिंद देशमुख यांना शनिवारी अटक करण्यात आली, असे डेक्कन जिमखाना पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्याने सांगितले. जीआयपीईचे १.५ कोटी रुपयांचे निधी सर्व्हण्ट्स ऑफ इंडिया सोसायटी (एसआयएस) साठी जमीन खरेदी करण्याकरिता वळवण्यात आल्याचा आरोप आहे. हा कथित गैरवापर २०२२-२३ मध्ये झाला. देशमुख यांच्यावर विश्वासघात, फसवणूक व इतर गुन्ह्यांसाठी आयपीसी कलम ४०६, ४२० आणि ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सचिव म्हणून काम करत असताना डिसेंबर २०२२ मध्ये देशमुख यांनी गोखले इन्स्टिट्यूटला स्वतःच्या स्वाक्षरीने एक पत्र लिहिले, यात त्यांनी नागपूरमधील एसआयएसची १.५ कोटी रुपयांची जमीन मोकळी करण्याची मागणी केली होती, असे तक्रारीत म्हटले आहे. देशमुख यांनी कोणतीही परवानगी घेतली नाही. एसआयएसचा लेटरहेड वापरण्यात आला होता व त्या पत्रावर गोखले इन्स्टिट्यूटचा शिक्का होता. सदर मागणी पत्र मिळाल्यानंतर, गोखले इन्स्टिट्यूटच्या व्यवस्थापन मंडळाने १४ डिसेंबर २०२२ रोजी तात्काळ ते मंजूर केले, असे त्यात म्हटले आहे. फेब्रुवारी २०२३ मध्ये, गोखले इन्स्टिट्यूटने नागपुरातील जमिनीसाठी १.५० कोटी रुपये देण्यास सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीला कळवले, असे तक्रारीत म्हटले आहे. जुनी कागदपत्रे, स्टॅम्प ड्युटी, कंत्राटदार शुल्क, प्रशासकीय खर्च आणि इतर खर्च मिळविण्यासाठी ४० लाख रुपये वापरण्यात आल्याचे दाखवण्यात आले आहे, असे त्यात म्हटले आहे.

## अग्रलेख...

# ...विश्वात शोभुनी राहो!

भारतीय जनता पार्टीची वाटचाल तेजस्वी आहे. आपल्या सरकारच्या कारकीर्दीत सुरू असलेला विकासाचा आलेख उंचावता आहे, पण एवढ्यावरच न थांबता आणखी खूप काही आपल्याला करायचे आहे. सामान्य माणसाच्या जीवनात बदल घडवून आणून परिवर्तनाचा पाया रचणारे एक गतिशील, पारदर्शी, प्रामाणिक सरकार देण्यासाठी आपले सरकार सातत्याने प्रयत्नशील असून शंभर दिवसांच्या कारभारातून पक्षाने महाराष्ट्रात हा संदेश यशस्वीपणे पोहोचविला आहे. महाराष्ट्राला सर्वोच्च स्थानी नेल्याखेरीज हे सरकार थांबणार नाही, अशी ग्वाही पक्षाच्या स्थापना दिन सोहळ्यातील कार्यकर्ता संमेलनात बोलताना रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. गेल्या शंभर दिवसांतील महाराष्ट्रातील भाजपाच्या वाटचालीत या ग्वाहीचा पुरावा पाहता येतो. या गतिमान वाटचालीत पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जनता आणि सरकार यांमधील समन्वयाचा व संवादाचा सेतू होऊन काम केले पाहिजे, अशी अपेक्षाही फडणवीस यांनी व्यक्त केल्याने आगामी काळात राज्यात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतही एकहाती प्रचंड विजय मिळविण्याचा भाजपाचा संकल्प स्थापना दिन सोहळ्याच्या निमित्ताने स्पष्ट झाला. आज महाराष्ट्राच्या महायुती सरकारमध्ये भाजपासोबत एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस भाजपाच्या खांद्याला खांदा लावून आणि भाजपाच्या संकल्पांची पुरेपूर जाणीव ठेवून महाराष्ट्राच्या विकासाकरिता आपले योगदान देण्यासाठी सज्ज झाली आहे. भारतीय जनता पक्ष हा घराणेशाहीतून जन्मलेला, घराणेशाहीला पोषक ठरणारा किंवा घराणेशाहीसाठी काम करणारा पक्ष नाही, तर कार्यकर्त्यांनी बांधलेला, कार्यकर्त्यांनी जोपासलेला आणि कार्यकर्त्यांच्या विश्वासावर चालणारा पक्ष आहे. राष्ट्र प्रथम ही या पक्षाच्या नसानसात भिनलेली संकल्पना केवळ राजकीय नाही, तर तो एक संस्कार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीतून घडलेल्या समर्पित वृत्तीच्या कार्यकर्त्यांनी याच भावनेतून स्वत:स जनसंघासाठी वाहून घेतले. त्यांच्या संस्काराचा वारसा घेतलेल्या कार्यकर्त्यांनी जनसंघ ते भाजप असा प्रवास करताना जनसेवेच्या व्रतस्थपणे संघर्षातून संघवृत्तीने पक्ष उभा केला. दोन खासदारांपासून संपूर्ण बहुमताचा पक्ष, देशाच्या कानाकोपऱ्यात विस्तारलेला, देशातील १६ राज्यांमध्ये सत्तेच्या माध्यमातून जनसेवेचे व्रत अखंडपणे अंगीकारणारा आणि २१ राज्यांत मित्रपक्षांसोबत सेवेचे साधन म्हणून सत्ता राबविणारा हा पक्ष ६ एप्रिल रोजी ४५ वर्षांचा झाला. खरे म्हणजे, या पक्षाच्या वाटचालीचा हा दुसरा टप्पा होता. १९५२ साली स्थापन झालेल्या जनसंघाने १९७५ मध्ये पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशावर लादलेल्या आणिबाणीच्या विरोधात आणि लोकशाहीच्या संरक्षणार्थ संघर्षाचा झेंडा फडकावला. जनता पार्टीतील कम्युनिस्ट आणि अन्य काही सहयोगी पक्षांच्या संघद्वेषी राजकारणामुळे स्वाभिमानाने सत्तेबाहेर पडून पुन्हा एकदा नव्याने सत्तेच्या राजकारणात स्वतंत्र स्थान निर्माण करण्याचे आव्हान समोर ठेवूनच भारतीय जनता पार्टी नावाने मैदानात प्रवेश केला, तेव्हा माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कविमनात देशाच्या राजकीय क्षितिजावरील भाजपाच्या सत्ता उदयाचे सुंदर स्वप्न तरळत होते. 'अंधेरा छटेगा, सूरज उगेगा, कमल खिलेगा' अशा शब्दांत या द्रष्ट्या नेत्याने भाजपाच्या सत्ताकारणाची भविष्यवाणीच उच्चारली आणि पक्षाच्या संकल्पांना नेमकी दिशी प्राप्त करून दिली.

गेल्या ४५ वर्षांत भाजपने देशाच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आपले अढळ स्थान निर्माण केलेच, पण कोट्यवधी सदस्यांचा भक्कम संघटित पाठिंबा असलेला जगातील सर्वांत मोठा पक्ष म्हणून आपले नाव जागतिक राजकारणाच्या पटलावरही कायमचे कोरून ठेवले आहे. सामान्य माणसाचा विचारच मनात राहील या निश्चयाने आणि या महान पक्षाला अधिक महानता प्राप्त करून देण्यासाठी अधिकाधिक योगदान देण्याचा संकल्प पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त सर्वांनी करू या, असे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी भाजपा कार्यकर्त्यांना केले, तेव्हा याच दिवसाचे औचित्य साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पक्षाच्या वाटचालीचा एक व्यापक पट आपल्या प्रकट चिंतनातून उलगडला होता. सुशासन, सर्वांची साथ आणि सर्वांचा विकास हा संकल्पमंत्रच या पक्षाला भक्कम राष्ट्रव्यापी जनाधार देणारा ठरला आहे, हे पंतप्रधानांचे उद्गार तिसऱ्या पर्वातील नेत्रदीपक विजयानंतरच्या वाटचालीतील विश्वासाचा पुरावा ठरले आहेत. हा पक्ष कार्यकर्त्यांचा आहे, ही नरेंद्र मोदी यांच्यापासून देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत प्रत्येकाच्या मनात रुळलेली भावना हे पक्षाच्या समर्पित कार्यकर्त्यांची 'मन की बात' आहे. पक्षाला ही भक्कम ताकद देण्यासाठी स्वार्थनिरपेक्ष वृत्तीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमुळेच पक्षाने स्वतःस सर्वोच्च शक्तिमान राजकीय पक्ष म्हणून सिद्ध केले आहे, ही पंतप्रधान मोदी यांनी बोलून दाखविलेली भावना लोकसभा, विधानसभा आणि राज्याराज्यांतील वेगवेगळ्या निवडणुकांतून पक्षाला मिळालेल्या जनाधाराच्या सातत्यातून सिद्ध झाली आहे. ज्या वृत्तीने प्रत्येक कार्यकर्ता पक्षासाठी स्वतःस झोकून देऊन काम करतो, उपेक्षितांच्या, गरिबांच्या सेवेसाठी वाहून घेतो, त्या वृत्तीचे पाठबळ पक्षाला लाभले आहे, हे कृतज्ञ भाव पक्षाच्या सर्वोच्च नेत्याच्या चिंतनातून व्यक्त होतात, तेव्हा साहजिकच प्रत्येक कार्यकर्त्याला पक्षकार्यासाठी नवे बळ प्राप्त होत असावे.

पक्षाच्या प्रदेश मुख्यालयात स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यकर्ता संमेलनात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनसंघ ते आजची भाजपा यांच्या वाटचालीतील तेजस्वी टप्प्यांचा अतिशय समर्पक आढावा घेतला. अयोध्येत रामललाची प्रतिष्ठापना झाल्यानंतर रामनवमीच्या दिवशी पक्षाचा स्थापना दिवस साजरा व्हावा हा एक विलक्षण योगायोग नव्हे, तर एक प्रकारचा ईश्वरी संकेत असून ज्या रामराज्याच्या स्थापनेकरिता आपण सगळे प्रयत्नरत आहोत, त्या रामराज्याकडची आपली वाटचाल सुरू झाली असल्यानेच आज आपण रामनवमीच्या निमित्ताने आपला स्थापना दिवस साजरा करीत आहोत, असा मुख्यमंत्र्यांनी केलेला उल्लेख हे पक्षाच्या सुशासन संकल्पाचे स्मरण होते. महाराष्ट्रात पक्षाचे दीड कोटी सदस्य नोंदविण्याचा संकल्प भाजपाने पूर्ण केला, ही अभिमानास्पद बाबही त्यांनी या भाषणात अधोरेखित केली. या दीड कोटी सदस्यांमुळे जगाच्या पाठीवरील सर्वांत मोठा राजकीय पक्ष म्हणून भाजपा स्थापित झाला, ही महाराष्ट्रातील भाजपा कार्यकर्त्यांना उमेद देणारी आणि त्यांचा विश्वास वाढविणारी जाणीवही त्यांनी यावेळी करून दिली. अत्यंत शास्त्रीय पद्धतीने केलेली ही सदस्य नोंदणी प्रामाणिक व पारदर्शक ठरली आहे, असेही त्यांनी आवर्जून नमूद केले, तेव्हा संसदेच्या अधिवेशनात अलिकडेच समाजवादी पार्टीचे अखिलेश यादव आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यात झडलेल्या सवाल-जबाबाची कार्यकर्त्यांस आठवण झाली.

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, दीनदयाळ उपाध्याय आदी नेत्यांपासून सुरू झालेली राष्ट्रभक्ती आणि सेवाभावाच्या राजकारणाची पालखी अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरलीमनोहर जोशी, कुशाभाऊ ठाकरे आदी अनेक समर्पित नेत्यांनी खांद्यावर घेतली. आज नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने सलग तिसऱ्यांदा स्थापन केलेली आणि सर्वाधिक जनाधार प्राप्त केलेली भाजपाची ४५ वर्षांची वाटचाल ही राजकीय इतिहासातील सुवर्णाक्षरांनी करावी, अशी विलक्षण ठरली आहे. सातत्याने तीन वेळा देशाचे पंतप्रधान होण्याचा बहुमान मोदीजींना मिळाला ही या विलक्षण वाटचालीची फलश्रुती असूनही अजूनही राष्ट्रासाठी, महाराष्ट्रासाठी बरेच काही करावयाचे आहे, ही जाणीव ठेवून जमिनीवर पाय ठेवणाऱ्या या पक्षाची भविष्यातील संकल्प सिद्धीस नेण्याची क्षमता दिवसागणीक वृद्धिंगत होत जाईल, यात शंका नाही. हा कार्यकर्त्यांचाच पक्ष राहिला. तो कोणा परिवाराचा पक्ष नाही. भाजपा व अन्य राजकीय पक्षांतील हा नेमका फरक हेच भाजपाचे वेगळेपण आहे. हे वेगळेपण भविष्यातही तेजस्वीपणाने झळकत राहावे यासाठी वर्धापन दिनाच्या निमित्ताने या राष्ट्रीय पक्षास शुभेच्छा द्यायलाच हव्यात.

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# शेजाऱ्याशी संबंध सुधारण्यावर भर

बांगलादेशमधील अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलिकडेच द्विपक्षीय बैठक घेतली. ढाका येथील सत्तापालटानंतर आणि युनूस यांच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकार स्थापन झाल्यानंतर तसेच बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना भारतात आश्रय दिल्यानंतर दोन नेतृत्वांमध्ये ही पहिलीच बैठक झाली. युनूस यांनी चीनमध्ये जाऊन त्या देशाला भारतातील 'चिकन नेक' परिसरात गुंतवणूक करण्याचा दिलेला सल्ला आणि भारतातील सात राज्यांची सुरक्षा व्यवस्था आपल्यावरच कशी अवलंबून आहे, याबाबत केलेला आगाऊपणा ही पृष्ठभूमी या बैठकीला होती. बिमस्टेक परिषदेसाठी बँकॉकमध्ये आलेल्या या दोन नेत्यांमध्ये झालेली चर्चा ही सुरुवात आहे. चीनअगोदर युनूस यांना भारताचा दौरा करायचा होता; परंतु भारताने प्रतिसाद दिला नाही, असा आरोप बांगलादेशच्या परराष्ट्र मंत्रालयाने केला होता. दररोज भारताविरोधात काही ना काही उपद्व्याप करणाऱ्यांना थोडा धडा शिकवायला हवा होता. तेच काम मोदी यांनी केले. बांगलादेशमध्ये आंदोलन होऊन तिथली हसीना यांची सत्ता उलथवून टाकण्यात आली. हसीना भारतात पळून आल्या. बांगलादेशने त्यांना परत पाठविण्याची मागणी करूनही भारताने जुमानले नाही. त्याचा राग युनूस सरकारला आहे. मोदी आणि युनूस यांच्या भेटीची माहिती देताना परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी म्हणाले, ''पंतप्रधान मोदी यांनी स्थिर, शांत, प्रगतिशील आणि सर्वसमावेशक बांगलादेशसाठी भारताच्या पाठिंब्याचा पुनरुच्चार केला. त्यांनी बांगलादेशशी सकारात्मक आणि रचनात्मक संबंध निर्माण करण्याच्या भारताच्या इच्छेवर भर दिला.''

या चर्चेप्रसंगी पंतप्रधानांनी कोणत्याही वातावरणातील बळजबरी टाळावी. सीमा कायदा आणि बेकायदेशीर सीमा ओलांडणे रोखण्यासाठी सीमा सुरक्षा राखणे आवश्यक आहे, असेही मत व्यक्त केले. हसीना यांना सत्तेवरून हटवल्यानंतर भारत-बांगलादेश संबंध बिघडले आहेत. राजनैतिक वादाच्या तीव्रतेच्या काळात बांगलादेश भारताचे कट्टर प्रतिस्पर्धी चीन आणि पाकिस्तानच्याही जवळ आला आहे. मुस्लिमबहुल बांगलादेश आपल्या अल्पसंख्यक हिंदू नागरिकांचे पुरेसे संरक्षण करण्यात अपयशी ठरल्याचा आरोप भारताने वारंवार केला आहे. युनूस यांच्या काळजीवाहू प्रशासनाने हे आरोप फेटाळून लावले आहेत. या पृष्ठभूमीवर दोन्ही देशांमधील शीर्षस्थ नेत्यांची बैठक होऊन काही मुद्दे मांडले गेले असले, तरी ते एका बैठकीत सुटणार नाहीत; परंतु चर्चेची दारे तरी खुली झाली. दोन देशांच्या



नेत्यांमधील ही बैठक विशेष का आहे, हे स्पष्ट करणारे अनेक घटक आहेत. युनूस भारतविरोधी भूमिका घेत असले, तरी ते मोदी यांना भेटण्यास उत्सुक असल्याचे दिसून आले. तथापि, हे नेते भेटले तेव्हा मोदी गंभीर आणि शांत दिसत होते, तर युनूस यांच्या चेहऱ्यावर हास्य होते. देहबोली पाहता दोघांमध्ये परस्पर विश्वास किंवा सामंजस्य नव्हते.

अलिकडे युनूस यांचा कल चीनकडे झुकलेला दिसतो. त्यांनी २८ मार्च रोजी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांची बीजिंगमध्ये भेट घेतली. ही भेट एक संदेश होती. बांगलादेशशी भारताचे संबंध सध्या तणावाचे आहेत. तो देश आपल्या जुन्या मित्राचे उपकार विसरून नवा मित्र बनवण्यासाठी निघाला आहे. बांगलादेशच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने म्हटले आहे की, युनूस यांनी त्यांच्या पहिल्या विदेश दौऱ्यासाठी चीनची निवड करून भारताला योग्य संदेश दिला आहे. हा संकेत भारतासाठी स्पष्ट होता. चीनला खूश करताना युनूस यांनी मर्यादा ओलांडल्या. भारताच्या ईशान्येकडील राज्यांबद्दल ते असे काही बोलले की, भारताला तीव्र निषेध नोंदवावा लागला. युनूस यांनी चीनला बांगलादेशमध्ये आर्थिक प्रभाव वाढविण्यास सांगितले आणि नमूद केले की, या संदर्भात भारतातील भूपरिवेष्टित ईशान्येकडील राज्ये ही एक संधी ठरू शकतात. चीनचे 'महासागराचा एकमेव संरक्षक' असे वर्णन करताना युनूस म्हणाले की, ही एक मोठी संधी आहे आणि चिनी अर्थव्यवस्थेचा विस्तार होऊ शकतो. त्यांचे हे विधान आगाऊपणाचे होते; परंतु मोदी यांच्या भेटीपूर्वी त्यांनी आपल्या विधानाचा विपर्यास केला गेल्याचे सांगून घूमजाव केले. पाकिस्तान एके काळी बांगलादेशासोबत झगडत होता; दोन देशांमध्ये संघर्ष उभा राहिला होता, मात्र आता संबंध बदलत आहेत.

पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री २२ एप्रिलला बांगलादेशच्या दौऱ्यावर जाणार आहेत. ज्या भारताने पाकिस्तानच्या अनन्वित छळापासून सुटका करण्यासाठी बांगलादेश निर्मितीसाठी मोठी मदत केली, त्याचा बांगलादेशच्या सध्याच्या सत्ताधाऱ्यांना विसर पडला आहे. भारताच्या सुरक्षेसाठी बांगलादेश महत्त्वाचा आहे. कोणतीही आक्रमकता न दाखवता बांगलादेशला आपल्याजवळ ठेवण्याचा सर्वतोपरी प्रयत्न भारत करीत आहे. बांगलादेश हा भारताचा शेजारी आहे आणि त्याच्याशी असलेल्या संबंधांचा भारताच्या सुरक्षेवर प्रभाव पडतो. बैठकीनंतर प्रसारमाध्यमांना माहिती देताना भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी म्हणाले की, ऑगस्ट २०२४ मध्ये हसीना यांची सत्ता गेल्यानंतर लक्ष्य करण्यात आलेल्या हिंदूंसह अल्पसंख्यकांच्या सुरक्षेबाबत पंतप्रधानांनी चिंता व्यक्त केली. आशा आहे की, बांगलादेश अल्पसंख्यकांशी संबंधित हिंसक कृत्यांची सखोल चौकशी करेल. पंतप्रधानांनी आशा व्यक्त केली की, बांगलादेश सरकार आपली जबाबदारी पार पाडेल. आम्ही या बाबी गांभीर्याने घेऊ आणि या प्रकरणांचा योग्य तपास आणि निराकरण होईल याची खात्री करू. युनूस यांचे प्रवक्ते शफीकुल आलम म्हणाले की, बांगलादेशच्या अंतरिम सरकारच्या प्रमुखांनी हसीना सरकारने केलेल्या कथित मानवाधिकार उल्लंघनाचा मुद्दा उपस्थित केला. बांगलादेशमध्ये खटला चालवण्यासाठी त्यांचे प्रत्यार्पण करण्याच्या विनंतीला प्रतिसाद देण्याचे साकडे घातले. बैठकीत त्यांनी भारतीय सुरक्षा दलांकडून सीमेवर होणाऱ्या हत्यांचा मुद्दाही उपस्थित केला आणि त्या थांबवता येतील, अशी आशा व्यक्त केली. युनूस म्हणाले की, बांगलादेश भारताशी असलेल्या संबंधांना खूप महत्त्व देतो. १९७१ मध्ये आमच्या अत्यंत आव्हानात्मक काळात भारत सरकार आणि लोकांच्या अतुलनीय पाठिंब्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत.

दरम्यान, पाकिस्तान आणि अफगाणिस्तानप्रमाणेच बांगलादेशही अराजकतेमध्ये 'बहिष्कृतांचे घर' बनू शकतो. याचा अर्थ इथे जगभरातून पळून आलेल्या दहशतवाद्यांना आश्रय मिळू लागला आहे. म्हणूनच भारताला सीमेपलीकडून होणाऱ्या सर्व प्रकारच्या तस्करीवर बारीक नजर ठेवावी लागेल. मग ती माणसे, गुरेढोरे, सोने असो किंवा शस्त्रे असोत. बांगलादेशमध्ये लष्कर आणि अतिरेकी यांचे कॉकटेल तयार केले जात आहे. भारताला त्यावरही बारीक लक्ष ठेवावे लागेल.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# सीबीएसई पॅटर्नची घंटा वाजली

आजच्या काळात शिक्षण घेऊन सरकारी नोकरी, चांगल्या नामवंत कंपनीत मोठ्या वार्षिक उद्दिष्टाचा पगार, इंजिनीयर, डॉक्टर, संशोधन क्षेत्रात नवनवीन प्रयोग करून स्वतःच्या उदरनिर्वाहासोबतच कुटुंबाची जबाबदारी सांभाळण्याचे स्वप्न आजचा तरुण उरशी बाळगतो. शिक्षण पद्धतीत दरवर्षी बदलणारे धोरण, अभ्यासक्रम याकडे लक्ष केंद्रित केले असता राज्यातील अभ्यासक्रम आता सीबीएसई अभ्यासक्रम होणार आहे. महाराष्ट्रातील शाळांमध्ये स्टेट बोर्डऐवजी सीबीएसईचा अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी जाहीर केला आहे. कोणताही निर्णय घेण्यापूर्वी काही शाळांमध्ये या अभ्यासक्रमाचा प्रयोग करणे आवश्यक आहे. शहरी व ग्रामीण भागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी व शिक्षण संस्था, सरकारी शाळा, शिक्षण क्षेत्रात श्रीमंत आणि गरीब शिवाय मध्यमवर्गीय पालकांच्या शाळा, त्यांची गुणवत्ता सोयीसुविधा अशी फार मोठी तफावत पाहायला मिळते. सीबीएसई अभ्यासक्रम शिक्षण व्यवस्थित पुढील वर्षात राबवणाऱ्या शाळा दर्जेदार, अनुभवी शिक्षक त्यांना संबंधित अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देणे आवश्यक असून, या संदर्भात शिक्षण विभागाने संशोधन करून त्यानंतर अशा शाळांची निवड करण्यास हरकत नाही. राज्यात अत्यंत दर्जेदार अभ्यास तयार करणारी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद संस्था आहे. बालभारतीसारखी या अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तके तयार करणारी अनुभवी संस्था आहे. त्यामुळे सीबीएसई अभ्यासक्रमाचा शाळांना आग्रह करणे अयोग्य व संस्थावर



अविश्वास दाखविणारे ठरते. ग्रामीण व शहरी भागात जिल्हा परिषद, नगरपालिका शाळांची खाजगी शाळांनी पार वाट लावली आहे. वीस वर्षांपूर्वी मुलगा, मुलगी चार-पाच वर्षांचे झाले की, बालवाडी, कॉन्व्हेंटमध्ये शिक्षणाची सवय व आवड निर्माण होण्यासाठी पालक पाठवीत होते, आता चित्र बदलले आहे. अडीच वर्षाच्या खेळण्याच्या, बागडण्याच्या वयात आजी, आजोबा ऑटोरिक्षात अक्षरशः कोंबून आपल्या नातवंडांना शाळेची वाट दाखवितात. आजही अनेक शाळांमध्ये शैक्षणिक वातावरणासाठी लागणाऱ्या भौतिक सुविधांची प्रचंड कमतरता जाणवते. शिक्षकांची रिक्त पदे, प्रशिक्षित शिक्षकांचा अभाव अशा उणिवा पूर्ण करण्यासाठी शासन, प्रशासनाने पुढाकार घ्यावा. एखादा अभ्यासक्रम राबविण्यापूर्वी शिक्षकांची क्षमता, त्यांना योग्य प्रशिक्षण, आवश्यक संगणकीय सोयी सुविधा, मोफत पाठ्यपुस्तके योजनांद्वारे मुलांना या पॅटर्नची पाठ्यपुस्तके विशेष करून सरकारी शाळांना पुरवणे, विद्यार्थी गणवेशाची दरवर्षी होणारी ओरड, अनियमित्ता याकडे लक्ष केंद्रित केले तर गोरगरीब आर्थिक परिस्थिती शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही फार मोठी उपलब्धता ठरणार आहे. केंद्र सरकारने नवीन शैक्षणिक धोरण आणले आहे. ग्रामीण भागात तांडा वस्ती शाळा पटसंख्येच्या नियमावलीनुसार विद्यार्थ्यांना समूह शाळांमध्ये वाहन भत्ता, सायकल, शिक्षण हक्क कायद्यानुसार गाव तिथे शाळा, वस्ती शाळा सुरू झाल्या आहेत. याशिवाय विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण घेता यावे यासाठी ऑनलाईन उपलब्ध करून दिले आहे. अति दुर्गम भागात ऑनलाईन शिक्षण पद्धतीसाठी इंटरनेट सुविधा पोहोचण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने पुढाकार घेतला आहे. डिजिटल शाळा खोल्यांमध्ये आभासी पद्धतीने शिक्षण घेण्यासाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध असणार आहे. शाळेचे वीज बिल, इंटरनेट सुविधा सरकार पुरवणार असून शिक्षण क्षेत्रात सुद्धा भारत जगात आघाडीवर आणण्याचे स्वप्न विविध पॅटर्न संशोधनावर आधारित शिक्षण पद्धतीचा अवलंब करण्यावर केंद्रशासन सर्व सुविधा देणार आहे. विद्यार्थ्यांचा कल देशभरात वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षणाकडे मोठ्या प्रमाणात वाढला आहे. ग्रामीण भागात या विषयाची शिक्षण देणारी यंत्रणा सज्ज झाली आहे. जेईई व नीट अभ्यासक्रम याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढल्याने सीबीएसई पद्धतीच्या गुणवत्तापूर्वक शिक्षण धोरणाचा अवलंब करताना शाळा व शिक्षकांवर लादलेला व शैक्षणिक कामाचा बोजा कमी करून सीबीएसईसारख्या पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रमाचे प्रशिक्षणासोबतच क्रीडा, सांस्कृतिक, पर्यावरणपूरक शिक्षणाची गरज आजच्या विद्यार्थ्यांना निर्माण झालेली आहे.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# बढतीबद्दल बोलू काही...

मार्च आणि एप्रिल महिना म्हटले की कर्मचाऱ्यांना वेध लागतात ते पगारवाढीचे, बढतीचे. आपल्याला घसघशीत पगारवाढ यंदा मिळाली पाहिजे, अशी प्रत्येक कर्मचाऱ्याचीच अपेक्षा असणे साहजिकच आहे. अशावेळी व्यवस्थापनाबरोबरच कर्मचाऱ्यांनीही आपल्या कामाचा, प्रगतीचा मागोवा घेणे क्रमप्राप्त ठरते.

केंद्रीय अर्थसंकल्प सादर होऊन नवे आर्थिक वर्ष सुरू होण्याच्या सुमारास उद्योग-व्यवसाय क्षेत्रात त्यावर विश्लेषण-चर्चा सुरू होती. त्यानंतर उद्योग-व्यवसाय क्षेत्रात तयारी सुरू होते, ती नव्या आर्थिक वर्षातील नव्या आर्थिक गणितांसह नव्या व्यवसाय नियोजनाची व त्यानुसार योजना आखणीची. याच काळात कंपनी व कर्मचारी स्तरावर पण एका महत्त्वाच्या व जिव्हाळ्याच्या विषयावर चर्चा सुरू होते व हा विषय असतो कर्मचाऱ्यांची पगारवाढ व बढतीचा. कंपनीच्या दृष्टीने हा मुद्दा व्यावसायिक धोरणात्मक निर्णयांसह व्यावसायिक व व्यक्तिगत स्तरावर विविध संदर्भातील गुंतवणुकीचा असतो, तर कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने त्यांनी वर्षभर केलेल्या कामकाजाचे नेमके मूल्यमापन करून त्यानुसार त्यांच्या पगारवाढ व बढतीच्या संदर्भात जिव्हाळ्याचा ठरतो. म्हणूनच कर्मचाऱ्यांच्या पगारवाढ व बढती, पदोन्नती हे मुद्दे उद्योग-व्यवसायात उभयपक्षी महत्त्वाचे ठरतात.

यासंदर्भात मूलभूतदृष्ट्या पाहता असे लक्षात येते की, कंपनीतील कर्मचाऱ्यांची त्यांचे कामकाज, कामाच्या संदर्भातील जबाबदारी, भविष्यातील कामाचे स्वरूप व त्यातून संबंधित कर्मचाऱ्याची करीअर विकासासह आर्थिक प्रगती इत्यादीचा थेट व प्रत्यक्ष संबंध त्यांच्या कामाचे मोजमाप व बढती व पदोन्नतीशी असतो, तर कंपनी व्यवस्थापनाला दुहेरी मापदंडांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. एक म्हणजे, गेल्या वर्षातील व सध्याची व्यापार-व्यवसाय स्थिती, आर्थिक परिस्थिती, शासकीय व व्यावसायिक धोरणाचे होऊ घातलेले प्रमाण आणि परिणाम महत्त्वाचे ठरतात.

कर्मचाऱ्यांच्या प्रगतीच्या दृष्टीने महत्त्वाचे व मोठे मुद्दे म्हणून व्यक्तिगत स्तरावर कर्मचाऱ्यांची पगारवाढ व त्यांची बढती-पदोन्नतीकडे पाहिले जाते. ते स्वाभाविकपण आहे. मात्र, त्यासंदर्भात संबंधित कर्मचाऱ्याने आपल्या कामाचा मागोवा घ्यायला हवा. यासाठी खालील मुद्दे उपयुक्त ठरू शकतील.

**प्रगतीची मानसिकता** : यासंदर्भात सर्वांत मोठा व महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कर्मचारी म्हणून संबंधित व्यक्तीमध्ये आपल्या करीअर-प्रगतीची वाढ कितपत आहे? ही बाब यासंदर्भात अधिक महत्त्वाची ठरते. कारण, कंपनी व्यवस्थापनाकडून कर्मचाऱ्याच्या कामकाजासंदर्भात उद्दिष्टपूर्तीची अपेक्षा असते. यासाठी व्यवस्थापन स्तरावर व त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांसाठी वैयक्तिक स्तरावर संबंधित कालावधी व आर्थिक वर्षात गाठण्यासाठी काही उद्दिष्टे विविध पातळींवर व विविध स्वरूपात निश्चित केली जातात. आपल्याशी व आपल्या कामाशी संबंधित उद्दिष्टे कर्मचारी कशी, कितपत व कशाप्रकारे वा पद्धतीने पूर्ण करतात, यावरच संबंधित कर्मचाऱ्याच्या कामाचे वार्षिक मूल्यमापन केले जाते. हे सारे होण्यासाठी कर्मचारी म्हणून प्रत्येकाचे आपले मुख्य उद्देश व कामकाजाचे टप्पे समजून घेणे आवश्यक असते. यालाच जर प्रयत्न, जिद्द व प्रयोगशील धडपडीची जोड दिली, तर त्यातून कर्मचाऱ्याची प्रगतीविषयक मानसिकता तयार होऊ शकते.

**करीअरविषयक प्रगतीची गती** : वर नमूद केल्याप्रमाणे कर्मचाऱ्याच्या वैयक्तिक प्रगतीविषयक इच्छा, आकांक्षांना गतिमानतेची जोड मिळायला हवी. सध्याच्या स्पर्धात्मक व गतिमान काळात प्रत्येकाचे प्रयत्नसुद्धा गतिमान असायला हवे. त्यासाठी कर्मचारी स्तरावर आपल्या प्रयत्नांना प्रयोगशीलता, कौशल्यवृद्धी, संशोधन, सक्षम कामकाज इत्यादींची जोड दिल्यास कर्मचाऱ्यांची करीअर वाढीसह प्रगतीसुद्धा तुलनेने लवकर होऊ शकेल.

**कामात पुढाकार** : प्रत्येकाच्या कामाकाजाच्या ठिकाणी व कामाच्या संदर्भात व्यक्तिगत स्तरावर कर्मचाऱ्याने पुढाकार घेण्यावर बऱ्याच बाबी अवलंबून असतात. यामध्ये वाढत्या व नव्या प्रकारच्या कामाचा समावेश असू शकतो. या नव्या व प्रसंगी आव्हानपर कामांचा स्वीकार करून प्रसंगी त्यासाठी पुढाकार घेणाऱ्यांची व्यवस्थापक व व्यवस्थापनातर्फे वेगळ्या पद्धतीने नोंद घेतली जाते. यातून वरिष्ठांना विश्वास व स्वतःचा आत्मविश्वास वाढत असल्याने व्यक्तीच्या पुढाकार घेण्याची पद्धती व मानसिकतेवरच बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात, हे लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते.

**कामाची नोंद आणि दखल** : कर्मचारी म्हणून आपल्या नित्याच्या व दैनंदिन कामाशिवाय नवी व विशेष उल्लेखनीय कामे करणाऱ्यांच्या कामगिरीची नोंद वेळेत, योग्य प्रकारे व योग्य स्तरावर घेतली जाणे महत्त्वाचे ठरते. यासाठी व्यक्तिगत स्तरावर प्रयत्न पूरक ठरतात. त्यामुळे विशेष कामगिरी वा उद्दिष्टपूर्तीची वा यशस्वी प्रयोग प्रयत्नांची मांडणी करण्याचे व त्यासंदर्भात आपल्या वरिष्ठांना वेळेत सूचित करणे फायद्याचे ठरते. त्यासाठी विशेष प्रयत्न वा परिश्रम करावे लागतात. या साऱ्याची योग्यप्रकारे नोंद आणि दखल कर्मचाऱ्यांच्या प्रगतीसाठी उपयुक्त ठरते.

**परिश्रमांची परिणामकारकतेशी सांगड** : सध्याच्या काळात कामाच्या ठिकाणी केवळ परिश्रम घेणेच पर्याप्त नसते, तर त्याला परिणामकारक बनविणे तेवढेच आवश्यक असते. यामध्ये कामाच्या अचूकतेतून आत्मविश्वास निर्णयक्षमतेतून नेतृत्व निर्मिती, चोखंदळपणा वापरून दर्जात्मक काम बनविणे, संवादातून प्रभावी सादरीकरण, वारंवारचे वादविवाद टाळून आपली स्वीकारार्हता वाढविणे, प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्नशील असणे, अंतर्गत विवादांमध्ये अनावश्यक गुंतवून न घेणे हे मुद्दे लक्षात ठेवून त्यानुरूप काम करणारे कामाच्या संदर्भात इतरांच्या तुलनेत अधिक परिणामकारक ठरतात व ही बाब त्यांच्या प्रगतीला पूरक ठरते.

**उपस्थितीचा फरक** : विशिष्ट व्यक्ती वा कर्मचारी कामावर असल्याने काय होते, हे तर सर्वांना सहजगत्या कळते. मात्र, अशी व्यक्ती नसल्याने काय होऊ शकत नाही, याचा अनुभव सर्वांना येण्यावरच कर्मचाऱ्यांची व्यक्तिगत स्तरावरील विशेष उपयुक्तता सिद्ध होते.

**कामाचा व्याप आणि व्यापकता** : कर्मचारी म्हणून व्यक्तिगत स्तरावरच नव्हे, तर व्यवस्थापकांकरवी प्रत्येकाच्या कामाच्या व्यापाची मोजमाप केली जाते. प्रसंगी त्यावर चर्चा करून त्याचे मूल्यांकन केले जाते. मात्र, कर्मचाऱ्यांचा अनुभव जसजसा वाढतो, त्यांची जबाबदारी वाढते व त्यानंतर त्यांच्या कामाच्या व्यापाचीच नव्हे, तर व्यापकतेची चर्चा केली जाते व त्यावरसुद्धा त्यांची पगारवाढ व भविष्यकालीन बढतीच्या संधी उपलध होतात.

यासंदर्भात थोडक्यात पण तेवढेच महत्त्वाचे म्हणजे, अपेक्षित पगारवाढ असो की, प्रतीक्षित बढती, पदोन्नती ही बाब प्रत्येकासाठी महत्त्वाची व तेवढ्याच जिव्हाळ्याची असली, तरी ती मागून मिळत नाही. त्यासाठी स्वतःच्या परिश्रम-प्रयत्नांना संबंधितांची साथ, मार्गदर्शन घ्यावे लागते. त्याला पण कर्मचाऱ्याची काम करण्याची पद्धत व विशेष उल्लेखनीय उद्दिष्टपूर्ती यांची वेळेत जोड द्यावी लागते व असे झाल्यास बढतीच्या संधी मिळू शकतात.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### जीवनात संयम महत्त्वाचा

संयम हा मानवी जीवनाचा एक महत्त्वपूर्ण गुण आहे. जीवनात यशस्वी होण्यासाठी, तणावांवर विजय मिळवण्यासाठी आणि समाजात सन्मान मिळवण्यासाठी संयम आवश्यक आहे. संयम म्हणजे आपले विचार, वर्तन आणि भावनांवर ताबा ठेवणे. संयमाचे मुख्य घटकांपैकी एक म्हणजे आत्मनियंत्रण. कोणत्याही परिस्थितीत तडक प्रतिक्रिया न देता संयमाने विचार करणे महत्त्वाचे असते. असे केल्याने निर्णय योग्य आणि परिणामकारक होतात. तणावपूर्ण परिस्थितीत संयम राखणे कठीण असते, परंतु संयमामुळे तणाव कमी होतो. संयमाने विचार केल्यास परिस्थितीचे योग्य मूल्यांकन करता येते आणि समस्येचे समाधान शोधता येते.

अनेकदा रागावून किंवा भावनांच्या भरात आपण चुकीचे शब्द वापरतो. संयमामुळे नात्यांमध्ये समजूतदारपणा येतो आणि मतभेदांवर तोडगा काढता येतो. संयमामुळे माणूस अधिक शिस्तबद्ध आणि जबाबदार बनतो. संयमामुळे विचारशीलता आणि शांतीची भावना निर्माण होते, जी समाजासाठीही आदर्श असते. संयम म्हणजे आपल्या विचारांवर, भावनांवर आणि कृतींवर ताबा ठेवणे. जीवनातील यश, आनंद आणि शांततेसाठी संयम अतिशय महत्त्वपूर्ण आहे. क्रोध, चिंता किंवा तणाव यावर संयम ठेवल्यास मानसिक स्वास्थ्य चांगले राहते. संयमामुळे संवादात सौम्यता येते. राग, मत्सर आणि अहंकारावर संयम ठेवून आपण चांगले नाते जपू शकतो. खर्च करण्यावर संयम ठेवल्यास आर्थिक स्थैर्य प्राप्त होते. बचतीची सवय लागते आणि भविष्य सुरक्षित होते. संयम जीवनाला दिशा देतो. हे गुण आपल्या व्यक्तिमत्त्वात रुजवले, तर प्रत्येक क्षेत्रात यश आणि समाधान मिळवता येते. माणसाच्या जीवनात संयम राखल्याने एखादी कठीण समस्या सुटली जाते व तिचा आनंद कायमचा व दीर्घकाळ टिकतो, म्हणजेच यशाचा मार्ग संयम, चांगली कामे होण्यासाठी थोडा वेळ जाऊ द्यावा लागतो तरच त्याचा अनुभव आपल्याला घेता येतो, संयमाचा परिणाम आरोग्यावरही होतो. संयम राखल्याने तणाव कमी होतो, त्यामुळे मानसिक स्वास्थ्य सुधारते. तसेच, संयमाने खाण्यापिण्याच्या सवयी सुधारतात, जे शारीरिक स्वास्थ्यासाठी लाभदायक आहे. संयमाचे महत्त्व ओळखून त्याचा अंगीकार केल्यास जीवन अधिक समृद्ध होऊ शकते.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

### भूकंपाची पूर्वसूचना देणाऱ्या यंत्रणांची गरज

नुकत्याच झालेल्या म्यानमारच्या भूकंपाचा थरार बऱ्याच गोष्टींसाठी धक्कादायक ठरतो. कारण आतापर्यंतच्या वेगवेगळ्या भूकंपांमध्ये भूस्खलन होण्याचेही प्रकार पाहायला मिळाले आहेत. अगदी आपल्या महाराष्ट्रातल्या लातूर जिल्ह्यात झालेल्या भूकंपाच्यावेळी एक अख्खे गावच भूगर्भात गडप होण्याचा प्रकार घडला होता. मनुष्याला नेहमी आपल्या बुद्धीचा अहंकार असतो आणि बुद्धीच्या जोरावर या संकटांवरही मात करण्याची त्याची इच्छा असते. परंतु ते प्रत्येकवेळी शक्य होत नाही. ज्या तंत्रज्ञानाचा किंवा आधुनिक पद्धतीचा वापर करून टोलेगंज इमारती बांधल्या जातात. ज्यामध्ये भूकंप विरोधक यंत्र वापरले जातात. असे तंत्र वापरूनही बँकॉक, म्यानमारमधल्या अनेक इमारती जणूकाही भुसभुशीत जमिनीवर बांधल्या आहेत की, काय अशा प्रकारे कोसळल्या आहेत. म्हणजेच भूकंपविरोधी तंत्रसुद्धा याठिकाणी अपयशी ठरल्याचे दिसते. बँकॉकसारख्या शहरात अनेक पर्यटक जात असतात. पण सुदैवाने हा भूकंप सकाळी झाल्याने जीवितहानी बऱ्यापैकी टळली. मात्र आपल्यासोबत आपण ज्या इमारतीत काम करतो ती इमारत पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळताना पाहून संबंधितांना किती धक्का बसला असेल याची आपण कल्पना करू शकतो. म्यानमारच्या लगत असलेल्या चीनमधल्या काही भागांना, तर भारतातल्या मणिपूर, नागालॅण्ड या परिसरातही भूकंपाचे धक्के जाणवले. आपत्ती निवारण यंत्रणा कितीही सज्ज असली आणि तिचे प्रमाण कितीही मोठे असले तरी अशा नैसर्गिक आपत्तीत त्यांच्या मदतीवरही मर्यादा येतात. कारण या आपत्ती निवारण केंद्रांना स्वतःला वाचवत इतरांचेही जीव वाचवायचे असतात. म्हणूनच सुरुवातीला काही काळात मदत यंत्रणांच्या कामाला वेग येऊ शकला नव्हता. आर्थिक किंवा जीवितहानी किती झाली याची मोजदाद तर येणाऱ्या काळात होईल. परंतु भूकंपाचा हा नवा अवतार सगळ्या जगालाच नवा धडा देणारा ठरू शकतो.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### सोनिया गांधींचे बेजबाबदार वक्तव्य

काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी, वक्फ विधेयक सरकारने मनमानी पद्धतीने पारित केलेले वक्तव्य केवळ दुर्दैवीच नाही तर निंदनीय आहे. हा 'वक्फ बोर्ड दुरुस्ती कायदा' संसदीय समितीची संमती, लोकसभेत, राज्यसभेत चर्चा व मतदान या सर्व कायदेशीर प्रक्रियेतून पार पडल्यानंतर पारित झाला असताना, तो सरकारने मनमानी पद्धतीने पारित केला म्हणणे, अज्ञानमूलक व भारतीय लोकशाहीवर अविश्वास व्यक्त करणारे आहे. काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षनेत्याला न शोभणारे हे वक्तव्य आहे. समाजातील सर्व स्तरावरून अशा बेजबाबदार विधानांचा निषेध व्हायला हवा.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...



### पिण्याचे स्वच्छ पाणी द्या, नाहीतर विष द्या; मनपा उपायुक्तांना निवेदन

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

सोलापूर शहरातील कुचन नगर परिसरात आज नळाला गढूळ काळे पाणी आले. त्यामुळे त्या पाण्याची बाटली घेऊन सर्व नागरिक, महिला यांनी अध्यक्ष विष्णु कारमपुरी यांच्या नेतृत्वाखाली मनपा उपायुक्त आशिष लोकरे यांना निवेदन दिले. आम्हाला पिण्याचे स्वच्छ पाणी द्या नाहीतर विष द्या अशी मागणी केली. गंभीर दखल घेवून स्वच्छ पाणीपुरवठा करुन सहकार्य करावे अन्यथा मनपा कर्मचाऱ्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही, असा इशारा दिला. यावेळी शिष्टमंडळात यशोदा गुंडेटी, राधिका मिट्टा, पद्मा मॅकल, लक्ष्मीबाई इप्पा, रेखा आडकी, पल्लवी येमुल, कल्पना येमूल, विश्वनाथ राठोड, विठ्ठल कुराडकर, प्रसाद जगताप, रमेश चिलवेरी, श्रीनिवास बोगा, गुरुनाथ कोळी, प्रशांत जक्का यांच्यासह कुचन नगर परिसरातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### गांधीनाथा फार्मसी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची गुजरातच्या कंपनीमध्ये निवड

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी नावारूपाला आलेले गांधीनाथा रंगजी कॉलेज ऑफ फार्मसी या विद्यार्थ्यांचे गुजरात येथील ग्लोबल हेल्थकेअर प्रा.लि.वडोदरा या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये विद्यार्थ्यांचे मेडिकल कोडींग या पदासाठी निवड करण्यात आलेली आहे. अंतिम वर्षातील बी फार्मसीच्या एकूण ६२ विद्यार्थ्यांनी यासाठी मुलाखती दिल्या. त्यापैकी एकूण १५ विद्यार्थ्यांची यशस्वी निवड करण्यात आली आहे. या मुलाखतीचे आयोजन महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून करण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी महाविद्यालयाने या मुलाखतीचे आयोजन केले आहे असे मत प्राचार्या डॉ. सौ रश्मी तांबे मॅडम आणि फार्मसी विभागाचे प्रमुख श्री गजेंद्र लाड सर यांनी मांडले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना सर्व शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष श्री संजयभई गांधी सर यांनी कौतुक केले.

# रस्ते व पालखीतळ दुरुस्तीचे प्रस्ताव दोन दिवसात सादर करा

## ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे; 'आषाढीवारी' पूर्वतयारीचा आढावा घेतला

**पुणे, दि. ७ एप्रिल-**

पालखी सोहळ्यात वारकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी स्वच्छ, शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासह पालखी मार्गावरील रस्ते, पालखीतळ दुरुस्तीसाठीचे प्रस्ताव दोन दिवसांत सादर करा. पालखी मार्गावरील रस्ते दुरुस्तीच्या अडचणीवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून रस्त्याच्या कामांना मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन ग्राम विकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आषाढीवारी पूर्वतयारी आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, अपर आयुक्त अरुण आनंदकर, उपायुक्त विजय मुळीक, नितीन माने, दत्तात्रय लांघी, तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे सातारा, सोलापूर, नाशिक व जळगाव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व पोलीस अधीक्षक उपस्थित होते. मंत्री श्री. गोरे म्हणाले, प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी, पालखी मार्ग व विसावा स्थानांवर स्वच्छता राखली जाईल याची विशेष खबरदारी घ्यावी. स्वच्छतेसाठी पुरेशा प्रमाणात फिरती शौचालये आणि अधिक प्रमाणात स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. टँकरमधील पाण्याच्या शुद्धतेबाबत नियमित तपासणी करावी. पाण्याच्या स्रोतांचे शुद्धीकरणही निटपणे होईल याकडे लक्ष द्यावे. पालखी मार्गावरील रेस्टॉरंट, हॉटेल्स यांची स्वच्छता व अन्न शुद्धतेची खात्री करावी. तसेच पंढरपूर शहरातील कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ व वाहनांची व्यवस्था करावी, पंढरपूर शहरात सोलापूर जिल्हा परिषद व पोलीस प्रशासनाने ड्रोनद्वारे नियंत्रण ठेवण्यासाठी संयुक्त व्यवस्थापन यंत्रणा तयार ठेवावी, वारीदरम्यान देण्यात आलेल्या कामंसाठी कंत्राटदारांकडून अटी व शर्तीचे पालन करुन कामे होण्यासाठी त्यांच्यावर शासकीय यंत्रणेने अंकुश ठेवावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. ग्रामपंचायतींना आगाऊ निधी देण्याची व्यवस्था करण्यात येईल असे सांगून पालखी सोहळ्यादरम्यान पिण्याचे पाणी, आरोग्य आणि स्वच्छतेसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाहीदेखील श्री.गोरे यांनी दिली.



विभागीय आयुक्त श्री. पुलकुंडवार यांनी सादरीकरणाद्वारे करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती दिली. स्वच्छ आणि निर्मल वारीसाठी विशेष नियोजन करण्यात आले असून पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासणी, प्रथमोपचार पेट्या, निवारा केंद्र, हिरकणी कक्ष आदी सुविधांसोबत वारकऱ्यांना आरोग्य सुविधा देण्यात येणार असल्याचे सांगून स्वच्छ, निर्मल व सुरक्षित वारीसाठी सर्व विभागांनी समन्वय ठेऊन दिलेल्या सूचनांचे पालन करावे तसेच स्थानिक प्रशासनाशी समन्वय ठेऊन पोलीस वाहतूक विभागाने पाण्याचे टँकर पालखी तळ व विसाव्याच्या ठिकाणी वेळेत पोहोचतील याची खबरदारी घ्यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी मंत्री श्री. गोरे यांनी आषाढीवारीच्या अनुषंगाने सर्वच जिल्ह्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. पुणे, सातारा, सोलापूर, नाशिक व जळगाव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पूर्वतयारीची माहिती दिली.

# हत्तुरे वस्तीत रामनवमी पालखी मिरवणूक




**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

विश्व हिंदू परिषद बजरंग दलच्या वतीने विमानतळ येथील हत्तुरे वस्ती येथे भव्य श्री राम नवमीनिमित्त पालखी मिरवणूक काढण्यात आली. त्यावेळी दुर्गा वाहिनी व विश्व हिंदू परिषदच्या साहसी पथकांनी मर्दानी खेळ सादर केला

हतुरे वस्ती परिसरात सकाळी पालखी मिरवणूक काढण्यात आली. तत्पूर्वी श्री रामांच्या प्रतिमेची स्थापन करण्यात आली. त्यानंतर रक्तदान शिबिर घेण्यात आले. त्यामध्ये ८२ रक्तदात्यांनी सहभाग घेतला व १० वाजता महिला गीता मंडळाचा कार्यक्रम झाला. ११ वा हभप हरिप्रसाद धर्माधिकारी यांचे श्री रामांच्या जीवनावरती आधारित आजची कुटुंब व्यवस्था यावर व्याख्यान झाले. दुपारी १२ वाजता पाळणा, गुलाल व आरती घेण्यात आली. हत्तुरे वस्तीचे सामाजिक कार्यकर्ते महेश हत्तुरे व होटगी रोड किर्लोस्कर कंपनीचे एच.आर. मॅनेजर ऋषिकेश कुलकर्णी यांच्या हस्ते महाप्रसाद वाटप करण्यात आले. त्यावेळी महाराष्ट्र पोलीस मित्र संघटनेचे महाराष्ट्रचे संस्थापक दिनेश कुलकर्णी, पोलीस मित्र संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष महेश आठवले, आखिल भारतीय जैन संघटनेचे शाम पाटील, आरपीआयचे अध्यक्ष दिपक उडानशिव, विश्व हिंदू परिषदचे जिल्हाप्रमुख जयदेव सुरवसे, अनंत खिलजे, राम मोरे, प्रविण केवडकर उत्सव समितीचे महेश पाटील व समितीचे बसवराज भूषण, मंडळाचे उपाध्यक्ष आप्पू कांबळे, सुरज मोरे, सामाजिक कार्यकर्ते धनंजय कारंडे, युवा उद्योजक सिद्धाराम डोमनाळे उपस्थित होते. पाळण्याचे आयोजन सह्याद्री महासंघ महिला मंडळाच्या वतीने रचना सुरवसे, जगदाळे व संगीता भावार्थी यांनी केले. यासाठी बजरंग दलचे परशुराम कांबळे व कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# युवतींनी आरोग्याबद्दल सतर्क असावे : डॉ. माधुरी दबडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

वयात आल्यावर मासिक पाळी येणे, कधी कधी पोट दुखणे यामुळे घाबरून जाण्याचे कारण नाही. आपले दैनंदिन काम चालू ठेवावे पण १८ वर्षानंतरही पाळी न आल्यास रक्तस्राव वाढत गेल्यास, योनी मार्गात खाज सुटत असल्यास तज्ञ डॉक्टरकडे जा, सैल कपडे वापरा, शरीरातील कॅल्शियमची, हाडाची, थायरॉईडची तपासणी करुन घ्या. त्यामध्ये कमतरता आढळल्यास वेळीच उपचार करुन घेतल्यास समाधानीवृतीने जगण्याची तयारी ठेवल्यास आरोग्याची तंदुरुस्ती ठेवता येते कारण त्या पुढच्या भावी माता असतात म्हणून युवतींनी आरोग्याबद्दल सतर्क असावे असे प्रतिपादन सुप्रसिध्द स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्रतज्ञ डॉ. माधुरी दबडे यांनी केले. त्या जागतिक आरोग्यदिनानिमित्त राणी




चन्नम्मादेवी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) सोलापूर व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्यविषयक प्रबोधन शिबीरात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते. यावेळी मंचावर आर. एम. कंपली, प्राचार्य डॉ. ए.के. जाधव, फॅमिली सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन.बी. तेली, डॉ. समन खान-तांबोळी, स्वाती पुकाळे, आरीफ शेख उपस्थित होते. डॉ. समन खान-तांबोळी यांनी युवतींनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. प्रारंभी प्रा. डॉ. एन.बी. तेली यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

तमन्ना शेख यांनी सूत्रसंचालन केले. आर. एम. कंपली यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनीषा चव्हाण, आकाश गायकवाड, कल्पना गडगडे, सुकेशनी सोनकांबळे यांनी परिश्रम घेतले.

# सोलापूरचे भक्त करतात तिरुपतीची 'परकामनी सेवा'

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.७ एप्रिल-**

तिरुमला तिरुपती मंदीरात देवस्थानकडून अनादिकाळापासून परकामनी सेवा चालू आहे. परकामनी म्हणजे भक्तांनी श्रीवारी हुंडीत घातलेल्या पैशांची मोजणी होय. या सेवेसाठी सोलापूरातून दर तीन महिन्यास काहीजण सेवेस जातात त्यामध्ये लक्ष्मीकांत दंडी यांच्यासह देविदास मेरगू, उमाकांत मिठ्ठापल्ली, सत्यानारायण बरदेपूरकर, अशोक कांबळे हि सेवा ३० वर्षापासून करत आहेत. दर तीन महिन्याला ही सेवा त्यांना मिळते.



वेंकटेश्वरच्या लग्नाला कुबेराने कर्जाच्या रूपात पैसे दिले. सदर पैसे कलियुग संपेपर्यंत कुबेराला देण्याचे आहेत अशी कथा सांगितली जाते. हुंडी मध्ये घातलेले पैसे मोजण्यासाठी पूर्वी तीन भक्तांना साक्षीदार म्हणून घ्यायचे. परंतु सध्या ही साक्षीदार सेवा ऑनलाईन नोंदवली जाते. त्यासाठी २५० लोकांना साक्षीदार सेवक म्हणून नेमतात. त्या सेवेमध्ये सरकारी कर्मचारी व बँक कर्मचाऱ्यांना परवानगी असते. सदर सेवा तीन ते चार दिवसाची असते. प्रथम आपले प्रोफाइल तयार करावे लागते. नंतर श्रीवारी सेवा या ॲप मध्ये जाऊन लॉगिन करून त्यामध्ये आपल्याला तारीख, बॅच टाईमचा उल्लेख करावा लागतो. काही दिवसानंतर जी तारीख दिली त्या तारखेला उपस्थित राहणे गरजेचे असते. सोबत आधार कार्ड, पॅन कार्ड, फोटो, शासनाचे किंवा बँकेचे आयकार्ड घेऊन जाणे बंधनकारक असते. परकामनी सेवेसाठी तिरुमला येथे सेवासदन बिल्डिंगमध्ये राहण्याची सोय करतात. सेवा पद्धत व नियम समजाऊन सांगतात. त्याप्रमाणे सेवा करता येते. सदर सेवा दोन शिफ्ट मध्ये असते. सेवा काळात अंगठी, हार, हातातला दोरा, कानातले रिंग, इतर कुठलेही वस्तू अंगावर चालत नाही.

जन्माला यावे तर तिरुपती पहावे असे म्हणतात. परकामनी सेवा केल्यास माणूस तृप्त होतो. जेव्हा परकामनी भवनात आपला प्रवेश झाल्यावर आपल्या समोर श्रीवारी हुंडीमध्ये घातलेले पैसे काढले जातात तेव्हा जगभरातून विविध देशाच्या नोटा हुंडी मध्ये



घातलेल्या दिसतात. हुंडीमध्ये रुपये, पैसे, सोने, चांदी, हिरे, पाचू, मोती, मंगळसूत्र, देवाला लिहिलेले भक्तांचे पत्र, केस, नवीन उत्पादन केलेले वस्तू, लग्नपत्रिका, वर्षभर गोळा केलेली गल्ला पेटी, तांदूळ, अशा विविध वस्तू हुंडीत टाकलल्या दिसतात. आपली सेवा संपल्यावर तिरुमला तिरुपती देवस्थान यांचे खाते कुठल्या बँकेत आहे तेथील बँक कर्मचारी त्या दिवशी झालेले कलेक्शन घेऊन जातात. त्यावर आपली साक्षिदार म्हणून स्वाक्षरी घेतली जाते. ज्या दिवशी हुंडीमधून आलेले रक्कम दुसऱ्या दिवशी सुप्रभातमला देवाला सुपूर्द करतात. विशेषता तीन दिवस सेवेमध्ये एक दिवस आपल्याला सुपाथम मधून दर्शनाला सोडतात. सदर दर्शन एका तासांत होते.

हा लाभ सोलापूरातून आम्हा काही जणांस मिळत आहे. ते भाग्य असल्याचे मत श्री. दंडी यांनी व्यक्त केले. वर्षातून चार वेळा आम्हाला या सेवेच्या निमित्ताने तिरूपतीला जाणे होते. अशीच सेवा उत्तरोत्तर घडावी हीच भावना असल्याचे त्यांनी सांगितले.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**निविदा सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने सोलापूर येथील मध्यवर्ती रेल्वे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य) खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवत आहेत.

| निविदा सूचना क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजे किंमत | बयाणा पैसा | काम पूर्ण होण्याचा कालावधी | देखभाल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 05-2025-SrDENC | सोलापूर विभागात ADEN/PVR अंतर्गत KWV MRJ विभागात JTRD, KVK, RG, DLGN या वसाहतींच्या मार्ग बाजूला स्टेशन, सेवा इमारती आणि क्वार्टर्सचे अपग्रेडेशन २-विशेष ट्रॅक काम ADEN/PVR अंतर्गत KWV-MRJ विभागात वार्षिक ट्रॅक तपासणी लक्षात घेता | रु. ४,५७,५७,००२.०७ | रु. ३७,८,८००.०० | ०६ महिने | १२ महिने |
| www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ. | ३०.०४.२०२५ दुपारी ३:०० वाजेपर्यंत | | | | |
| www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ | ३०.०४.२०२५ रोजी दुपारी ३:३० वाजता | | | | |

या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट : www.ireps.gov.In.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य),
मध्य रेल्वे, सोलापूर

SUN 62 असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project**
**E-TENDER NOTICE NO: 2025 DOAWB 1167944**
**Construction of Processing Shed 403.74 Sq Mt**
The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. **Asgaonkar Agro Farmer Producer Company Ltd., Asgaon, Tal. - Paoni, Dist. - Bhandara** is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned works. The estimated cost of work is **Rs. 70.03 lakhs (Including GST).** The bid document is also available on the project website **www.smart-mh.org,** in tender and procurement section. The last date for submission of online bid is **28/04/2025 up to 2.00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.
**District Implementation Unit, SMART Project, Dist. - Bhandara**

**Karmayogi Sudhakarpant Paricharak Pandurang Sahakari Sakhar Karkhana Ltd., Shreepur**
Tal-Malshiras Dist- Solapur. Pin Code - 413112
Phone-02185-255233, 255344. Email ID- spssk_sugar@yahoo.com
**DECLARTION OF PURCHASE NOTICE**
We are inviting Quotations/ Offers for Purchasing Consumable Materials & Services against our Enquiries for Crushing Season-2025-2026. The Purchase Notice is displayed on our official Web Site - http://www.pandurangsugar.com

**Dr. Yashwant Kulkarni** Managing Director | **K.S.Khule** Vice Chairman | **Prashantrao Paricharak** Hon. Chairman

### सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः ता. बार्शी पैकी मौजे श्रीपतपिंपरी येथील तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नाटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे श्रीपतपिंपरी येथील जमीन ग.नं. ६२, क्षेत्र हे. ००-३७ आर, आकार रु. ०१-५५ पैसे, अशी जमीन सुमन शामराव चव्हाण, रा. श्रीपतपिंपरी ता. बार्शी यांचे नांवे असून मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. सुमन शामराव चव्हाण यांचे पती आमचे अशिल भानुदास राघू भांगे, रा. कदम हॉस्पीटलच्या पाठीमागे कुर्डूवाडी, ता. माढा हे असून त्यांचेमध्ये व सुमन शामराव चव्हाण यांचेमध्ये आपसात पटेनासे झालेने त्यांनी आमचे अशिलाविरुध्द दावा सुमारे २५ वर्षापूर्वीपासून दिलेला आहे तो आजतागायत चालू आहे. आमचे अशिल वेळोवेळी पोटगीची रक्कम सुमन शामराव चव्हाण यांना देत आलेले आहेत. सदरील जमीन सुमन शामराव चव्हाण यांचे नावे करतेवेळी आमचे अशिलाने तिचे वडिलास जमीनीचे मोबदल्याची रक्कम दिलेली आहे. सध्या आमचे अशिल वयोवृध्द असून आजारी पडत आहेत. ते पूर्वीपासून पोटगीची रक्कम भरु शकत नाहीत, त्यांना सध्या इतर उत्पन्नाचे साधन राहिलेले नाही. आमचे अशिल सुमन शामराव चव्हाण हिचे नावे असलेल्या जमीनीतील हिस्सा मागतील म्हणून सुमन शामराव चव्हाण ही वरील मिळकत विल्हेवाट लावण्याच्या प्रयत्नात आहे. आमचे अशिलापासून सुमन शामराव चव्हाण यांना कसलेही अपत्य झालेले नाही. यदाकदाचीत सुमन शामराव चव्हाण हिने सदरील मिळकत विक्रीस काढल्यास तिचेबरोबर कोणीही कसल्याही प्रकारचा गहाण, दान, लिज, हस्तांतरण, बोजा अशा स्वरूपाचा कुठलाही दस्त करू नये. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून सदरची जाहीर नोटीस दिली. ता. ०८/०४/२०२५

सही/-
ॲड. एस. एस. ठोंबरे,
सुयश निवास, फुले प्लॉट, बार्शी
मो.नं. ९३७११६२४२५
अशिलातर्फे ॲडव्होकेट

### जाहिर प्रसिध्दकरण

दि.कि.अर्ज नं. १५/२०२५

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन साो, यांचे कोर्टात**

**हणमंत रामण्णा पडणुरे,**
वय ५४ वर्षे, धंदा शेती,
रा. पाटील नगर, लवंगी, पोस्ट माळकवठे,
ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर. — **अर्जदार**
**विरूध्द**
**कोणी नाही** - **सामनेवाला**

ज्याअर्थी खालील नमुद शेतजमिनीपैकी ०० हे. ६० आर. इतकी शेतजमीन मयत रामण्णा भिमशा बिराजदार यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची होती. ते दि.२०/११/२००३ रोजी मयत झाले. त्यानंतर सदर शेतजमीनीस त्यांची पत्नी दुंडव्वा रामण्णा पडणुरे यांच्या नावाची नोंद झाली. तदनंतर दुंडव्वा रामण्णा पडणूरे हिचे दि.०९/११/२००५ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर शांतप्पा रामण्णा बिराजदार व हणमंत रामण्णा बिराजदार यांच्या नावाची नोंद सदर शेतजमिनीस रितसरपणे झाली. त्यापैकी शांतप्पा रामण्णा बिराजदार हे दि. १४/०१/२००९ रोजी मयत झाले. ते आजन्म अविवाहीत होते. यातील अर्जदार हे मयत शांतप्पा रामण्णा बिराजदार यांचे सख्खे भाऊ आहेत. मयत शांतप्पा रामण्णा बिराजदार यांच्या नावाची नोंद कमी होवून त्यांच्या अविभक्त हिश्शास वारसदार म्हणून यातील अर्जदार यांच्या नावाची नोंद करणेकामी सदर अर्ज दाखल केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन :-** डि व सब डि सोलापूर पैकी ता. अक्कलकोट पैकी कुमठे ग्राम पंचायत हद्दीतील शेतजमीन गट नं.३४ यांसी क्षेत्र १ हे. २५ आर. यांसी पोटखराब ० हे. ०५ आर. असे एकूण क्षेत्र १ हे. ३० आर. यांसी आकार रू. ३.०७ पैसे, यांसी चतुःसिमा - पुर्वेस :- कोडगी यांची शेतजमीन, पश्चिमेस :- कोडगी यांची शेतजमीन, दक्षिणेस कोडगी यांची शेतजमीन/वहिवाटीचा रस्ता, उत्तरेस :- नदाफ यांची शेतजमीन, येणेप्रमाणे शेतजमीन व त्यातील दगड, माती वगैरे तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीचे संपूर्ण हक्कासह.

त्याआर्थी यातील अर्जदार हे मयताचे जवळचे वारस नाहीत अथवा अन्य कोणी आहेत असे जर कोणाचे म्हणणे असेल तर अशा हरकतदारांनी सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमलेली तारीख ७/५/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहून आपल्या हरकती नोंदऊन वर नमुद वेळेत कोणाची हरकत आली नाही तर सदरचे मे. कोर्ट अर्जदारांचे नावे हेअरशिप सर्टीफीकेट देण्याचा हुकूम करेल. त्यानंतर कोणाची हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता. ४/०४/२०२५

सही/- क. लिपीक | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा. अधिक्षक, सिव्हील जज्ज, ज्युनिअर डिव्हीजन अक्कलकोट

### खरेदीखतापुर्वी जाहीर सावधानतेची नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे बार्शी हद्दीतील लोकांना व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि. सोलापूर सब.डी. ता. बार्शी पैकी बार्शी म्युपल हद्दीतील वि क्र. क्र. २८ मधील जमीन स्वसंपादित खरेदी मालकीची जमिन याचा जुना गट नंबर ९३६/२ याचा नविन गट नंबर ९४२/२ पैकी उत्तर बाजुची जमीन याचे क्षेत्र ०० हे. ४० आर, आकार ०० रु. ११ पैसे आहे. पैकी बिनशेती प्लॉट नंबर ६ याचे क्षेत्रफळ २००.०० चौ. मी. याची चतुःसिमा पुर्वेस ६ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस प्लॉट नंबर ७, पश्चिमेस गट नंबर ९४२/१, उत्तरेस प्लॉट नंबर ५ आहे याचे पाणी व वागणूक पूर्व बाजूचे रस्त्याने जाते व आहे. सदर मिळकतीचा बार्शी नगरपरिषद बार्शी यांच्याकडील जाक्र. नगररचना/आरआर/अकृषिक परवानगी/१२८७ बार्शी दि. ०८/०२/२०१६ अंतीम मंजुर झालेला आहे. अशी मिळकत सर्व तदंगभुत वस्तुसह हक्कासह प्लॉट जागा

येणे प्रमाणे चतुःसिमेतील वर्णनाची प्लॉट जागा ही श्री. बाळासाहेब भिमराव गिलबिले, यांचे खरेदी मालकीची असून त्यांनी सदर जमीन ही आमचे अशिल शुभम नारायण वाघमारे, रा. सिरसाव, ता. परांडा, जि. धाराशिव यांना त्यांचे कायदेशीर कौटुंबीक गरजेपोटी विक्री करण्याचे ठरवून त्यांच्याकडून रक्कम २५,०००/- फोनपे द्वारे मोबाईल क्रमांक ९६५७०५३८६६ या मोबाईल क्रमांक वरुन स्विकारलेली आहे. आमचे अशिलासोबत तोंडी व्यवहार झालेला आहे. सदर जमीन श्री. बाळासाहेब भिमराव गिलबिले यांनी निर्वेध निजोखमी बिनबोजाची खरेदी देण्याची जमीन मालकानी आमच्या अशिलास दिलेली आहे. तरी वर नमुद मिळकतीवर कोणाचा हक्क अधिकार, हितसंबंध असल्यास सदर प्लॉट संदर्भात कोणी साठेखत, गहाणखत, नजरगहाण, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, बक्षिस पत्र, बोजा, वाटणीपत्र, मृत्युपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर मिळकतीवर कोणाचा बोजा, हक्क, हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ५ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात हरकत नमुद पत्यावर लेखी कळवावी मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध निजोखमी, बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा नोंदणीकृत व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार, हरकत आल्यास ती आमचे अशिलाचे खरेदीखतावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदीखतापुर्वी पूर्व जाहीर सावधानतेची नोटीस दिली असे. ता. ०७/०४/२०२५

सही/-
ॲडव्होकेट गायत्री अ. डोंगरे
बी.ए.एलएल.बी.
पंकज नगर, बार्शी जि. सोलापूर
मो.नं. ८६२४८९९३६६
अशिलातर्फे ॲड.

Classifieds

**पाहिजेत**
नॅशनल मेडिकल, लष्कर येथे होलसेल व रिटेलमध्ये कामासाठी सेल्समन व डिलीव्हरी बॉय पाहिजेत.
संपर्क:
7219068881

**घर भाड्याने देणे आहे**
सुसज्ज आणि प्रशस्त 2 BHK 2 फ्लॅट शाकाहारी कुटुंबास भाड्याने देणे आहे. आयएमएस पासून जवळ श्री राम चौक, कासार सोसायटी, जुळे सोलापूर. २४ तास पाणी, शांत आणि सुसज्ज परिसर, सीसीटीव्ही आणि पार्किंगची सोय.
- संपर्क नंबर -
9860139889 / 9822162454

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

### जाहिर प्रगटीकरण

दि.कि.अर्ज नं.४३/२०२५

**बार्शी येथील मे.सि.ज.ज्यू.डी.सो. यांचे कोर्टात**
**मे एच. यु. यु. पाटील कोर्ट**

**गीता गोविंद काळे**
वय-७३ वर्षे, धंदा-सेवानिवृत्त
रा.साफल्य सदन, घर नं. ११५३
देशपांडे वाडा, बार्शी, ह मु गोवा. — **अर्जदार**
**वि**
**कोणी नाही**

ज्या अर्थी यातील अर्जदार अर्जदार यांचे आत्याचे मिस्टर विनायक पंढरीनाथ सागडे हे दि.५/११/१९९५ रोजी बार्शी येथे मयत झालेले आहेत. अर्जदार यांचे शिवाय मयतास अन्य कोणीही कायदेशीर वारस नव्हते व नाहीत. मयत विनायक पंढरीनाथ सागडे यांचे वारस प्रमाणपत्र आणायला सांगितल्याने वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्जदार यांनी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळवण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, वा अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस वा कुणाचे हक्कात काही दस्त असलेस संबंधितानी हि नोटीस प्रसिद्ध झाले पासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमलेले तारखेस २५/४/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः व वकीलामार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रार, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे योग्य ते आदेश होतील. दि.७/४/२५

सही/- कनिष्ठ लिपीक | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### नियम भंग केल्याबद्दल ईशांत शर्माला दंड



**हैदराबाद** : गुजरात टायटन्सचा वेगवान गोलंदाज ईशांत शर्माला आपल्या संघाच्या सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यादरम्यान आयपीएल आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल त्याच्या सामन्याच्या शुल्काच्या २५ टक्के दंड आणि एक डिमेरिट पॉइंट जमा करण्यात आला आहे. ईशांत शर्माने कलम २.२ अंतर्गत लेव्हल १ चा गुन्हा मान्य केला आहे आणि मॅच रेफरीची शिक्षा स्वीकारली आहे. लेव्हल १ च्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल सामनाधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक आहे, असे बीसीसीआयच्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे. आयपीएलच्या आचारसंहितेनुसार, कलम २.२ सामन्यादरम्यान क्रिकेट उपकरणे किंवा कपडे, मैदानी उपकरणे किंवा फिक्स्चर आणि फिटिंग्जचा गैरवापर करण्याशी संबंधित आहे. दरम्यान, जीटीने यजमान हैदराबादविरुद्ध सात गड्यांनी विजय मिळवून आयपीएल २०२५ च्या गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर झेप घेत विजयाची हॅटट्रिक केली.

# केकेआर, लखनौ मुसंडी मारण्यास उत्सुक

### सुनील नरेन-दिग्वेश राठी आमने-सामने

◆ **कोलकाता, ७ एप्रिल**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात मंगळवारी ईडन गार्डन्सवर कोलकाता नाईट रायडर्स आणि लखनौ सुपर जायण्ट्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. दुपारच्या सत्रात खेळल्या जाणाऱ्या या सामन्यात सुनील नरेन त्याचा क्लोन व सर्वात मोठा चाहता दिग्वेश राठी याच्याशी सामना करेल.

दोन्ही प्रतिस्पर्धी संघांची स्थिती सारखीच असून दोघांचेही प्रत्येकी दोन विजय व चार गुण आहे. सरस धावगतीच्या आधारे कोलकाता पाचव्या स्थानी, तर लखनौच सहाव्या स्थानी आहे. त्यामुळे या दोन्ही संघांमध्ये अव्वल चार क्रमांकात स्थान मिळविण्यासाठी जोरदार चुरस असेल.

घरच्या केकेआर संघासाठी आतापर्यंतचा हा मिश्र पुनरागमनाचा हंगाम आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू व मुंबई इंडियन्सकडून सुरुवातीच्या पराभवानंतर केकेआरने आपल्या शेवटच्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादवर दणदणीत विजय मिळवला. दीर्घकाळ प्रतीक्षेत असलेल्या मध्यफळीच्या पुनरुज्जीवनानंतर केकेआर पुन्हा फॉर्ममध्ये परतला. त्यांचा सर्वात महागडा खरेदीदार व्यंकटेश अय्यर अखेर विजयी झाला, तर रिंकू सिंग व अनुभवी अजिंक्य रहाणेने महत्त्वपूर्ण योगदान दिले. आशादायक तरुण खेळाडू अंगकृश रघुवंशीनेही आपल्या प्रवाहीपणा व अभ्यासू तंत्राने लक्ष वेधले, परंतु वाईट सलामी भागीदारी अजूनही केकेआरसाठी चिंतेचा विषय आहे. क्विंटन डी कॉक व सुनील नरेन या



अजिंक्य रहाणे



ऋषभ पंत

सलामीवीर जोडीला संघर्ष करावा लागला आहे. राजस्थान विरुद्धच्या सामन्यात तेवढी डी कॉकने ९७ धावांची खेळी केली होती, परंतु अन्य सामन्यात त्याला संघर्ष करावा लागला, त्यामुळे त्याच्या शीर्षस्थानी असलेल्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. डी कॉकसोबत रघुवंशीला पदोन्नती दिल्यास आश्चर्य वाटणार नाही.

**सुनील नरेन वि. दिग्वेश राठी**

सुनील नरेनचे महत्त्व केवळ धावा काढण्यापुरते मर्यादित नाही याची केकेआरला कल्पना आहे. सुनी व दिग्वेश हे विरुद्ध संघात असल्याने कोण कोणावर मात करतो, हे बघणे मनोरंजक असेल. दिल्ली प्रीमियर लीगमध्ये दमदार कामगिरीनंतर दिग्वेश राठी आता आपल्या क्रिकेट स्वप्नाला आकार देणाऱ्या खेळाडूंविरुद्ध खेळत आहे.

सुनील नरेनला पाहिल्यानंतर मला गोलंदाजीची आवड निर्माण झाली. मला नरेनसारखे शांत राहून फलंदाजांवर आक्रमण करायचे आहे व कठीण परिस्थितीत निर्भय राहायचे आहे. आतापर्यंत चार सामन्यांमध्ये राठीने ७.६२ च्या प्रभावी इकॉनॉमी रेटने सहा बळी घेतले आहे. राठीची गोलंदाजी प्रशंसनीय असली तरी, मैदानावरील त्याचे सेलिब्रेशन वादग्रस्त ठरले आहे. त्याला आधीच दोनदा दंड ठोठावण्यात आला आहे. त्याच्यावर आता तीन डिमेरिट पॉइंट्स आहेत. एका सामन्याच्या निलंबनापासून तो एक डिमेरिट गुण दूर आहे.

लखनौमध्ये मुंबई इंडियन्सवर १२ धावांनी विजय मिळवल्यानंतर आत्मविश्वास बळावलेला लखनौचा संघ आपल्या विजयाची लयच कायम राखण्यास उत्सुक असेल. मुंबईविरुद्ध मिचेल मार्श व एडन मार्करामने प्रभावी अर्धशतक झळकावून आपण फॉर्ममध्ये परतल्याचे दाखवून दिले आहे. तथापि, आयपीएलमध्ये ऋषभ पंतच्या आतापर्यंतच्या वाईट कामगिरीमुळे चाहते व तज्ज्ञांकडून आधीच टीका होत आहे. विक्रमी २७ कोटी रुपयांना खरेदी केल्यानंतर लखनौ सुपर जायण्ट्सच्या कर्णधारावर दबाव वाढत आहे. ◀(वृत्तसंस्था)

### आजचे सामने

**कोलकाता नाईट रायडर्स वि. लखनौ सुपर जायण्ट्स**
**स्थळ** : ईडन गार्डन्स स्टेडियम, कोलकाता
**वेळ** : दुपारी ३.३० वाजतापासून

**पंजाब किंग्ज वि. चेन्नई सुपर किंग्ज**
**स्थळ** : महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय स्टेडियम, मुल्लानपूर
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# चेन्नईची पंजाबसमोर चाचणी

◆ **मुल्लानपूर, ७ एप्रिल**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात सोमवारी साचंकाळच्या सत्रात यजमान पंजाब किंग्ज आणि पाच वेळचा विजेता चेन्नई सुपर किंग्ज यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे.



ऋतुराज गायकवाड



श्रेयस अय्यर

सीएसकेने या हंगामात आतापर्यंत आपल्या पराभवाची हॅट्ट्रिक केली आहे. त्यांना धावनांचा पाठलाग करणे जमले नाही. महेंद्र सिंह धोनीच्या डेथ ओव्हर्सच्या फलंदाजीत ताकदीची कमतरता दिसून आली. मंगळवारी येथे पंजाब किंग्जविरुद्धच्या आयपीएल सामन्यापूर्वी सीएसकेला ही कमतरता दूर करणे आवश्यक आहे. एकेकाळी वरदान मानली जाणारी धोनीची उपस्थिती सीएसकेसाठी त्रासदायक ठरत आहे.

पंजाब किंग्जने घरच्या मैदानावर राजस्थान रॉयल्सविरुद्धचा गत सामना गमावला असला तरी सध्याच्या फॉर्ममध्ये तसेच कागदावरही, श्रेयस अय्यरचा संघ सीएसकेपेक्षा अधिक मजबूत दिसतो.

पंजाब किंग्जे तीन सामन्यातून दोन विजय व एका पराभवासह ४ गुण मिळवत गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे, तर सीएसकेने चार सामन्यांपैकी एक सामना जिंकला व तीन सामने गमावले. ते दोन गुणांसह दहा संघांच्या गुणतालिकेत नवव्या स्थानावर आहे. इतक्या वर्षात धोनीची महानता म्हणजे कर्णधारपदाचा निरोप घेणे किंवा आंतरराष्ट्रीय सामन्यातून निवृत्ती घेणे, हे त्याचे अचूक वेळेचे ज्ञान आहे. तो पुन्हा एकदा स्वतःचा निर्णय घेईल की धोनीकडून मदतीची वाट पाहेल?

अनुभवी लेग-स्पिनर युजवेंद्र चहल सीएसकेविरुद्धच्या सामन्यात निश्चितच महत्त्वाची भूमिका बजावेल असा पंजाब किंग्जच्या संघ व्यवस्थानाला आहे. ◀(वृत्तसंस्था)

### इंडियन ॲरोज महिला संघाचा रूट्स एफसीकडून पराभव

**बंगळुरू** : महिला लीग-२ फुटबॉल स्पर्धेत सोमवारी येथे खेळल्या गेलेल्या ब गटाच्या साखळी सामन्यात इंडियन ॲरोज महिला ज्युनियर्स संघाला यजमान रूट्स एफसीकडून ०-१ असा पराभव पत्करावा लागला. मैबम नंदेश्वरी देवीने १२ व्या मिनिटाला विजयी गोल केला. परिणामी, रूट्सने दोन सामन्यांत सहा गुणांसह ब गटामध्ये अव्वल स्थान मिळवले. इंडियन ॲरोज महिला ज्युनियर्सने आपल्या पहिल्या दोन सामन्यांमध्ये पुधुवाई युनिकॉर्न्स व इंटर काशी संघाला हरवले होते. ते आता दुसऱ्या स्थानावर आहेत. पाच संघांच्या गटातील अव्वल दोन संघ अंतिम फेरीत पोहोचतील. बुधवारी आपल्या शेवटच्या सामन्यात कासा बारवानी एससीशी सामना करतील. इंडियन ॲरोज महिला ज्युनियर्स संघ अंतिम फेरीसाठी पात्रता निश्चित करण्याची आशा करतील. मुख्य प्रशिक्षक जोआकिम अलेक्झांडरसन यांनी गत सामन्यात खेळलेल्या संघात एकमेव बदल केला आणि रूपश्री मुंडाच्या जागी आक्रमक खेळाडू व्हॅलेना फर्नांडिसला संधी दिली.

# लॉरेन्स जागतिक क्रीडा पुरस्कार सोहळ्यात जोकोविच आकर्षणाचे केंद्र

◆ **माद्रिद, ७ एप्रिल**

स्पेनची राजधानी माद्रिद येथे २१ एप्रिल रोजी प्रतिष्ठेचा लॉरेन्स जागतिक क्रीडा पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा ॲथ्लिट्स अवॉर्ड्सचा २५ वा वर्धापन दिन आहे. माद्रिदमध्ये सलग दुसऱ्या वर्षीही हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात येत आहे.

लॉरेस वर्ल्ड स्पोर्ट्स अवॉर्ड्ससाठी स्पेनच्या राजधानीत येणाऱ्या स्टार खेळाडूंमध्ये चोवीस वेळा ग्रँड स्लॅम विजेता नोवाक जोकोविच आकर्षणाच केंद्र असेल. २१ एप्रिल रोजी प्रतिष्ठित पॅलासिओ डी सिबेल्स यांनी हा कार्यक्रम आयोजित केला आहे.

लॉरेन्स वर्ल्ड स्पोर्ट्स पुरस्काराच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त पुन्हा माद्रिदमध्ये परतणे खूप रोमांचक आहे, असे पाच वेळा लॉरेस जागतिक क्रीडा पुरस्कार विजेता जोकोविच म्हणाला.



गत वर्षी माद्रिदमध्ये माझे पाचवे लॉरेन्स स्विकारल्या आठवणी माझ्या मनात आहेत व पुन्हा उपस्थित राहण्यास मला भाग्य लाभले आहे, असेही तो म्हणाला.

लॉरेन्स वर्ल्ड स्पोर्ट्स अकादमीच्या क्रीडा दिग्गजांमध्ये सहा वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेता व नोवाकचे माजी प्रशिक्षक बोरिस बेकर, फुटबॉल दिग्गज काफू, लुईस फिगो व रुड गुलिट तसेच जिम्नॅस्टिक महान नादिया कोमानाची, एडविन मोझेस व नवल एल. मौतावाकेल, रग्बी विश्वचषक विजेता ब्रायन हबाना तसेच आलिम्पियन ख्रिस हॉय आणि स्टीव्ह रेडग्रेव्ह यांच्यासह अनेक दिग्गज ॲथ्लिट्सचा समावेश आहे. क्रिकेटचे महान स्टीव्ह वॉ सुद्धा उपस्थित राहणार आहे. ◀(वृत्तसंस्था)



# निवृत्तीबाबत ठरवण्यासाठी १० महिने शिल्लक : धोनी

◆ **नवी दिल्ली, ७ एप्रिल**

आयपीएलमध्ये आणखी एक वर्ष खेळायचे आहे की नाही, हे ठरवण्यासाठी माझ्याकडे अजून १० महिने शिल्लक आहे. माझे शरीर उच्च श्रेणीतील क्रिकेट खेळण्यास कशी साथ देऊ शकतो, यावर माझ्या निवृत्तीचा निर्णय अवलंबून आहे, त्यासाठी अजून दहा महिने शिल्लक आहेत, असे ४३ वर्षीय स्टार क्रिकेटपटू महेंद्र सिंह धोनी म्हणाला.

धोनीच्या या विधानामुळे आयपीएलमधील त्याच्या भविष्याबद्दल वाढत्या चर्चांना तात्पुरता पूर्णविराम मिळाला आहे. या आयपीएलमध्ये धोनी तळाच्या मधल्या फळीत फलंदाजी करताना सामान्यतः प्रभावी कामगिरी करू शकला नाही. फलंदाजी करताना अचूक वेळ साधण्याचा अभाव व अकार्यक्षमता दिसून येत आहे. धोनीने चार सामन्यांमध्ये ७६ धावा केल्या.

मी अजूनही आयपीएल खेळत आहे व माझ्यासाठी एका वेळी एक वर्ष आहे. मी आता ४३ वर्षांचा आहे आणि या आयपीएल हंगामाच्या अखेरीस, मी ४४ वर्षांचा असेन, असे धोनीने म्हटले.

'म्हणून, मला आणखी एक वर्ष खेळायचे आहे की नाही हे ठरवण्यासाठी माझ्याकडे १० महिने आहेत आणि मी खेळू शकतो की नाही हे माझे शरीर ठरवते, असे तो म्हणाला.

तथापि, चेन्नई सुपर किंग्जचा माजी कर्णधार महेंद्र सिंह धोनीने सीएसकेला पाच आयपीएल जेतेपद मिळवून दिले.

मी माझ्या आतापर्यंतच्याा कामगिरीवर समाधानी आहे.मी आनंदी आहे की दुःखी आहे याबद्दल नाही. जे काही घडले आहे, ते घडले आहे. ते बदलता येणार नाही. ते सर्व स्वीकारण्याबद्दल आहे. काहीही झाले तरी मी माझ्या आंतरराष्ट्रीय धावांमध्ये आणखी एक धाव जोडू शकणार नाही व कोणीही त्या कमी करू शकणार नाही, असे तो म्हणाला.

मी भारतीय खेळाडूंनाच चिकटून राहीन. वीरेंद्र सेहवाग, सचिन तेंडुलकर, सौरव गांगुली, युवराज सिंग सर्वोत्तम स्थितीत आहेत. मग तुम्हाला असे वाटेल की त्यांच्यापेक्षा चांगले कोणीही असू शकत नाही. सर्वकालीन अकरा खेळाडू निवडणे कठीण आहे. त्यांनी भारतासाठी जे काही केले आहे त्याचा आनंद घेण्याबद्दल हे सर्व आहे. आम्ही पाहिलेल्या काही प्रतिभा मनाला भिडणाऱ्या आहेत, असे तो म्हणाला. ◀(वृत्तसंस्था)

### महिला जागतिक बुद्धिबळ वेन्जुन-झोंगी लढत बरोबरीत



**शांघाय** : चार वेळा गतविजेत्या ग्रॅण्डमास्टर जू वेन्जुनने सोमवारी शांघाय येथे सुरु असलेल्या फिडे महिला जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद २०२५ स्पर्धेत चौथ्या फेरीत आव्हानात्मक कामगिरी करत आव्हानकर्ते ग्रॅण्डमास्टर टॅन झोंगीला बरोबरीत रोखले. टॅन आणि जूने प्रत्येकी दोन गुणांसह बरोबरी साधली. मंगळवारी विश्रांती चा दिवस आहे. टॅनने पांढऱ्या सोंगट्यानिशी ॲजिनकोर्ट डिफेन्स पद्धतीने चौथ्या डावाची सुरुवात केली. दोन्ही खेळाडूंनी प्यादेचे बलिदान देण्यास कचरले नाही. जूने आपल्या चीनच्या देशबांधवाकडून आलेल्या तीव्र दबावाचा सामना केला, त्यामुळे दोघींनी पाच तासांचा खेळ खेळला आणि ८० व्या चालीनंतर समान गुण वाटून घेण्याचा निर्णय घेतला. आता बुधवारी पुढील फेरीत टॅन काळ्या तुकड्यांसह खेळेल.

### मॉण्टे कार्लो मास्टर्स टेनिस, जोकोविचचा सामना टॅबिलोशी

**मॉण्टे कार्लो** : येथे सुरु झालेल्या मॉण्टे कार्लो ओपन टेनिस स्पर्धेत सोमवारी पहिल्या फेरीत टॅबिलोने २०१४ च्या विजेत्या स्टॅन वॉवरिन्काचा १-६, ७-५, ७-५ असा पराभव केला. आता ताबिलोला दुसऱ्या फेरीत नोवाक जोकोविचशी सामना खेळण्याची संधी मिळाली आहे. मॉण्टे कार्लोमध्ये पहिल्या फेरीत बाय मिळालेल्या जोकोविचने रोममध्ये टॅबिलोविरुद्ध केवळ पाच गेम जिंकले. मियामी ओपनच्या अंतिम फेरीत जाकुब मेन्सिककडून पराभव पत्करल्यानंतर जोकोविचचा हा पहिलाच सामना असेल. मॉण्टे कार्लो मास्टर्स ही वर्षातील पहिली मोठी क्ले-कोर्ट स्पर्धा आहे. सोमवारी अंतिम ६४ च्या फेरीत जिरी लेहेकाने सेबास्टियन कोर्डा याचा ६-३, ७-६ (७) व मार्कोस गिरॉनने डेनिस शापोवालोव्हचा ६-३, ७-६ (५) असा पराभव केला.

### 'शिवरत्न'च्या विराज गोडसेची राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी निवड

**अकलूज, दि. ७ एप्रिल-**



अकलूजच्या शिवरत्न शिक्षण संस्था, संचलित शिवरत्न स्कूल, शंकरनगर-अकलूज आणि शिवरत्न बास्केटबॉल अॅकॅडमीचा खेळाडू विराज विकास गोडसे याची भारतीय बास्केटबॉल संघटनेच्या वतीने आयोजित पाँडिचेरी येथे होणाऱ्या ४० व्या १६ वर्षांखालील राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य संघात निवड झाली आहे. पुणे येथे भारतीय बास्केटबॉल संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल निवड चाचणीत सोलापूर शहर व जिल्हा म्युचर बास्केटबॉल संघटनेचे वतीने सहभागी झाला होता. १५० खेळाडूंपैकी केवळ १५ खेळाडूंना अंतिम सराव शिबिरासाठी निवडण्यात आले. या सराव शिबिरातून विराजने आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर महाराष्ट्र संघात स्थान पटकावले. विराजच्या या यशाबद्दल सोलापूर शहर व जिल्हा म्युचर बास्केटबॉल संघटनेचे अध्यक्ष खासदार धैर्यशिल मोहिते-पाटील, शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी धैर्यशील मोहिते-पाटील, शिवरत्न बास्केटबॉल अॅकॅडमीचे प्रमुख अनिल जाधव यांनी अभिनंदन करून त्याला राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# सोलापूरची घोडदौड, सलग चौथा विजय

## १९ वर्षांखालील राज्य निमंत्रित क्रिकेट : आज संभाजीनगरबरोबर लढत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या १९ वर्षांखालील निमंत्रित क्रिकेट स्पर्धेत सोलापूरने सलग चौथा विजय नोंदवित या स्पर्धेतील विजयी घोडदौड कायम ठेवली आहे. सीएनए या बलाढ्य संघावर पहिल्या डावाच्या अधिक्यावर त्यांनी विजय मिळविला. या विजयासह सोलापूरने तीन गुण वसूल केले. साखळी स्पर्धेतील सोलापूरचा शेवटचा सामना छत्रपती संभाजीनगरबरोबर ८ व ९ एप्रिलला आहे. गुणतक्त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर १७ गुण घेऊन अव्वल स्थानवर आहे. सोलापूर गुणतक्त्यात १६ गुण घेऊन तृतीय स्थानावर आहे. त्यामुळे छत्रपती संभाजीनगरबरोबर सोलापूरला विजय प्राप्त करणे गरजेचे आहे.



अभय लावंड



आदर्श राठोड



अर्णव ढोले



सुमित अहिवळे

छत्रपती संभाजीनगर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत सोलापूर संघाने पहिल्या डावात सात बाद ३६८ धावा केल्या होत्या. यात कर्णधार आदर्श राठोड याने स्पर्धेतील दुसरे शतक करताना १०६ धावा केल्या आहेत.अर्णव ढोले ७८, सुमित अहिवळे ७२, यष्टीरक्षक वीरांश वमा नाबाद २८ आणि समर्थ कोळेकर २६ धावा केल्या. सीएनए संघाचा पहिला डाव २४८ धावांत सोलापूरने रोखला सोलापूरकडून पहिल्या डावात अभय लावंड याने तीन बळी, समर्थ दोरनाल व श्रीनिवास कुलकर्णी यांनी दोन प्रत्येकी २ बळी घेतले. आदर्श राठोड व सुमित अहिवळे यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. फॉलोऑननंतर दुसऱ्या दिवशीचा खेळ संपताना सोलापूर संघाने दुसऱ्या डावात संघाने एक गडी बाद ३० धावा केल्या.

### भारतीय फुटबॉल टेनिस महासंघाच्या महासचिवपदी भीमराव बाळगे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**



भारतीय शालेय क्रीडा महासंघ मान्यताप्राप्त भारतीय फुटबॉल टेनिस महासंघाच्या महासचिवपदी महाराष्ट्र फुटबॉल टेनिस असोसिएशनचे सचिव भीमराव बाळगे यांची निवड झाल्याचे राष्ट्रीय अध्यक्ष राम अवतार यांनी कळविले आहे. बाळगे यांनी मार्शल आर्टच्या माध्यमातून व फुटबॉल टेनिस, रग्बी या खेळाच्या माध्यमातून अनेक खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळण्याची संधी निर्माण करून दिली आहे. बाळगे हे अनेक खेळाच्या जिल्हा, राज्य व राष्ट्रीय संघटनेवरती विविध पदावरती काम करत असून शालेय व संघटनेच्या वतीने आयोजित स्पर्धेतून अनेक खेळाडूंना त्यांनी घडवले आहे. शहर व जिल्ह्यात विविध खेळांच्या शालेय व संघटनेच्या अनेक राज्य व राष्ट्रीय स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले आहे. गेल्या पंधरा वर्षापासून महाराष्ट्रात शालेय स्पर्धेत फुटबॉल टेनिस या खेळाचा समावेश करण्यासाठी बाळगे यांनी परिश्रम घेतले.

# २ वर्षांची बंदी संपल्यानंतर बांगलादेशचा नासिर परतला

**ढाका, दि ७ एप्रिल -**

२०२०-२१ अबू धाबी टी लीगमध्ये एमिरेट्स क्रिकेट मंडळाच्या भ्रष्टाचार विरोधी संहितेचे उल्लंघन केल्याबद्दल आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) दोन वर्षांची बंदी घातलेला बांगलादेशचा अष्टपैलू खेळाडू नासिर हुसेन आता स्पर्धात्मक क्रिकेट खेळण्यास परतला आहे. सोवारी मीरपूर येथील शेर-ए-बांगला राष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर गाजी ग्रुप क्रिकेटर्स विरुद्धच्या ढाका प्रीमियर डिव्हिजन लीग सामन्यात रूपगंज टायगर्स क्रिकेट क्लबने त्याला समाविष्ट केले, तेव्हा हुसेनचे स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये पुनरागमन झाले.पाठीच्या अटींनुसार नासिर हुसेनने आता सर्व आवश्यकता पूर्ण केल्या आहेत. यामध्ये भ्रष्टाचारविरोधी शिक्षण सत्र पूर्ण करणे समाविष्ट आहे. यामुळे ७ एप्रिल २०२५ पासून अधिकृत क्रिकेटमध्ये पुन्हा प्रवेश करण्याचा त्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# टाईम्स इलेवन, नॅशनल अकादमीचे शानदार विजय

## रेल्वेची ७८वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा

### वेगवान गोलंदाज गणेश जाधव, शोहरब शेख सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापर, दि. ७ एप्रिल-**

रेल्वेच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत वेगवान गोलंदाज गणेश जाधवच्या चार बळीच्या जोरावर टाईम्स इलेवन ब संघाने रायझिंग स्टार क्लबवर ९ गडी राखून विजय मिळविला. गणेश सामन्याचा मानकरी ठरला.

रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेतील दुसऱ्या सामन्यात नॅशनल क्रिकेट अकादमी ब संघाने टाईम्स इलेवन अ संघावर १ गडी राखून मात केली. चार बळी टिपणारा वेगवान गोलंदाज शोहरब शेख सामनावीर ठरला. हे पुरस्कार गणेश जाधव यास इन्स्टिटयूट कमिटी मेंबर नागेश नवले यांच्या हस्ते तर शोहरब शेख यास रेल्वे चे वरिष्ठ खेळाडू लियाकत शेख यांच्या हस्ते देण्यात आला.पंच म्हणून मजहर मंगोली व दयानंद नवले आणि सचिन गायकवाड व चिराग शाह तर गुणलेखक म्हणून गेनबा सुरवसे यांनी काम पाहिले.









**संक्षिप्त धावफलक**

**रायझिंग स्टार:** १८.१ षटकांत सर्व बाद १०५ (प्रशांत भट ३०, गजानन पिलगुलवर २४, बिरुबा सलगर १३, गणेश जाधव ४ बळी, सचिन गायकवाड व अयुब पट्टेवाले प्रत्येकी २ बळी) पराभूत विरुद्ध **टाइम्स इलेवन ब संघ** : १० षटकांत १ बाद १०६ (मकरंद बसवंती नाबाद ५३, इम्तियाज अत्तार ४१, बिरूबा सलगर १ बळी).

**टाइम्स इलेवन अ संघ** : १६.२ षटकांत सर्व बाद ११६ (करण चाकोते ४३, राहुल कचरे २४, प्रतीक बाकळे १७, शोहरब ४ बळी, जयराज मडोळे ३ बळी, अभिजित कुलकर्णी २ बळी) पराभूत विरुद्ध **नॅशनल क्रिकेट अकॅडमी ब** : १९.१ षटकांत ९ बाद ११७ (रियाज नदाफ ३३, अभिजित कुलकर्णी २१, अजय सिंग १२, राहुल कचरे, करण चाकोते व प्रवीण यादव प्रत्येकी २ बळी.

**आजचा सामना**

दीपक क्रिकेट क्लब विरुद्ध मारिया क्रिकेट अकॅडमी

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### बार्शी हौशी कलाकारांकडून मनोजकुमार यांना आदरांजली

**बार्शी, दि. ७ एप्रिल-**

शुक्रवार दि. ४ एप्रिल रोजी देशभक्त कलाकार स्व. मनोज कुमार यांचे निधन झाले. त्यांना श्रद्धांजली देण्यासाठी रविवार दि. ६ एप्रिल रोजी बार्शी हौशी कलाकार यांनी स्व. मनोज कुमार यांच्या गीतांच्या माध्यमातून आदरांजली देण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. सदर कार्यक्रम हौशी कलाकार सदस्य गोविंद तापडिया यांच्या तापडिया सेंटर या दुकानाच्या हॉलमध्ये झाला. कार्यक्रमास हौशी कलाकार मेजर अविनाश हिंगमिरे, प्रशांत माळवदे, रवींद्र मैंदर्गीकर, गोविंद तापडिया,अजय खंडेलवाल, सुनीता जाजू, स्वाती डोळे आणि सुनील पल्ले यांनी गीते सादर केली. सदर कार्यक्रमात रोटी कपडा और मकान, क्रांती, उपकार, पूरब और पश्चिम, शोर, पत्थर के सनम, पहचान, दो बदन, हरियाली और रास्ता अशा स्व. मनोज कुमार यांच्या चित्रपटातील गीते गाऊन स्व. मनोज कुमार यांना आदरांजली देण्यात आली.कार्यक्रमास हॉल उपलब्ध करुन दिल्याबद्दल गोविंद तापडिया यांचे मेजर हिंगमीरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन सुनिल फल्ले यांनी केले होते.



### अक्षय मुदावडकर यांचा पोलिस निरीक्षक स्वामी यांच्या हस्ते सत्कार

**अक्कलकोट, दि. ७ एप्रिल-**

श्री रामनवमी निमित्त कलर्स मराठी वाहिनीवर जय जय स्वामी समर्थ या मालिकेतील मुख्य कालाकार अक्षय मुदावडकर यांनी श्री. स्वामी समर्थ समाधी मठ येथे भेट देऊन स्वामी समर्थ महाराज समाधीचे दर्शन घेतले. अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक महेश स्वामी व त्यांच्या धर्मपत्नी सीमा स्वामी यांनी श्रींची मूर्ती देऊन अक्षय मुदावडकर यांचा सत्कार केला. यावेळी स्वामी भक्त तथा अक्कलकोट नगरपालिकेचे माजी पाणी पुरवठा सभापती नगरसेवक रामचंद्र समाणे, समर्थ महामुनी आदी उपस्थित होते. मुदावडकर यांची कलर्स मराठी वाहिनीवरील 'जय जय स्वामी समर्थ' मालिका खूपच लोकप्रिय झाली आहे. स्वामी समर्थांची भूमिका साकारणारे कलाकार म्हणून मुदावडकर यांना अफाट लोकप्रियता मिळाली आहे. ते जिथ जिथ जात आहेत तेथे नागरिक त्यांची भेट घेऊन त्यांच्या सोबत सेल्फी घेण्यास इच्छुक असल्याचे पहायला मिळत आहे.



### संग्रामनगर येथे रामनवमी उत्साहात साजरी

**अकलूज, दि. ७ एप्रिल-**

संग्रामनगर येथील श्री साईबाबा सेवा ट्रस्ट यांच्या वतीने श्रीराम नवमी उत्सव व श्री साई प्राणप्रतिष्ठा २८ वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. श्री साईबाबा मंदिरात पहाटे श्री साईबाबांच्या मूर्तीचा अभिषेक व महापूजा करण्यात येऊन विश्वशांती यज्ञ विकास भोसले व प्रियांका भोसले यांच्या हस्ते प्रज्वलीत करण्यात आला. यानंतर शिवशंभो भजनी मंडळ यांचे भजन सेवा होऊन श्रीराम जन्मोत्सव साजरा झाला. युगंधरादेवी क्रांतीसिंह माने-पाटील यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी संग्रामनगरचे सरपंच पंकज गाडे, उपसरपंच तेजश्री माने देशमुख, राजमाने पाटील, जसभाई पटेल उपस्थितीत होते. आरती नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सायंकाळची आरती श्री हनुमंत खडके यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील यांनी श्रीराम व श्री साईबाबाचे दर्शन घेतले. सायंकाळी ब्रह्मचैतन महिला मंडळ माळीनगर व ओंकार महिला भजनी मंडळ शंकरनगर यांनी आपली भजन सेवा सादर केली. या सर्वांचा सत्कार ट्रस्टचे अध्यक्ष किशोरसिंह माने-पाटील व सचिव राजेंद्र आर्वे यांच्या हस्ते करण्यात आले.

## निधन वृत्त...

### रामचंद्र जावळे



**पंढरपूर, दि. ७ एप्रिल-**

येथील रामचंद्र धोंडिबा जावळे (वय ८१) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, दोन मुली, दोन जावई सात नातवंडे असा परिवार आहे. पंचायत समिती पंढरपूरचे विस्तार अधिकारी प्रमोद जावळे यांचे ते वडील होत.

### संतोष पल्ली



**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

जेमिनी संस्कृतिक व क्रीडा बहुद्देशीय संस्थेचे ट्रस्टी दत्तात्रय पल्ली यांचे चिरंजीव संतोष दत्तात्रय पल्ली (वय ४८) यांचे सोमवारी ७ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पाश्चात २ मुलं, पत्नी, बहीण, आई वडील असे परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा ८ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता घोंगडे वस्ती येथील निवासस्थानापासून ते पद्मशाली स्मशान भूमीपर्यंत निघेल.

# ब्रह्मानंद मोरे प्रतिष्ठानचे कार्य समाजाला दिशादर्शक : आ.कल्याणशेट्टी

### पुण्यतिथीनिमित्त कुरनूर येथे विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ एप्रिल-**

राजकारणात कधी यश येते कधी अपयश येते.पण समाजकारणामध्ये काम करण्यात जो आनंद मिळतो.तो कशातच मिळत नाही.लोकनेते स्वर्गीय ब्रह्मानंद मोरे प्रतिष्ठानचे सेवा कार्य हे गेल्या २६ वर्षांपासून अविरतपणे सुरू आहे. हे निश्चितच समाजाला वरदान ठरणारे आहे, असे प्रतिपादन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.शनिवारी, आमदार कल्याणशेट्टी यांच्या हस्ते कुरनूर येथील श्री दत्त मंदिराच्या प्रांगणामध्ये शेतकरी सन्मान सोहळा तसेच क्रीडा क्षेत्रातील पुरस्काराचे वितरण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना आमदार कल्याणशेट्टी म्हणाले, स्वर्गीय ब्रह्मानंद मोरे आणि कल्याणशेट्टी परिवार यांचे संबंध हे फार पूर्वीपासूनचे आहेत. राजकारणामध्ये मतभेद झाले परंतु आम्ही कधीही सामाजिक कार्यापासून दुरावलो



> **बाल कीर्तनकार माऊली महाराजांचे सुश्राव्य कीर्तन**
>
> यावर्षी प्रतिष्ठानच्यावतीने बाल कीर्तनकार माऊली महाराज काकडे यांचे सुश्राव्य कीर्तन झाले.या कीर्तनामध्ये त्यांनी थोरांचे महत्त्व, संस्कार आणि अध्यात्म यावर प्रकाश टाकला. काकडे हे बाल कीर्तनकार असल्याने त्यांना पाहण्यासाठी आणि ऐकण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.ते खूप विनोदी कीर्तनकार असल्याने त्यांना महाराष्ट्रामध्ये प्रति इंदुरीकर महाराज समजले जाते.

नाही.स्व.ब्रम्हानंद मोरे यांचा स्वभाव आणि त्यांचे कार्य या परिसराला सुपरीचित आहे म्हणून आज त्यांच्या पश्चात देखील त्यांच्या नावाने रक्तदान शिबिर,आरोग्य शिबिर,शेतकरी सन्मान सोहळे होतात आणि त्यांच्या आठवणींना यातून उजाळा दिला जातो या प्रतिष्ठानच्या माध्यमातून अध्यक्ष बाळासाहेब मोरे,कार्याध्यक्ष प्रमोद मोरे,विनोद मोरे आणि राजु मोरे हे चांगले कार्य करत आहेत.ते निश्चितच कौतुकास्पद आहे.यावेळी व्यासपीठावर श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी, माजी नगरसेवक महेश हिंडोळे,माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे,राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष दिलीप सिद्धे, स्वामीराव पाटील,प्रभाकर मजगे,मल्लिनाथ साखरे, हभप आबा महाराज कुरनूरकर, हभप बाबुराव शिंदे महाराज, केशव मोरे, अमर पाटील,अभिजित पाटील, संजय मोरे, ॲड. फारीया टिनवाला आदींची प्रमुख उपस्थिती होती.या कार्यक्रमात क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल

आरफिया टीनवाला यांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्याशिवाय गावात गेल्या अनेक वर्षांपासून शेती करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करून चांगल्या पद्धतीने समाजाला दिशा दिल्याबद्दल सात शेतकऱ्यांचा

सन्मान यावेळी प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आला. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर सालाबादप्रमाणे गावातील गोरगरीब चारशे कुटुंबांना पाच किलो साखर वाटप करण्यात आले.दरम्यान सकाळच्या सत्रामध्ये कुरनूर येथील दत्त मंदिरामध्ये आयोजित करण्यात आलेल्या शिबिरामध्ये १०९ जणांनी रक्तदान केले.या शिबिराचे उद्घाटन हत्तीकणबस येथील प.पू प्रभूशांतलिंगेश्वर महास्वामीजी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विलास गव्हाणे, विश्वनाथ भरमशेट्टी, सिद्धाराम भंडारकवठे, तम्मा शेळके, प्रल्हाद जाधव आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब मोरे यांनी केले. कार्यक्रमासाठी चेतन मोरे, सतीश काळे, दयानंद काळे, ओंकार मोरे, सुमित शिंदे, सचिन दगडे, विष्णू खांडेकर आदींनी सहकार्य केले.

## शहीद जवान बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने पालकमंत्री गोरेंना विविध मागण्यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ७ एप्रिल-**

सांगोल्यातील शहीद जवान बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने पालकमंत्री जयकुमार गोरे यांना शहर व परिसरातील विविध मागण्यांचे निवेदन सांगोला दौऱ्यात देण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अच्युत फुले, रमेश फुले, शिवाजी बनकर उपस्थित होते.

सांगोला शहरातील ट्रामा केअर सेंटरची इमारत तयार असून सुद्धा डॉक्टरांच्या सेवेअभावी बंद अवस्थेत आहे. त्यामुळे सांगोला शहर व तालुक्यातील अनेक रूग्णांचे हाल होत आहेत. यासाठी सांगोला शहरातील ट्रामा केअर सेंटर त्वरीत सुरू करावे. सांगोला पंढरपूर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात जड वाहतूक सुरू असून अनेक अपघात वारंवार घडत आहेत. प्रवासी नागरीकांच्या सुरक्षतेखातर




हा रस्ता चौपदीकरण करण्यात यावा. सांगोले तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये विहिरीतील पाण्याची पातळी कमी होत असून पाण्या अभावी जळू लागलेल्या बागांना दुष्काळी अनुदान त्वरीत मिळावे.

शेतकऱ्यांचे विविध योजनांचे थकीत अनुदान त्वरीत मिळावे. सांगोल्याचे भौगोलिक क्षेत्र मोठे असून अशा परिस्थितीमध्ये सांगोले तालुक्यामध्ये एकच पोलीस स्टेशन असून अपुऱ्या पोलीस कर्मचाऱ्यावर हे पोलीस स्टेशन चालू असून जवळा, जुनोनी आणि महूद या ठिकाणी सब पोलीस स्टेशन व्हावे कारण सांगोला शहर व तालुक्यामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. म्हणून ही मागणी आम्ही सातत्याने करत आहोत. तसेच सांगोला महूद रेल्वे गेट या गेटवर रेल्वेची वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असून त्यात क्रॉसींग असल्यास नागरीकांना भर उन्हात ताटकळत उभे रहावे लागते म्हणून त्या गेटवर लवकरात लवकर उड्डाण पूल करणेत यावा, या मागणीचे निवेदन देण्यात आले.

## पिलीव परिसरात राम जन्मोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ७ एप्रिल-**

प्रभू श्रीरामचंद्र जन्मोत्सव तथा श्री रामनवमीचा कार्यक्रम माळशिरस तालुक्यातील पिलीव परिसरात भक्तीमय, आनंदी व उल्हासी वातावरणात साजरा करण्यात आला यावेळी श्रीराम गल्लीतील घाटे कुटुंबीयांच्या श्रीराम मंदिरात भजन प्रवचन विधिवत पूजा घालून पाळणा सादर करून साजरा करण्यात आला श्रीराम जन्माचा पाळणा जयश्री घाटे, ॲड. आसावरी घाटे, मीनाक्षी देशमुख-गुजरे यांनी सादर केला श्री रामजन्मावरील मंद्रुपचे प्रवचनकार देशपांडे यांचे रामभक्तांना मंत्रमुग्ध करणारेक

सूश्राव्य प्रववचन तसेच श्रीरामाची जन्मकथा कथन केली.यावेळी विधी वत पूजा व आरती माजी सरपंच व मंदिराचे वारसदार प्रकाश घाटे अडवोकेट अजय घाटे यांच्या हस्ते पारंपारिक



पद्धतीने सादर करण्यात आली. यावेळी श्रीरामाच्या दर्शनासाठी भाविकांनी रामभक्तानी मोठी गर्दी केली होती. यावेळी प्रसादाचे वाटप करण्यात आले त्याचप्रमाणे विठ्ठल रुक्मिणी मंदिरात शैलेश झिंजे, माजी सरपंच अमोल मदने पाटील,अरुण मदने बाबूराव सुतार सुनील गुरव मुकुंद सुरवसे यांच्या हस्ते पूजा आरती करण्यात आली. यावेळी नंदकुमार गुरव (पुजारी) यांनी विधिवत पूजा व आरती केली यावेळी मुकुंद सुरवसे अरुण मदने सुनील गुरव बाबुराव सुतार सुनील गुरव यांनी भजन आरती पूजा सादर केली यावेळी महिलानी पाळणा गायन सादर केले.

यावेळी शैलेश जिंजे व राहुल झिंजे परिवाराच्या वतीने प्रसादाचे वाटप करण्यात आले त्याचप्रमाणे श्री महालक्ष्मी मंदिर परिसरातील भैस वस्ती येथेही भक्तिमय वातावरणात श्री राम नवमी साजरी करण्यात आली कुसमोड, झिंजेवस्ती, चांदापुरी, बचेरी, शिंगोर्णी, सुळेवाडी आदी गावातूनही श्रीराम नवमी साजरी करण्यात आली.




## माढ्यातील २४७ विद्यार्थ्यांना मिळणार एक कोटी सात लाख रूपयांची शिष्यवृत्ती

### यंदाच्या शिष्यवृत्तीमध्ये १५ विद्यार्थी पात्र

**तभा वृत्तसेवा**
**माढा, दि.७ एप्रिल-**

गेल्या नऊ वर्षापासून येथील सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेत एनएमएमएस शिष्यवृत्ती पॅटर्न राबवला जात आहे. त्यामधून २४७ विद्यार्थ्यांना एकूण १ कोटी ६ लाख ९४ हजार ४०० रुपये इतकी रक्कम शिष्यवृत्तीच्या रूपात मिळणार आहे. यात १५ विद्यार्थी पात्र ठरले.

शिष्यवृत्तीच्या माध्यमातून एक कोटीचा टप्पा प्रशालेने पूर्ण केल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा( एनएमएमएस) व सारथी

> **सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र....**
>
> समर्थ दत्तात्रय केदार, समृद्धी महादेव परांडे, समृद्धी औदुंबर जाधव, सार्थक सुधीर सुरवसे, जय विनोद माने, शिवानी गणेश लटके, दिपाली अमोल चौरे, शुभम सतीश मस्के, सिद्धी संतोष सुरवसे, हिंदवी रघुनाथ सुरवसे, अक्षता शिवाजी फरतडे , अक्षरा अमोल कुटे, ओमराज ज्ञानेश्वर कदम आदी.
>
> **जिल्हा गुणवत्ता यादीतील गुणवंत**
>
> अनुष्का दिनेश टिंगरे व निकिता सचिन राऊत

शिष्यवृत्ती परीक्षेत सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेचे चालू वर्षी १५ विद्यार्थी पात्र ठरले असून चालू वर्षी एनएमएमएस या परीक्षेसाठी २ आणि सारथी शिष्यवृत्ती योजनेसाठी १३ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक बनले आहेत. या विद्यार्थ्यांना किरण भांगे, मीनाक्षी काशीद यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, शिक्षणाधिकारी कादर शेख, उपशिक्षणाधिकारी रूपाली भावसार, गटविकास अधिकारी महेश सुळे, गटशिक्षणाधिकारी विकास यादव, केंद्रप्रमुख विजय काळे, मुख्याध्यापक नागेश खेडकर, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धैर्यशील भांगे, उपाध्यक्ष माधुरी साठे व व्यवस्थापन समितीच्या सर्व सदस्य पालकांनी अभिनंदन केले आहे.

## सांगोला येथे गुरुवारी मोफत सर्वरोग निदान आरोग्य शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ७ एप्रिल-**

महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या एकनाथ हिरक आरोग्य वर्षानिमित्त वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, खा.श्रीकांत शिंदे फाऊंडेशन व आरोग्यदूत फाऊंडेशनच्या वतीने सांगोला येथे गुरूवार १० एप्रिल रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मोफत सर्वरोग निदान महाआरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले असल्याची माहिती माजी आ.शहाजीबापू पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष पंढरपूर विभागाचे प्रमुख सतीश सावंत उपस्थित होते.

शिबिरामध्ये मोफत डोळे तपासणी व चष्मे, औषध वाटप, रक्तदान शिबीर, सुप्रसिध्द कॅन्सर तज्ज्ञाच्या उपस्थितीत कॅन्सर थर्मल टेस्टींग, मधुमेह तपासणी, एसीजी, किडनी विकार, स्त्रियांचे आजार, व्यसनमुक्तीसाठी मोफत सल्ला व औषधे, दिव्यांग बांधवांकरिता मोफत मॉड्युलर हात, पाय व कॅलिपर्स तसेच महाराष्ट्रातील तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि सल्ला आयोजित करण्यात आले आहे. सांगोला महाविद्यालय, कडलास रोड येथे जास्तीत जास्त गरजू नागरिकांनी याचा लाभ घ्यावा

### राज्यस्तरीय ऑनलाईन प्रश्न मंजुषा स्पर्धा १८ एप्रिलला

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या संयुक्त जयंतीनिमित्ताने ऑनलाईन राज्य प्रश्नमंजुषा स्पर्धा परीक्षा शुक्रवारी १८ एप्रिलला गुड फ्रायडेदिवशी दुपारी १२ ते १२.३० दरम्यान व्हाट्सअप ग्रुपवर ठेवलेली आहे. ध्येयनिष्ठ अधिकारी ग्रुप महाराष्ट्रतर्फे हगी स्पर्धा असून असून ह्यात प्रत्येकी सहा क्रमांक ठेवण्यात आले आहेत. विजेत्यांना प्रत्येकी ३००१ते १२५ पर्यंत रोख रक्कम दिली जाणार असून प्रत्येक सहभागी स्पर्धकांना ऑनलाईन प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. इच्छुकांनी जिवनप्रकाश गेडाम (७४१०११९४५०)फोन पे/गुगल पेवर ५१ पाठवून नोंदणी करावी.

## पंक्चर काढणाऱ्याचा मुलगा झाला एमबीबीएस डॉक्टर

**तभा वृत्तसेवा**
**श्रीपूर, दि. ७ एप्रील -**

श्रीपूर (ता. माळशिरस) पम्चरचे दुकान चालवणारे महाळुंग (ता. माळशिरस) येथील रहिवाशी हनुमंत घोंगाणे यांचा मुलगा सौरभ याने अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण करत डॉक्टर बनण्याचे स्वप्न सत्यात उतरवले आहे. त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

श्रीपूर येथे पम्चर काढण्याचे दुकान चालवत हनुमंत घोंगाणे यांनी मुलासाठी जे काबाडकष्ट केले त्याचे चीज झाल्याची भावना सर्वजण व्यक्त करत आहेत. हनुमंत घोंगाणे यांनी



> **कष्टाचे फळ मिळाले**
>
> बारावीत सौरभने ८४ टक्के गुण मिळवले तेव्हा एमबीबीएस होण्याची इच्छा व्यक्त केली. खर्चाचा विचार करता हे कसे शक्य आहे असा विचार आला. परंतू त्याची जिद्द व ओढ पाहून होकार दिला. त्यात सुदैवाने शासकीय कोट्यातून नंबर लागला. तरीही खर्चाचा बोजा होताच परंतू व्यवसायाने साथ दिली. सौरभनही चिकाटी राखली. त्यामुळे आज तो डॉक्टर झाला. कष्टाचे फळ मिळाल्याचे समाधान आहे.
>
> **- हनुमंत घोंगाणे, महाळुंग ता. माळशिरस**

दिवसभर मेहनत करत कौटुंबीक जबाबदारीसह सचोटीने व्यवसायातून मुलाच्या शिक्षणाचा खर्च केला अन मुलगा सौरभ डॉक्टर झाला. त्याचा वडील हनुमंत यांच्यासह कुटूंबातील सर्वांनाच आनंद झाल्याची भावना कुटूंबातून आहे. अशा परिस्थितीत मुलाने मिळवलेल्या यशामुळे कृतकृत्य झाल्याची भावना त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती .

सौरभचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण श्रीपूरच्या चंदशेखर विद्यालयातून तर उच्च शिक्षण पंढरपूर येथील कर्मयोगी भाऊराव पाटील महाविद्यालयातून पूर्ण केले. त्यानंतर इस्लामपूर येथील शासकिय प्रकाश इन्स्टिट्यूट रिसर्च सेंटर (वाळवा) येथून त्यांनी एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण केले.

सौरभच्या या यशाबद्दल माजी जिल्हा परिषद सदस्य संभाजी घोंगाणे, यमाईदेवी प्रतिष्ठानचे संजयकुमार घोंगाणे, शरद पोळ यांनी डॉ. सौरभ घोंगणेंचा सत्कार केला.

याप्रसंगी संभाजी घोंगाणे यांनी एक सामान्य शेतकरी कुटूंबातील व मोलमजूरी करणाऱ्याचा मुलगा एमबीबीएस परिक्षा उत्तीर्ण झाला याबद्दल या परिसराला अभिमान वाटावी अशी घटना असल्याची भावना व्यक्त केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



सोलापूर : हॉटेल व्हीनसच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देताना खासदार प्रणिती शिंदे. यावेळी हॉटेलचे मालक विकी बनसोडे, नितेश बनसोडे, अनिल सलगर, प्रशांत गरड, सागर शेंडगे.

# विस्कळीत पाणी पुरवठा; झोन कार्यालयासमोर निदर्शने

## उत्तर-दक्षिण कसबा परिसरातील नागरिकांची प्रचंड गैरसोय; अन्यथा महापालिकेत आंदोलन करण्याचा दिला इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

सोलापूर शहरातील महापालिकेच्या झोन क्रमांक एक अंतर्गत असलेल्या प्रभाग क्रमांक आठ मधील दक्षिण व उत्तर कसबा परिसरात पाणीपुरवठा विस्कळीत आणि मनमानीपणे होत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला. माजी नगरसेवक अमर पुदाले यांच्यासह परिसरातील कार्यकर्त्यांनी मिनी झोन कार्यालयासमोर निदर्शने केली.



सोलापूर शहरातील नवी पेठ लगत, सावरकर मैदानाच्या बाजूला असणाऱ्या मिनी झोन कार्यालय येथे नागरिकांनी आमच्या भागात पाणी का आले नाही? विचारण्यासाठी गेले असता कार्यालयातील अधिकारी स्वतःच कार्यालयाला टाळे लावून निघून गेल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

प्रभाग क्रमांक आठ मध्ये उत्तर कसबा, दक्षिण कसबा, शुक्रवार पेठ, धनगरवाडी, मातंग वस्ती, ढोर गल्ली, धाकटा राजवाडा, शेटे वाडा यासह परिसरामध्ये गेली अनेक दिवसांपासून पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. अवेळी पाणीपुरवठा होत आहे. कधी पहाटे तर कधी दुपारी अचानक पाणीपुरवठा केला जातो. यामुळे कामगारांसह परिसरातील नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. काम सोडून दुपारी पाणी भरण्यासाठी लोकांना यावे लागत आहे.

सध्याला पाण्याची समस्या भेडसावत असल्याचे दिसून येत आहे. आठवड्यातून एकच दिवस सोलापूर शहराला पाणीपुरवठा होत असतो. यातच सोमवारी नवी पेठ, सावरकर मैदान लगत असणाऱ्या लोकांनी त्यांच्या भागात पाणी आले नाही हे विचारणा करण्यासाठी झोन क्रमांक १ येथे येऊन अधिकाऱ्यांना चौकशी केली असता, अधिकाऱ्यांनी आम्हाला काय माहित नाही अशी उडवा उडवीची उत्तरे दिल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

येथील नागरिकांनी या कार्यालयासमोर महानगरपालिकेच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. अशा निष्क्रिय अधिकाऱ्यांवर कारवाई करून आम्हाला पाणीपुरवठा सुरळीत करून द्यावा. यासाठी महापालिका आयुक्तांना भेटणार असल्याचेही येथील नागरिकांनी सांगितले. माजी नगरसेवक अमर पुदाले आणि मनसेचे विनायक महिंद्रकर यांनी पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.

### महापालिकेत ठिय्या आंदोलन करणार : अमर पुदाले

गेल्या दोन महिन्यापासून या परिसरात पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. पाणी सोडले असे सांगितले जाते मात्र वास्तवात फार कमी दाबाने पाणी येते. अधिकारी फोन उचलत नाहीत. टाळाटाळ केली जाते. पहाटे थोड्यावेळ पाणी सोडले जाते. त्यानंतर पुन्हा दुपारी पाणी येते. यामुळे नागरिकांचे प्रचंड अडचण आणि गैरसोय होत आहे. पालिका अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार दिसून येतो. वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल केली जात आहे असा आरोप करत पाणीपुरवठा सुरळीत न केल्यास महापालिकेत ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा माजी नगरसेवक अमर पुदाले यांनी दिला आहे.

## महत्वाचे...

### सराईत गुन्हेगार उमेश भोसले येरवड्यात स्थानबद्ध; पोलीस आयुक्तांची कारवाई

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

दुचाकी चोरी सह विविध १२ गुन्हे दाखल असलेल्या उमेश नागनाथ भोसले (वय २७, रा. बी ११, भगवान नगर झोपडपट्टी, सोलापूर) याच्यावर स्थानबद्धतेची कारवाई केली. ही कारवाई पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी एमपीडीए अंतर्गत स्थानबद्धतेची कारवाई केली आहे. त्याची येरवडा कारागृहात रवानगी केली आहे. सराईत गुन्हेगार उमेश भोसले याच्याविवरुद्ध सतत दुचाकी चोरी, सशस्त्र जीवघेणा हल्ला, जबरी चोरी, खंडणी व सशस्त्र धमकीप्रकरणी शहरातील फौजदार चावडी, जेलरोड व जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. त्याच्यावर यापूर्वी २०२३ मध्ये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. मात्र, त्याच्या वर्तनाच बदल झाला नाही. त्याने गुन्हे सुरूच ठेवल्याने पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी २५ मार्च रोजी त्याला स्थानबद्धतेचे आदेश दिले. २६ मार्च रोजी त्याला आदेश बजावून येरवडा कारागृहात रवानगी केली आहे.पोलिस आयुक्त राजकुमार यांनी मार्चअखेर एकूण २८ सराईत गुन्हेगारांवर स्थानबद्धतेची कारवाई केली आहे.

### माहेरात विवाहितेवर सुरीने हल्ला; मोहोळ तालुक्यातील येणकी येथील घटना

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

माहेरात आलेल्या विवाहितेला सुरीने हल्ला करून जखमी केले. हा प्रकार मोहोळ तालुक्यातील येणकी गावात रविवारी रात्री ९.३० वाजता घडला. सारिका राजाराम सोलके (वय ३०, रा. येणकी ता. मोहोळ) असे हल्ला झालेल्या विवाहितेचे नाव आहे. रविवारी रात्री सारिका यांचे येणकी हे माहेर आहे. रविवारी रात्री त्या माहेरातील घरी असताना, घरगुती कारणातून वाद झाला. यातून सुरीने हल्ला केल्याने चेहरा, डोके तसेच हाताला आणि गळ्याला जखम झाली आहे. त्यांच्यावर मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून भाऊ बंडेरा याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### घरगुती कारणातून भिंतीला डोके आपटून विवाहितेला मारहाण

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

घरगुती कारणातून भिंतीला डोके आपटून विवाहितेला बेदम मारहाण करण्यात आली. हा प्रकार अक्कलकोट तालुक्यातील खैराग गावात रविवारी रात्री ८.३० वाजता घडला. मुस्कान म. सफुवान बिराजदार (वय २१) असे मारहाण झालेल्या विवाहितेचे नाव आहे. रविवारी रात्री ८.३० च्या सुमारास विवाहिता ही घरी असताना, तिचे पतीबरोबर घरगुती कारणातून पतीबरोबर भांडण झाले. यातून पतीने तिचे डोके घराच्या भिंतीला आपटले. त्यात डोक्याला मार लागून मुस्कान जखमी झाली. तसेच लाथाबुक्यांनी माराहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागल्याने उपचारास सोमवारी दुपारी १.४० वाजता वडील लाडलेसाह यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### पतीबरोबर तक्रारीनंतर विवाहितेने केले फिनेल प्राशन

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

पतीबरोबर झालेल्या तक्रारीनंतर विवाहितेने रागाच्या भरात फरशी पुसण्याचे फिनेल प्राशन केले. हा प्रकार रविवार रात्री १०.३० वाजता शहर परिसरात घडला. अमृता किरण खंडेलवाल (वय ३५, रा. सोलापूर) असे विवाहितेचे नाव आहे. रविवारी रात्री अमृता आणि तिचे पती किरण यांच्यात कौंटुबिक कारणातून वाद झाला. या वादानंतर संतापेलल्या अमृता या विवाहितेने घरातील फरशी पुसण्याचे फिनेल प्राशन केले. यात त्रास होउ लागल्याने रात्री ११.१५ वाजता दशरथ गुंगेवाले याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### पूर्व वैमनस्यातून मारहाण करणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

मागील भांडणातून एकाने लिफ्टमधून बाहेर पडणाऱ्यास धक्का दिला. त्याचा जाब विचारल्यावर तिघांनी वरवंटा, फळी व हाताने मारहाण केली. त्यात तो जखमी झाला. शनिवारी (ता. ५) रात्री १० च्या सुमारास दक्षिण कसबा परिसरातील कृष्णा कॉम्प्लेक्समध्ये ही घटना घडली. याप्रकरणी तिघांविरुद्ध फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. प्रशांत गंभीरे, पंकज गंभीरे व त्यांच्या आईचा गुन्हा दाखल झालेल्यांत समावेश आहे. जखमी अच्युत वसंत पंडीत (वय ४४, रा. कृष्णा कॉम्प्लेक्स, दक्षिण कसबा, सोलापूर) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. ते लिफ्टमधून घरी जाताना प्रशांत हाही त्याता आला. ते लिफ्टमधून बाहेर पडताना जुन्या भांडणातून त्याने मागून त्यांना धक्का दिला. त्याविषयी विचारणा केल्यावर त्याच्यासह संशयितांनी त्यांना शिवीगाळ केली. प्रशांत याने हाताने त्यांना मारहाण करण्यास सुरवात केली. पंकज याने वरवंट्याने त्यांच्या डोक्यावर मारल्याने ते जखमी झाले. त्यांच्या आईने फळीने त्यांच्या पाठीवर व पायावर मारले. अच्युत यांनी आरडाओरड केल्याने त्यांच्या पत्नी डॉ. वीणा कात्रे, बीडकर काका यांनी त्यांना सोडवले.

# समाजस्वास्थ्यासाठी महिलांचे आरोग्य महत्त्वाचे - डॉ. कंदलगांवकर

## जागतिक आरोग्य दिनानिमित्त डॉ. हेडगेवार रक्तपेढी संस्थेत कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.७ एप्रिल -**

कुटुंबातील महिलांनी आपले आणि आपल्या कुटुंबियांचे आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. महिला स्वत: आरोग्याबाबत सजग असेल तरच घरातील माता, बालक आणि सर्वांचेच आरोग्य चांगले राहते. अन्यथा त्याचा थेट परिणाम कुटुंब आणि समाज व्यवस्थेवर होतो, त्यासाठी जागतिक आरोग्यदिनाच्या थिमनुसार निरोगी सुरूवात, आशादायी भविष्य याप्रमाणे माता व बालकांचे आरोग्य सदृढ राखणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. सुमेधा कंदलगांवकर यांनी केले.




जागतिक आरोग्य दिनानिमित्त डॉ. हेडगेवार रक्तपेढी आणि महिला होमिओपॅथी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थीनींसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी डॉ. कंदलगांवकर बोलत होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महिला होमिओपॅथी महाविद्यालयाच्या डॉ. गायत्री बागेवाडी उपस्थित होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर नि. संचालक नितीन कवठेकर, व्यवस्थापक रंगनाथ जोशी, महाविद्यालयाच्या स्नेहल घुले उपस्थित होते. प्रारंभी होमिओपॅथीच्या विद्यार्थीनींना रक्तपेढीच्या ज्येष्ठ तंत्रज्ञ मंजिरी कोपकर, स्टाफ नर्स रुपाली लोंढे यांनी रक्तसंकलन ते रक्त वितरण या दरम्यान रक्तपेढीत होणाऱ्या सर्व प्रक्रिया समजावून सांगितल्या. डॉ. बागेवाडी यांनी महिला होमिओपॅथी महाविद्यालयाच्या उपक्रमांची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी रवि कोटा यांनी केले. तर प्रास्ताविक संगिता कोरे यांनी केले. यावेळी महाविद्यालयाच्या ४५ विद्यार्थीनी, प्रशासन अधिकारी श्रीनिवास बासुतकर आणि रक्तपेढीचे श्रीकांत तुळजापूरकर आदी उपस्थित होते.

## जुळे सोलापूरात पाणीपुरवठा विस्कळीत

**सोलापूर, दि.७ एप्रिल-**

जुळे सोलापूरातील ज्ञानेश्वर नगर परिसरात पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. येथील लोखंडवाला वसाहतीसमोर पाईपलाईन फुटल्याने दुरूस्ती करण्यात आली. तेथे नविन व्हॉल्व्ह बसवला मात्र त्याचा उपयोग होण्याऐवजी पाणीपुरवठा विस्कळीतच झाल्याची तक्रार येथील नागरिकांनी केली. त्यामुळे तो व्हॉल्व्ह काढण्याची नामुश्की प्रशासनावर आली. आता पाणीपुरवठा व्यवस्थित होईल अशी आशा होती. मात्र पाणीपुरवठ्यात सुधारणा झालीच नाही. याबाबत येथील नागरिकांच्या तक्रारीची दखल घेऊन पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी होत आहे. येथील रहिवाशांनी याबाबत रीतसर तक्रारही दाखल केली आहे. चुकीचे काम करून ठेकेदाराचे हीत साधले जात असल्याची तक्रार केली आहे.



# आषाढी वारीसाठी यंदा १९ जूनला माऊलींच्या पालखीचे प्रस्थान

## नातेपुते, माळशिरस, वेळापूर पालखी तळ बदलण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ एप्रिल -**

कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्याचे आषाढी वारी साठी १९ जूनला श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान होणार असून या सोहळ्यातील वाढती वारकऱ्यांची संख्या लक्षात घेता पालखी तळ अपुरे पडत आहेत. नातेपुते , माळशिरस व वेळापूर येथील पालखी तळाची जागा बदलून द्यावी अशी मागणी संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्थ योगी निरंजननाथ यांनी केली. श्री क्षेत्र पंढरपूर येथे संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान व दिंडी समाजाची आषाढी वारीच्या नियोजनाची बैठक सोहळ्याचे मालक बाळासाहेब आरफळकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस सोहळा प्रमुख डॉ भावार्थ देखणे , विश्वस्त ड राजेंद्र उमप, व्यवस्थापक माऊली वीर , श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे विश्वस्थ माऊली जळगावकर, विठ्ठल महाराज वासकर , नाना महाराज वासकर , रामभाऊ चोपदार , दिंडी समाजाचे मारुती कोकाटे , राजाभाऊ थोरात , भाऊ फुरसुंगीकर यांच्यासह दिंडी समाजाचे प्रमुख पदाधिकारी , दिंडी प्रमुख उपस्थित होते. प्रारंभी शेडगे दिंडी क्रमांक ३ चे प्रमुख जयसिंग महाराज मोरे यांच्यासह वर्षभरात निधन पावलेल्या दिंडीकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

योगी निरंजनाथ म्हणाले , तसा यंदाच्या पालखी सोहळ्यात फारशा अडचणी नाहीत . परंतु हडपसर पासून पालखी मार्गाचे काम अत्यंत संत गतीने सुरू आहे ते पालखी सोहळ्यापूर्वी पूर्ण होणे अपेक्षीत आहे . दिवे घाटात रस्ता रुंदीकरण सुरू आहे तेथे पावसाळ्यात दरड कोसळण्याची शक्यता आहे. तेथे लोखंडी जाळी मारावी . फलटण ते धर्मपुरी रस्ता अपूर्ण आहे तो पूर्ण करावा . नातेपुते , माळशिरस व वेळापूर येथील पालखी तळ अपुरे पडत आहेत . नातेपुते येथे गावा बाहेर पालखी तळाला जागा द्यावी , माळशिरस येथे कृषी कार्यालयाजवळील जागा द्यावी तर वेळापूर येथील पालखी तळ हा रस्त्यात गेला आहे.तेथे दुर्घटना होण्याची शक्यता आहे . या तळाची जागा बदलून शेती महामंडळाची जागा पालखी तळासाठी द्यावी अशी मागणी त्यांनी केली.

या बैठकीत दिंडी समाजाने पाणी , फिरती शौचालये या विषयी प्रश्न उपस्थित केले . शौचालय असून अडचण नसून खोळंबा अशी अवस्था आहे . शौचालयात पाणी उपलब्ध करून द्यावे अशी मागणी त्यांनी केली. यंदा प्रस्थान दिवशी गुरुवार आल्याने माऊलींच्या पालखी सोहळ्याचे १९ जून रोजी सायंकाळी साडेसात वाजता प्रस्थान होणार असून यंदा तिथीचा क्षय झाल्याने पालखी सोहळ्याचे वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाईल असे पालखी सोहळा प्रमुख डॉ भावार्थ देखणे यांनी सांगितले .

# पाण्याच्या टाकीजवळ जाऊन आयुक्तांनी केली पाहणी

## चावीवाले अन् नागरिकांशी साधला संवाद

## बाबू जगजीवनराम झोपडपट्टी येथे पुन्हा केली पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल -**

सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज होटगी रोड एमआयडीसीतील पाणी टाकी येथून पाणी पुरवठा होणाऱ्या टाकी येथे प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. या टाकी वरून कुठल्या परिसरात पाणी पुरवठा केला जातो यांची माहिती घेतली.



कुठल्या नगर मध्ये कशा पद्धतीने पाणी पुरवठा होते आणि कुठल्या परिसरात कमी दाबाने पाणी येथे याची माहिती घेतली. त्यानंतर अंत्रोळीकर नगर, गैबीपीर झोपडपट्टी, आसरा आदी ठिकाणी प्रत्यक्ष पाणी सोडणारे चावीवाले व नागरिकांशी संवाद साधून पाणीच्या पाण्यासंदर्भात माहिती घेतली. शहरातील नागरिकांना सुरळीत पाणी पुरवठा करण्या संदर्भात सूचना दिल्या.

यावेळी अतिरिक्त आयुक्त रवि पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यकटेश चौबे, विभागीय अधिकारी बाबर आदी उपस्थित होते. त्यानंतर बाबू जगजीवनराम झोपडपट्टी येथे भेट देऊन पाहणी केली. गेल्या दोन दिवसा पासून आरोग्य विभाग, पाणी पुरवठा विभाग, मलेरिया विभाग व विभागीय कार्यालय, आरोग्य विभागाने पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेतले. वैद्यकीय पथक, जी.एन.एम., ए.एन.एम, एम.पी.डबलू-एम.आशा स्वयंसेविका यांनी त्या परिसरातील मलेरिया व डेंगू या कीटकनाशक आजाराचे सर्वेक्षण सुरु आहे. त्या संदर्भात माहिती घेतली. अधिकारी यांना आवश्यक ते काम करण्याचा सूचना दिल्या.

### आजारी मुलाच्या प्रकृतीची आयुक्तांनी केली विचारपूस

तसेच ९ वर्षीय मुलाला ताप असल्याने त्याच्यावर हॉस्पिटल येथे उपचार सुरु असून त्याची प्रकृती चांगली आहे.त्यांच्या परिवारास महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी भेट दिली. विचारपूस केली.

# ऑपरेशन परिवर्तन मोहीमे अंतर्गत सोलापूर तालुका पोलीस ठाण्याची कारवाई

**अवैध गावठी देशी दारूच्या हातभट्टया केल्या उध्दवस्त**

**२ लाख ७ हजार ३२२ लिटर गुळमिश्रीत रसायन हातभट्टी दारू जागेवरच नष्ट**

**१ कोटी ३५ लाख ३२ हजार ४२० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल -**

ऑपरेशन परिवर्तन या मोहीमे अंतर्गत सोलापूर तालुका पोलिसांकडून चोरून अवैधरित्या देशी दारूच्या हातभट्टयावर व दारू विक्री करणा-या याचे विरूध्द केलेल्या कारवाईत एकूण १ कोटी ३५ लाख ३२ हजार ४२० रूपये किंमतीचा मुदेमाल हस्तगत केला आहे. त्यामध्ये २ लाख ७ हजार ३२२ लिटर गुळमिश्रीत रसायन हातभट्टी दारू, प्लॅस्टीक बॅरेल मध्ये भरून ठेवलेली गावंठी हातभट्टी दारू, हातभट्टी दारू तयार करणे करीता लागणारे साहित्य तसेच अवैधरित्या दारूच्या हातभट्टया उध्दवस्त करून प्लॅस्टीक बॅरेल जागीच फोडुन त्यातील गुळमिश्रीत रसायन जागेवरच नष्ट करण्यात आले आहे. चोरून हातभट्टी दारूची विक्री करणारे याचेकडुन ३२८५ लिटर हातभट्टी दारू व दारूची विक्री करणारे यांचेकडुन ६३८ देशी विदेशी दारूच्या बाटल्या हस्तगत केल्या आहेत.

चोरून अवैध दारूच्या हातभट्टया व दारूची विक्री करणा-या एकूण १४४ इसमा विरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायद्या कलम ६५ फ व ६५ ई अन्वये एकूण १४१ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ५ एप्रिल रोजी वरळेगाव तांडा व गणपत तांडा येथे चोरून अवैध दारूच्या हातभट्टया चालविणारे एकूण २ इसमा विरूध्द कारवाई करून एकूण ४ लाख ५० हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल त्यामध्ये ६० प्लॅस्टिक बॅरेल, १२००० लिटर गुळमिश्रीत रसायन जागेवरच नष्ट करण्यात आले आहे.

अशा व इतर प्रकारच्या चोरून अवैध व्यवसाय करणा-या इसमाचा गुन्हेगारी अभिलेख पडताळुन त्यांचे विरूध्द तडीपार, एम.पी.डी.ए. सारख्या प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे काम चालु असल्याचे पोलिस उपविभागीय अधिकारी संकेत देवळेकर यांनी सांगितले आहे. सदरची छापा कारवाई पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलिस अधिकारी संकेत देवळेकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे यांचे नेतृत्वाखाली सोलापूर तालुका पोलीस ठाणे कडील कार्यरत असलेले पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी केली.



**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## भारत मुक्ती मोर्चाच्या वतीने बुधवारी जेलभरो आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

भारत मुक्ती मोर्चा, बहुजन क्रांती, राष्ट्रीय परिवर्तन मोर्चा राष्ट्रीय पीछडा वर्ग मोर्चा यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. ९ एप्रिल २०२५ रोज सायंकाळी ४ वाजता सोलापुरात जेलभरो आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती एड. योगेश शिदगणे यांनी पत्रकार परिषदेत दिली. सोलापुरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यापासून मोर्चास प्रारंभ होणार आहे. त्यानंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे या मोर्चाचा समारोप करण्यात येणार आहे.

या ठिकाणी जेलभरो आंदोलन करण्यात येणार आहे. निवडणुकांमध्ये ईव्हीएम मशीनचा वापर बंद करावा. बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यात याव्यात. ओबीसीची जातीय जनगणना करण्यात यावी. महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे यासह अन्य मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस फारुक शेख, ॲड. सैफन शेख, अभिषेक शिंदे आदी उपस्थित होते.

## ▶▶ क्राईम वृत्त...

### चार चाकी वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील तिघे जखमी

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

विजापूर वेस ते रेल्वे स्टेशन असे जाताना चार चाकी वाहनाने धडक दिल्याने दुचाकीवरील तिघे जखमी झाले. हा प्रकार सोमवारी रात्री १२.१० वाजता घडला. गौरवसिंह रामलखन सिकंदरबाद (वय १९), लवकुश रामगोपाल परमार (वय २०) व रियाज सत्तार फुलारी (वय ३०, रा. वाडीया हॉस्पीटल) अशी जखमींची नावे आहेत. यातील जखमी तिघे हे रविवारी रात्री विजापूरवेस येथे कामानिमित्त गेले होते. तेथील काम संपवून ते तिघे दुचाकीवर बसून डफरिन चौकाजवळील महापालिकाजवळील रस्त्यावरून टिप्पलसिट जात होते. त्यावेळी समोरून आलेल्या चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली.या अपघातात गौरवसिंह हा पायाला, लवकुश हा पोटाला आणि हाताला तर रियाज हा डोक्याला मार लागून जखमी झाला. त्यांना रात्री १२.१० वाजता साहित शेख याने शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### नवीन मोबाईल घेतल्याची पार्टी दे म्हणून मारहाण

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

नवीन मोबाईल घेतल्याने पार्टी दे म्हणून पार्क चौकात तरुणाला लाथाबुक्यांनी मारहाण करण्यात आली. हा प्रकार रविवारी रात्री १० वाजता घडला.विनय देविदास सागरेकर (वय २४ रा. कल्याणी ड्रीम सिटी, सैफुल) असे मारहाण झालेल्याचे नाव आहे. रविवारी रात्री विनय हा पार्क चौकात थांबला होता. त्याने नुकताच नवीन मोबाईल घेतला होता. ही बाब रविकांत कांबळे, यशराज हानगुंडे व इतर दोघांना समजली. त्यांनी विनय यास नवीन मोबाईल घेतल्याने पार्टी दे म्हणून तगादा लावून लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने विनयच्या नाकाला जखम झाली. तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री ११.४५ वाजता स्वत: शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### पायी जाताना तोल जाऊन पडल्याने तरुण जखमी

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

अक्कलकोट रोड पाण्याची टाकी येथून जोडबसण्णा चौकाच्या दिशेने पायी जाताना अचानक तोल जाऊन पडल्याने तरुण जखमी झाला. हा प्रकार सोमवारी सकाळी ११.३० वाजता घडला. चाँद रजाक शेख (वय ३६, रा. सलगरवस्ती, सोलापूर) असे तरुणाचे नाव आहे. अक्कलकोट रोड पाण्याची टाकी येथून पायी निघालेल्या चाँदचा जोडबसण्णा चौकाच्या अलिकडे काही अंतरावर अचानक तोल गेला. यात तो खाली पडल्याने त्याच्या डोक्याला जखम झाली आहे. दुपारी १२.५० वाजता कासिम नदीवालकर याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कुंभारी टोलनाक्याजवळील टिप्पर चालकास मारहाण

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

कुंभारी टोलनाक्यापासून काही अंतरावर टिप्पर चालकास अडवून मारहाण करण्यात आली. हा प्रकार सोमवारी रात्री १२.१५ वाजता घडला. खानसाब हुसेन शेख (वय ३५, रा. कुंभारी) असे मारहाण झालेल्या चालकाचे नाव आहे. रविवारी रात्री १२.१५ वाजता खानसाब हा टिप्पर चालवित कुंभारी येथून राहत्या घराकडे जात होता. कुंभारी टोलनाक्याच्या पुढे काही अंतरावर गेल्यानंतर अनोळखी तिघांनी त्यास अडविले. त्याच्याकडे पैशाची मागणी करून लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने महेश बाराचारे याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### बल्कर चालकाचा मोबाईल लंपास

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

पुणे-सोलापूर बाह्यवळण रस्त्यावर बल्कर रस्त्याकडेला लावून झोपलेल्या चालकाचा १० हजारांचा मोबाईल चोरट्याने चोरून नेला. शनिवारी (ता. ५) सकाळी ६ वाजता ही घटना उघडकीस आली. याप्रकरणी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. यातील फिर्यादी खंडू काशिनाथ बनसोडे (वय ३१, रा. लोहगाव, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) हे बाह्यवळण रस्त्यावरील जंगली हॉटेलसमोरील पुलानजीक बल्कर (क्र. एम एच १२ ई ०८३) लावून झोपी गेले. त्यानंतर चोरट्याने बल्करच्या केबिनमधून त्यांचा १० हजारांचा मोबाईल चोरून नेला.

# कुचन नगर भागात नळाला अळ्या असलेले काळे पाणी

- दूषित पाण्यामुळे मुलांना उलटी जुलाबाचा त्रास
- महिलांसह नागरिकांमधून तीव्र संताप
- शुद्ध पाणीपुरवठा करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

शहरातील पूर्व भागातील कुचन नगर परिसरात नळाला अळ्या असलेले काळे आणि दुर्गंधीयुक्त पाणी आल्याने महिलांसह नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याने मुलांना उलट्या जुलाबाचा त्रास होत असल्याचा आरोप करत महापालिका प्रशासनाने नागरिकांच्या जीवाशी खेळ थांबवून त्वरित शुद्ध पाणीपुरवठा करावा, अशी मागणी होत आहे.





शहराला पाच ते सहा दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. उन्हाळा सुरू असताना पूर्व भागातील कुचन नगर परिसरात सहा दिवसाआड पाणीपुरवठा होतो. त्यातच गेल्या काही दिवसांपासून सुरुवातीला काळे, मैला मिश्रित आणि दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत आहे. सुरुवातीला जवळजवळ दीड तास असे काळे पाणी आज येथील नळांना आले. असे काळे पाणी कसे प्यायचे, असा सवाल येथील नागरिकांनी उपस्थित केला आहे. अशुद्ध पाणीपुरवठ्यामुळे मुलांना उलटी जुलाबाचा त्रास होत आहे. कपडे धुण्याच्या लायकही हे पाणी नाही. पाण्यात मेडिक्लोर टाकावे. पाणी उकळून प्या, असे महापालिकेचे अधिकारी सांगतात. मात्र, गटारीसारखे काळे पाणी आल्यानंतर त्यात मेडिक्लोर टाकून काय उपयोग होणार? असे गढूळ पाणी कसे प्यायचे असा संतप्त सवाल महिलांसह नागरिकांनी उपस्थित केला आहे.

**जारचे पाणी विकत घेण्याची वेळ !**

कुचन नगर परिसरात नळाला अशुद्ध काळे पाणी येत असल्याने मुलांना उलटी जुलाबाचा त्रास होतो. यामुळे पाणी पिण्यासाठी जारचे विकत घ्यावे लागत आहे. महापालिकेला पाणीपट्टी भरून काय उपयोग? महापालिका प्रशासनाने तात्काळ या परिसरात शुद्ध पाणीपुरवठा करावा.

**हा तर नागरिकांच्या जीवाशी खेळ**

या परिसरात गेल्या अनेक दिवसापासून मैलामिश्रित दुर्गंधीयुक्त पाणी येत आहे. या पाण्यात अळ्याही निघतात. महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून कार्यवाही होत नाही. महापालिका नागरिकांच्या जीवाशी खेळत आहे,असा आरोप करत तातडीने शुद्ध पाणीपुरवठा करण्यात यावा या मागणीचे निवेदन महापालिका आयुक्तांना दिले असल्याचे, मी सोलापूर माझे सोलापूर परिवर्तन व विकास समितीचे अध्यक्ष विष्णू कारमपुरी यांनी सांगितले.

**सकाळी ६ वाजता पाणी सोडा**

पूर्व भागातील कुचन नगर परिसरातील सहा दिवसाआड पाणीपुरवठा होतो. मात्र सकाळी ९च्या दरम्यान नळाला पाणी सोडण्यात येते. यामुळे कामाला बाहेर जाणे अवघड आणि अडचणीचे ठरते. त्यामुळे महापालिका प्रशासनाने या परिसरात सकाळी ६ वाजता पाणीपुरवठा करावा, अशीही मागणी आहे.



**मातीचा थर्मास सोलापुरात....**

**सोलापूर : शहरातील वाढत्या तापमानात थंड पाण्यासाठी उत्तरप्रदेशातील आग्रा येथील मातीचे थर्मास दाखल झाले आहेत. शुक्रवार पेठ परिसरातले छायाचित्र. (छायाचित्र : केवल तिवारी)**

## गरोदर महिलेला महिलांकडून लाथाबुक्यांनी मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-:**

गरोदर महिलेला तीन-चार महिलांनी लाथाबुक्यांनी मारहाण केली. हा प्रकार तुळजाई नगरात रविवारी रात्री ७.४५ वाजता घडला. शिल्पा कृष्णा मिस्किन (वय २४, रा. तुळजाई नगर, सोलापूर) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे.

रविवारी रात्री शिल्पा या तुळजाई नगरातील त्यांच्या घरासमोर असताना, तेथे आलेल्या अनोळखी तीन ते चार महिलांनी लाथाबुक्यांनी मारहाण केली. श्सत पोटाला तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने सासू प्रभावती यांनी रात्री ८.४५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## तीन चोरट्यांना अटक; सव्वातीन लाखाचा मुद्देमाल जप्त

### शहर गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ एप्रिल-**

शहर गुन्हे शाखेने तिघा चोरट्यांना पकडले असून त्यांच्याकडून २ दुचाकी, १६ मोबाईल व १ मंगळसूत्र असा एकूण ३ लाख २८ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

दुचाकी चोरटा अभिजीत महादेव पाटकुलकर (वय ४३, रा. करंदीकर बंगला, पंचायत समितीसमोर, अशोक नगर, बारामती), मोबाईल चोरटा युवराज गोरख कदम (वय ४१, रा. अंबाबाई मंदिराजवळ, रामवाडी, सोलापूर) व ओंकार गायकवाड (रा. स्वागत नगर, कुमठा नाका, सोलापूर) अशी पकडलेल्या संशयितांची नावे आहेत.

शहरात गस्तीवेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक शैलेश खेडेकर यांच्या पथकाला मिळालेल्या माहितीनुसार ही कारवाई करण्यात आली. १ एप्रिल रोजी दुचाकी विक्रीसाठी ताना बाना चौक - वल्याळ मैदान रस्त्यावर थांबलेल्या अभिजीत यास पकडले. त्याच्याकडून एम एच १३ ई ए २८११, एम एच ४२ ए पी ५०७१ क्रमांकाच्या दोन दुचाकी हस्तगत केल्या. याप्रकरणी अनुक्रमे सदर बझार व बारामती पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.



३ एप्रिल रोजी मोबाईल विक्रीसाठी गंगामाई हॉस्पिटलजवळ आलेल्या युवराज यास पकडले. त्याच्याकडून १६ मोबाईल हस्तगत केले. तपासात त्याने सोलापूरसह पंढरपूर, तुळजापूर अशा गर्दीच्या ठिकाणांहून मोबाईल चोरल्याचे आढळले. याप्रकरणी जेलरोड, सदर बझार पोलिस ठाण्यात तीन मोबाईल चोरीचे गुन्हे दाखल आहेत. तर येथील गड्डा यात्रेत चोरलेले मंगळसूत्र विक्रीसाठी अशोक चौकातील सावरकर उद्यानाजवळ आलेल्या ओंकार यास ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याच्याकडून ९३ हजारांचे मंगळसूत्र हस्तगत केले. गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक खेडेकर, अंमलदार संदीप जावळे, विनोद रजपुत, राजकुमार पवार, इम्रान जमादार, उमेश पवार, सिद्धाराम देशमुख, अजय गुंड, सतीश काटे, बाळासाहेब काळे, सायबरकडील प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी ही कारवाई केली.

# सोलापूर, बार्शी, पंढरपूर, कुर्डुवाडी आगारात नव्या बसेस

▶▶ सोलापूर एसटी विभागात एकूण बस ६४०

▶▶ इलेक्ट्रिक २३ तर डिझेलवरील ३५ नव्या एसटी बस दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ एप्रिल-**

एसटी महामंडळाकडे सोलापूर विभागाने नवीन १०० बसची मागणी केली आहे. त्यानुसार आता नव्या बस येण्यास सुरूवात झाली आहे. इलेक्ट्रिकवरील २३ आणि डिझेलवरील ३५ नव्या बस सोलापूर विभागासाठी दाखल झाल्या असून त्या प्रवासी सेवेत रूजू झाल्याचे विभागाचे विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांनी सांगितले. सोलापूरसह बार्शी, पंढरपूर, अक्कलकोट आणि कुर्डूवाडी आगारासाठी ३५ नव्या बस दाखल झाल्या आहेत, असे देखील त्यांनी यावेळी सांगितले.



दरम्यान, सोलापूर एसटी विभागाकडे ७३० बस होत्या. गेल्या दोन वर्षात १४५ बस भंगारात निघाल्या आहेत. परिणामी, बसची संख्या कमी झाल्याने परिवहन व्यवस्थेवर अतिरिक्त ताण येऊन सर्वदूर प्रवासी सेवा पुरवण्यात एसटी महामंडळाला अडचणी निर्माण झाल्या होत्या. परिणामी, अनेक मार्गांवरील सेवा बंद करावी लागली होती. नव्या बसेस आल्याने आता विभागाकडून एकूण ६४० बस उपलब्ध आहेत. संपूर्ण राज्यासाठी ५ हजार नव्या बस पुरवण्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली होती. त्यानुसार एसटी महामंडळाला अशोक लेलॅण्ड कंपनीच्या बस उपलब्ध होत आसल्याचे सांगण्यात आले आहे.

**आणखी १५ बस येणार**

बार्शीसाठी १०, अक्कलकोटसाठी १० आणि सोलापूर, पंढरपूर, कुर्डूवाडी आगारासाठी प्रत्येक ५ नव्या बस दाखल झाल्या आहेत. पुढील आठवड्यात आणखी १५ बस येणार आहेत. त्यानंतर टप्प्याटप्प्याने ७५ बस उपलब्ध होतील. आता महामंडळाकडील बसची संख्या ६६० वर पोहोचली आहे.

**- अमोल गोंजारी, विभाग नियंत्रक सोलापूर एसटी विभाग**

**बसेस वारंवार दुरुस्त करून देखील बंद पडत होत्या**

जुन्या बसची दुरावस्था असल्याने प्रवासांना प्रवासात त्रास सहन करावा लागत होता. बसेस वारंवार दुरुस्त केल्या देखील तरीही प्रवासा मधेच बस बंद पडत होत्या. आता नवीन बस उपलब्ध होत असल्याने प्रवाशांचा प्रवास सुखकर होणार आहे.

**- शीतल बिराजदार, यंत्र अभियंता सोलापूर एसटी विभाग**

**नव्या बसमुळे सुखकर प्रवास**

अशोक लेलँड या कंपनीच्या नवीन बसेस सोलापूर एसटी विभागाच्या ताफ्यामध्ये आजपासून रुजू झाले आहेत. नव्या बसमुळे लांबचा प्रवास सुखकर होणार आहे. इलेक्ट्रिक बसेस संख्या वाढवल्यामुळे त्यांचा प्रवास देखील आरामदायी होणार आहे.

**- दत्तात्रय काळे, प्रवासी**

# सोलापूर बाजार समिती निवडणूक; एकाही उमेदवाराची माघार नाही

### चुरस वाढण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ एप्रिल-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत दाखल झालेल्या उमेदवारी अर्जाची मंगळवार १ एप्रिल रोजी छाननी झाली. या छाननीत ३८८ उमेदवार वैध ठरले. त्यानंतर उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी सुरवात झाली. मात्र बुधवार, गुरुवार व शुक्रवार या तीन दिवसात एकाही उमेदवाराने आपला अर्जाची माघार घेतली नाही.

दरम्यान, सोलापूर बाजर समिती निवडणूक मधील १८ संचालक मंडळासाठी ३८८ उमेदवारांचे ४३८ अर्ज कायम राहिले आहेत. १७ एप्रिलपर्यंत अर्ज माघारी व त्याच दिवशी चिन्ह येण्याची मुदत आहे. निवडणुकीत ४६९ जणांनी ४२९ अर्ज दाखल केले होते. त्या अर्जाची छाननीत ३८८ जणांचे अर्ज पात्र झाले आहेत. त्यानंतर उमेदवारी अर्ज माघार घेण्याची प्रक्रिया सुरू झाली. मात्र, आतापर्यंत कोणीही माघार घेतली नाही. यामुळेच बाजर समितीची निवडणूक रंगतदार वळण घेणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर यंदाच्या निवडणूकपर्यंत उत्तर व दक्षिण मधील नेत्यांचे वर्चस्व आहे.

यंदाच्या निवडणुकीत विक्रमी असे उमेदवार उभारले आहेत. दोन पॅनल फिक्स असले तरी देखील समविचारी उमेदवार एकत्र येऊन तिसरी आघाडीची शक्यता वर्तवली जात आहे. भाजपचे आमदार सक्रिय झाल्याने कोण कुठे व कोणासोबत युती करणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

**१४ एप्रिलनंतर वेगवान घडामोडी**

निवडणुकीसाठी १७ एप्रिल अर्ज माघारीची तारीख आहे. पुढील काही दिवसात ५ दिवस शासकीय सुट्या आहेत. त्यामुळे उमेदवार माघार घेण्याची शक्यता नाही. दि.१४ एप्रिल डॉ. आंबेडकर जयंतीची सुटी झाल्यानंतर (दि.१५) (१६) आणि (१७) एप्रिल या तीन दिवशी वेगवान घडामोडी होणार असल्याचे बोलले जात आहे. तोपर्यंत निवडणूक बिनविरोध होणार की पॅनेल टू पॅनेल होणार याचेही चित्र स्पष्ट होणार आहे.




**थकबाकी भरायची संधी दिली नाही**

बाजार समिती प्रशासनाने मी जर थकबाकी आहे म्हणून कळवणे किंवा दाखला जरी दिला असला तर मी तेव्हाच पैसे भरले असते. परंतु मला थेट मी थकबाकी असल्याचे अर्ज छाननी करते वेळेस समजले. त्यामुळे मला थकबाकी भरायची संधी देखील दिली नाही.

**- केदारलिंग विभुते, अर्जदार**

## शिवदारे गटाचे विभुते, इसापुरे अपिलात

### आज होणार सुनावणी

पंचवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर होऊन, निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली आहे. अर्ज छाननी करतेवेळी शिवदारे गटाचे विभुते आणि इसापुरे यांचे अर्ज थकबाकीपोटी बाद करण्यात आले. श्रीस्वामी समर्थ सूतगिरणीचे चेअरमन राजशेखर शिवदारे यांचे समर्थक सोलापूर बाजार समितीचे माजी संचालक केदारलिंग विभुते आणि वळसंगचे सतीश ईसापुरे हे पण संचालकाकडे अपीलात गेले आहेत.

सोलापूर बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीत विभुते व ईसापुरे यांचे अर्ज बाजार समितीची थकबाकी असल्याच्या कारणामुळे निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड यांनी त्यांचा अर्ज बाद केला आहे. परंतु बाजार समिती प्रशासनाने संबंधित माजी संचालकांना बाजार समितीचे थकबाकी असल्याचे कळवले नाही किंवा दाखलाही दिला नाही. त्यामुळे थकबाकी भरण्याची कोणतीही संधी दिली नसल्याने त्याचा अर्ज बाद जाणून बुजून तर राजकीय हेतूने केला नाही ना असा प्रश्न त्यांनी उपस्थित करत पणन संचालकाचे दार ठोठावले आहे. दरम्यान, याबाबत ते स्वतः ८ एप्रिल रोजी आपली बाजू मांडणार आहेत. म्हणून संचालकांनी अपिलात गेलेल्या अर्जदारांचे म्हणणे ऐकून त्यावर सकारात्मक निर्णय दिला. तर निवडणूक निर्णय अधिकारी यांना त्यांचे अर्ज द्यावे लागणार आहे. त्यामुळे पणन संचालक आता याबाबतीत कोणता निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०८०

**जितुकें कांही आपणासी ठावें। तितुके हळुहळु शिकवावें।**
**शाहाणे करूनि सोडावे। बहुत जन।।**

इतर लोकही आपल्याप्रमाणे ज्ञानी व आनंदी व्हावेत म्हणून कीर्तन, प्रवचन, व्याख्यान, लिखाण, भाषण आदीच्या माध्यमातून अनेक लोक मार्गदर्शन करीत असतात. समर्थ श्री रामदासांच्या, जितुकें कांही आपणासी ठावें। तितुके हळुहळु शिकवावें। शाहाणे करूनि सोडावे। बहुत जन।। या वचनाप्रमाणे आपण इतरांना सांगीतले पाहीजे. कारण कोणीही व्यक्ती सर्वांगाने परिपूर्ण नसतो. कितीही विव्दत्ता, ज्ञान, सौंदर्य, सत्ता, संपत्ती असली तरीही कशाचेतरी ज्ञान अपुरे असतेच. खरे म्हणजे कमतरता ही निसर्गाची देण आहे. यामुळे आपण एकमेकांशी विचारांची, सेवांची, वस्तूंची, भावनांची देवाण-घेवाण करीत असतो. यामुळे आपण एकमेकांत गुंतून असतो. ही गुंतता सामाजिकतेचा आधारस्तंभ आहे. हा आधारस्तंभ मजबुत करण्याचे काम अनेकांकडून मार्गदर्शन स्वरूपात होत असते. योग्य मार्गदर्शनामुळे अज्ञान, चुका, दोष, उणीवा कमी होण्यास, चुकांची पुनरावृत्ती न होण्यास मदत होते. ज्या लोकांमुळे हे घडते, ते मार्गदर्शक लोक खरेच मोठे म्हटले पाहिजेत. अशी अनेक मोठी माणसं सतत मार्गदर्शन करीत असतांनाही समाजात अज्ञान, मानसीक दारिद्र्य, व्देष, वाद, फसवेगीरी दिसुन येते. असे का व्हावे ? या प्रश्नाचे उत्तर शोधु गेल्यास यामागे दोन शक्यता दिसुन येतात. पहिली शक्यता, लोक ऐकुनही त्यांना जे वाटेल तेच करीत असावेत आणि दुसरी शक्यता, जे मार्गदर्शन करतात ते स्वत:च मार्गदर्शनाप्रमाणे अर्थात, आधी केले। मग सांगीतले।। या संतोक्तीप्रमाणे वागत नसावेत. लोक ऐकत नाहीत, यापेक्षा, लोकां सांगे ब्रम्हज्ञान। आपण कोरडे पाषाण।। याप्रमाणे फक्त लोकांना सांगायचे, आपण मात्र तसे वागायचे नाही, हे जास्त अयोग्य आहे.



ज्ञानी लोकांनी मार्गदर्शन हे फक्त समाजालाच करावे असे नाही तर त्यांच्या कुटुबांतील सदस्यांना तसेच स्वत:लाही करणे आवश्यक असते. आपण समाजाचा एक अविभाज्य भाग आहोत. त्यामुळे योग्य बाबीची सुरूवात स्वत:पासून, आपल्या कुटुंबापासून केली पाहिजे. आपण स्वत:च चांगले वागायचे नाही, अन् लोकांना मात्र असे वागा, तसे वागा, हे करा, ते करा, हे करू नका, ते करू नका म्हणून सांगायचे म्हणजे एकप्रकारे व्यर्थच होय. लोकांना सांगण्याप्रमाणे स्वत: न वागणाऱ्यांना आपण विचारले पाहिजे. त्यांचा अवमान करण्यासाठी किंवा त्यांना उघडे पाडण्यासाठी नाही तर तेही सुधारले पाहिजेत म्हणून. सांगणारे लोक सुधरले तर समाज सुधारायला वेळ लागणार नाही. ही सकारात्मकता विचारात घेऊन आपण वागले पाहिजे. आपण मार्गदर्शक असू तर आपण मार्गदर्शन करतो त्याप्रमाणे वागलो पाहिजे आणि आपण ऐकणारे असू तर मार्गदर्शक, तो स्वत: सांगतो त्याप्रमाणे वागत नसेल तर प्रसंगानुरूप त्यास त्याच्या चुकांची जाणीव करून दिली पाहिजे. हे माझे काम नाही, असे न म्हणता समाजाचा एक अविभाज्य घटक या नात्याने सामाजीक बांधीलकी म्हणून असे करावे लागेल, असे आम्हास वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. ८ एप्रिल २०२५ | कामदा एकादशी |
| विक्रम संवत् २०८१ | शंभ महादेव यात्रा |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - चैत्र | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. एकादशी (२१.१२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - आश्लेषा (०७.५४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शूल (१८.०९) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (०८.३२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**वृषभ :** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क:** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद होईल.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील. विद्यार्थ्यांना लाभदायक राहील.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल. शक्यतो जिवनातील निर्णय योग्य व विचार करून घ्या. आनंदी रहा.

**वृश्चिक :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल.

# चैत्री वारीसाठी एसटी स्टँडवर प्रवाशांसह वारकऱ्यांची गर्दी

## महामंडळाकडून वारीसाठी पंढरपूर मार्गावर जादा बसेसचे नियोजन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

राज्याचे दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्र पंढरपूरला चैत्र वारीसाठी पंढरपूरला जाण्यासाठी वारकऱ्यांची तसेच उन्हाळ्या सुट्ट्यानिमित्त परगावी जाण्यासाठी प्रवाशांची सोलापूर एसटी स्टँडवर एकच गर्दी दिसून येत आहे.

श्री क्षेत्र पंढरपूर येथे चैत्र एकादशीनिमित्त वारकऱ्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. विठुरायाच्या दर्शनासाठी भाविक भक्त पंढरपूरकडे मार्गस्थ होत आहेत. वाढती गर्दी लक्षात घेता एसटी महामंडळाच्या वतीने ज्यादा एसटी बसेस फेऱ्यांचे नियोजन केले आहे. त्यानुसार पंढरपूर मार्गावर जादा बसेस सोडण्यात येत आहेत. आज सोमवारी सकाळी सोलापूर बस स्थानकावर वारकऱ्यांची पंढरपूरला जाण्यासाठी मोठी गर्दी दिसून आली. हातामध्ये भगवा पताका घेऊन मुखी विठुरायाचा गजर करत वृद्ध वारकरी पंढरपूरकडे मार्गस्थ झाले. तत्पूर्वी सकाळपासूनच बस स्थानकावर प्रवासी तसेच वारकरी यांची मोठी गर्दी होती. विना वाहक विना थांबा एसटी बसेस पंढरपूर मार्गावर सोडण्यात आले आहेत. सोलापूर आगारासह इतर नऊ आगारातून देखील पंढरपूर मार्गावर जादा बसेस सोडण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

दरम्यान इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षा संपल्या आहेत. त्याच पद्धतीने प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या परीक्षा देखील संपण्याच्या मार्गावर आहेत. तर काही विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपलेल्या आहेत. त्यामुळे अशा प्रवाशांनी देखील परगावी तसेच फिरायला जाण्यासाठी एसटी स्टँड गाठले. उन्हाळा सुट्ट्यांमध्ये मामाच्या गावाला जाण्यासाठी किंवा इतरत्र फिरायला जाण्यासाठी प्रवाशांकडून नियोजन केले जाते. त्यामुळे एसटी बसेसकडे प्रवाशांचा कल वाढतो आहे. सदरची बाब लक्षात घेता महामंडळाच्या वतीने उन्हाळी हंगामासाठी जादा बसेस पुणे, मुंबई, कोल्हापूर, सातारा अशा विविध मार्गांवर केलेले आहे. याच जादा एसटी बसेसचा फायदा प्रवाशांना होत असून, नवीन एसटी बसेस महामंडळाच्या ताफ्यात रुजू झाल्याने प्रवाशांना लांब पल्याचा प्रवास अधिक सुखकर आणि लाभदायक होणार आहे.

# जैन समाजाच्या वतीने बुधवारी नमोकार मंत्राचे पठण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

सकल जैन समाजाच्या वतीने बुधवार दि. ९ एप्रिल रोजी सकाळी ८ ते ९:३६ पर्यंत गांधी नाथा रंगजी जैन जनमंगल प्रतिष्ठान (जैन बोर्डिंग) बाळीवेस येथे सामूहिक नमोकार मंत्राचे पठण करण्यात येणार आहे, अशी माहिती संजय गांधी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जैन धर्मियांचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांचा जन्म कल्याणक महोत्सव गुरुवार दि. १० एप्रिल रोजी सर्व विश्वभर साजरा होत आहे. त्या निमित्ताने जीतो या इंटरनॅशनल संस्थेच्या वतीने जगातील मनुष्य व प्राणी यांच्या कल्याणासाठी विश्व नवकार मंत्र दिवस साजरा करण्यात येणार आहे. देश विदेशातील जवळपास ६ हजार जैन स्थानक व मंदिरात सकल जैन समाजाच्या वतीने सामूहिक नमोकार मंत्राचे पठण करणार आहेत.

या कार्यक्रमास मरूधर केसरी मिश्रीलालजी व प.पू. रूपमुनीजी म.सा यांचे आज्ञानुवर्ती सुशिष्या प. पू. रिद्धीश्रीजी व प. पू. सिद्धीश्रीजी म.सा. यांच्या मंगल सानिध्यात सोलापुरातील चारही पंथातील सुमारे दोन हजार जैन बांधव एकत्र येणार असून विश्वकल्याणाची मनोकामना पूर्ण करण्यासाठी जवळपास २१ लाख वेळा नमोकार मंत्राचे उच्चारण केले जाणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात भगवान महावीर यांच्या प्रतिमा पूजेने होणार असून त्यानंतर जैन ध्वजारोहण व दीप प्रज्वलन करण्यात येणार आहे. त्यानंतर संगीतमय सामूहिक नवकार मंत्राचे पठण होणार असून शेवट उपस्थित साध्वीच्या मंगल आशीर्वादाने होणार आहे. यावेळी सुनील गांधी, मनीष शहा, महेश नळे, गौतमचंद संचेती, श्याम पाटील, प्रा. धनंजय शहा आदी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच्यावतीने ईद मिलन उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच्यावतीने ईद मिलन कार्यक्रम उत्साहात झाला. यावेळी व्यासपीठावर शिवधर्म समन्वयक नेताजी गोरे, सिध्देश्वर मंदिर मुख्य पुजारी राजशेखर हिरेहब्बू, शिख समुदायाचे ज्ञानी रमेश सिंग, फर्स्ट चर्चचे सुपर्ण कुमार व्ही घाटे, खादिमुल हुज्जाजचे सदर हाजी उस्मान शेख या धर्मगुरूंच्या उपस्थित माजी आमदार नरसिंग मेंगजी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमात सहा पोलिस आयुक्त मा. पोमन हे मार्गदर्शन करत होते. सर्व मानवजात आपल्या उत्क्रांतीत आचार, विचार, आहार, प्रार्थना, दैवत व अन्य बाबी बदलत गेले. यातूनच धर्म जात पंथ निर्माण झाले. सर्व धर्मांचा आदर करत आपण आपल्या शहराची देशाची एकात्मता वाढीस लावावी यातूनच समृद्धता निर्माण होते. हे काम गेली अनेक वर्षे छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच्यावतीने शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान करत आहेत. आज अशा निरपेक्ष समाजसेवकांची गरज आहे, असे मत सहा पोलिस आयुक्त यांनी व्यक्त केले.

सदर कार्यक्रमात दुष्काळी भागातील प्रयोगशिल शेतकरी दादासाहेब खिल्लारे बीड, अश्फाक मुजावर अक्कलकोट, बाबासाहेब बिराजदार केसर जवळगा, विजय पाटील बार्शी, देवराज सावळगी सोलापूर यांचा सन्मान माजी मंत्री विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी आ. विजयकुमार देशमुख, राजाभाऊ सरवदे, सुधीर खरटमल, चंद्रकांत वानकर, पद्माकर काळे, अमोल बापू शिंदे, जेल रोड पोलिस निरीक्षक शिवाजी राऊत,सुशीलकुमार बंदपट्टे, प्रथमेश कोठे, केदार उंबरजे, अमर पुदाले, शिवानंद पाटील, ताहेर बेग मौलाना, माजी महापौर आरिफ शेख, रियाज हुंडेकरी, प्राचार्य महेबुब दलाल, हाजी मुनाफ चौधरी, अन्वर सैपन, सरफराज अहमद, बिज्जू प्रधाने, जुबेर कुरेशी, म.शफीक कॅप्टन, ॲड. गोविंद पाटील, गंगाधर कारीमुंगी, युवराज पवार, रविंद्र मोकाशी, अविनाश गोडसे, रईस बागवान, मुजिब खलिफा, रवी मोहिते, पोपट भोसले, योगेश कुंदूर, हेमंत ढवळशंक, प्रा. जैनोद्दीन मुल्ला, शाम कदम, यासिर बागवान, समीर शेख, सोमनाथ राऊत, प्रकाश ननावरे, असिफ पठाण, सौरभ भांड, शोएब चौधरी, श्रीदेवी फुलारी, निर्मला शेळवणे, मनिषा नलावडे उपस्थित होते. ईद मिलनचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान जिल्हाध्यक्ष म शफीक रचभरे, राम गायकवाड, राजू हुंडेकरी, बशीर सय्यद, जावेद बद्दी, रिजवान दंडोती, तन्वीर गुलजार, रिजवान शेख, कादर भागानगरी, कय्युम मोहळकर, वाहिद तांबोळी, हारिस शेख, नईम करनूल, बाबा शेख, खाशिम बेलीफ, माजीद बागवान सोहेल, बागवान मोहसीन सिंदगी, अफ्फान बागवान, जैद बागवान, अयान बागवान मोहसीन शेख हारुन शेख आदी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# श्राविका विद्यालयात संविधान सप्ताहानिमित्त विविध स्पर्धा

## रंगभरण स्पर्धेत अकराशे विद्यार्थ्यांचा सहभाग



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

येथील उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात विश्वरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त व संविधान निर्मितीच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त हर घर संविधान सप्ताहाचे आयोजन ७ ते १४ एप्रिल दरम्यान करण्यात आले आहे.

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थी व समाजात संविधानाबाबत जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने शासनाने हर घर संविधान अभियान राबवले आहे. त्याअंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त प्रशालेत सामान्य ज्ञान व रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच उपस्थित सर्व विद्यार्थी व शिक्षक समावेत सामूहिक भारतीय संविधान वाचन करण्यात आले. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.वाल्मीक कीर्तीकर, संस्थेच्या वरिष्ठ दीप्ती शहा, प्रशालेच्या उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरुवातीस महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करून त्यांना अभिवादन करण्यात आले. प्रमुख अतिथी डॉ. कीर्तीकर यांचा सत्कार मुख्याध्यापक मोहोळे यांनी केला. प्रस्ताविकपर मोहोळे यांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली तसेच हर घर संविधानांतर्गत वर्षभर राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. या अंतर्गत पाचवी ते आठवी विद्यार्थ्यांची संविधानावर आधारित सामान्यज्ञान स्पर्धा व रंगभरण स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत ११०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख अनंत बळळे, अनुप कस्तुरे सुकुमार वारे,प्रवीण कंदले. सुहास छंचुरे, माधवी खोत, प्रिती वऱ्हाडे यांनी परिश्रम घेतले.



# भारतीय जैन संघटनेच्या वतीने बौद्ध साहित्य संमेलनाच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

भारतीय जैन संघटनेच्या वतीने ३ मे २०२५ रोजी हुतात्मा स्मृती मंदिर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय बौद्ध साहित्य संमेलनाच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे, स्वागत अध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर, कोषाध्यक्ष किरण बनसोडे, समन्वयक डॉ. सुरेश कोरे, कार्यवाह भालचंद्र साखरे, कार्यकारी सदस्य व्ही. डी. गायकवाड यांचा भारतीय जैन संघटनेचे राज्य कार्यकारिणी सदस्य शाम पाटील, राज्य उपाध्यक्ष अभिनंदन विभूते, विभागीय सदस्य संजय गडदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी ब्रह्मदेव दादा माने बँकेच्या संचालिका प्रिया पाटील, विक्रांत बशेट्टी, देशभूषण व्हसाळे , कामगार नेते जनार्दन शिंदे, चांगदेव सोनवणे, प्रवीण कांबळे, केरबा माने, विशाल सोनवणे, प्रसन्नजीत शिंगे, नितीन कांबळे उपस्थित होते

# गडकिल्ले वाचवा, रोपवे प्रकल्प थांबवा

## शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थानचे जिल्हाधिकारी कार्यालयास निवेदन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

महाराष्ट्रातील ऐतिहासिक गडकिल्ल्यांचे रक्षण करण्यासाठी आणि प्रस्तावित रोपवे प्रकल्पांना तीव्र विरोध करण्यासाठी शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मारुती सुरवसे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबवण्यात आला.

जिल्हाधिकारी अनुपस्थित असल्यामुळे श्री. दिनेश पारगे सर यांनी हे निवेदन स्वीकारले. यावेळी दुर्गसंवर्धन चळवळीतील कार्यकर्ते स्वप्निल सावळगी, समर्थ हंचाटे, साईराज खांडेकर, ऋतुराज पाटील, राघवेंद्र मेल्ले यांच्यासह अनेक दुर्गसेवक उपस्थित होते.या मोहिमेला केवळ सोलापूरच नव्हे, तर महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत प्रशासनाला निवेदन देण्याचे सत्र सुरू असून, गडकिल्ल्यांच्या संरक्षणासाठी व्यापक स्तरावर जनजागृती करण्यात येत आहे. यामुळे, महाराष्ट्रातील सर्व शिवप्रेमींनी या आंदोलनात सहभागी व्हावे आणि गडकिल्ल्यांचे मूळ स्वरूप जपण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

### शिवप्रेमींचे मोठे समर्थन

या विषयावर सर्वसामान्य नागरिक, इतिहासप्रेमी, दुर्गसंवर्धक आणि अभ्यासक मोठ्या प्रमाणात जागरूक होत आहेत. गडकिल्ल्यांचे रक्षण ही संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असे मत अनेकांनी व्यक्त केले.

### गडकिल्ल्यांच्या रोपवे प्रकल्पांना विरोध का?

महाराष्ट्रातील गडकिल्ले हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे प्रतीक आहेत. मात्र, सध्या पर्यटनाच्या नावाखाली गडकिल्ल्यांवर मोठ्या प्रमाणात व्यावसायिक हस्तक्षेप होत असून, त्याचा परिणाम ऐतिहासिक आणि पर्यावरणीय संतुलनावर होत आहे.शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात रोपवे प्रकल्पांबाबत गंभीर आक्षेप नोंदवण्यात आले आहेत.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती,
मो. ९९६००५३५२१

### अलकः (१०१)
### संघपरिवार

संघ पॉवर हाऊस सारखे आहे याबद्दल सविस्तर अलक (९५) मध्ये लिहिलेच आहे. त्याला अनुसरूनच संघ समाजात पूर्णतः शिरावा या नात्याने / न्यायाने संघ परिवार तयार झाला. त्यातील वि.हि.प- अभाविप- विवेकानंद शिला स्मारक- वनवासी कल्याण आश्रम- भारतीय मजदूर संघ-विद्याभारती याविषयी सविस्तर, मागील अलक मधून आपण वाचले असेलच. आज परिवारातील बाकी इतर संघटनांची ओळख करून देते याला संघाची ीालीशश्रश्र ेीसरपळीरींळेप असे देखील म्हणतात. भारतीय किसान संघ, हिंदू स्वयंसेवक संघ, धर्म जागरण समिती, स्वदेशी जागरण मंच, सेवाभारती, लघुउद्योगभारती, सहकार भारती, बजरंग दल, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रसेविका समिती, भारतीय विचार केंद्र हिंदुस्तान समाचार, विश्व संवाद केंद्र, विवेकानंद केंद्र, सामाजिक समरसता मंच, व ऑर्गनायझर, पांचजन्य, तरुण भारत सारखी वृत्तपत्रे, राष्ट्रीय शिख संगत, तसेच राष्ट्रीय मुस्लिम मंच, अशा अजून कितीतरी संघटना आहेत. ज्या संघाच्या एकाच छत्री खाली काम करतात. संघ हिंसक गोष्टीत रस घेत नाही त्याला हिंसा प्रिय नाही. संघ आतंकवादी नाही. संघाचे ध्येय परं वैभवं नेतुमेत् स्वराष्ट्र हे आहे.

- क्रमशः

## महत्वाचे...



### पुष्पा लोणीला 'एकलव्य' पुरस्कार; १२९ शाळांमधून पुरस्कारासाठी निवड

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

रयत शिक्षण संस्थेकडून दर वर्षी गरीब, निरक्षर व अल्पशिक्षित पालक असलेल्या विद्यार्थ्यांना दहावी बोर्डाच्या परीक्षेत उत्तम गुणांनी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना एकलव्य पुरस्कार दिला जातो. सन २०२३-२४ चा हा पुरस्कार सोलापूर, सातारा जिल्ह्यातील १२९ शाळांमधून तीन शाळेतील विद्यार्थ्यांना दिला गेला. त्यातून न्यू इंग्लिश स्कूल कुसुर विद्यालयातील दहावी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थिनी पुष्पा तुकाराम लोणीची निवड झाली. रयत शिक्षण संस्थेचे मध्य विभागाचे चेअरमन संजीव पाटील, चिटणिस एन. आर. जगदाळे, सहायक विभागीय अधिकारी एन.टी. निकम, डी.बी.दाभाडे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. या पुरस्कारासाठी शाळेचे मुख्याध्यापिका चंद्रकला भोरे, दत्तात्रय पवार, देवानंद महामुनी, सचिन पाटील, भिमाशंकर सोनागे, रशीद चाचा, स्थानिक स्कूल समितीचे बाळाप्पा नांगरे, सोसायटीचे चेअरमन सुनील नांगरे यांनी शुभेच्छा दिल्या.



### कृषीमंत्री कोकाटे यांच्या राजीनाम्याची शिवसेनेने केली मागणी

**अक्कलकोट, दि. ७ एप्रिल-**

शेतकऱ्या विषयी अनादार व्यक्त करणाऱ्या कृषी मंत्री कोकाटे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गट अक्कलकोट यांच्यावतीने अल्पसंख्याक अक्कलकोट तालुका प्रमुख आयाज जमादार शिवसेना उद्धव बाळसाहेब ठाकरे गट शिवसेना माजी तालुका प्रमुख मनोज पवार सोपान निकते माजी शहर प्रमुख रवि डोके माजी शहर प्रमुख स्वामीराव मोरे यांनी लेखी निवेदनाद्वारे नायब तहसीलदार विकात पवार यांच्याकडे केली आहे. शेतकऱ्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागते शेतकऱ्यांचे सर्वात जास्त आत्महत्या महाराष्ट्रात होत आहे. तरी शेतकरी धान्य पिकवणे थांबवले नाही अशा शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करने गरजेचे आहे मात्र कृषी मंत्री कोकाटे यांनी शेतकऱ्या बद्दल अवहेलना अनादर व्यक्त केल्याने कृषी मंत्रयावर गुन्हा दाखल करावा, अशी लेखी मागणी लेखी निवेदनाद्वारे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने अक्कलकोट तहसिलदार यांच्याकडे केली आहे. यावेळी माजी उपप्रमुख श्रीशैल पाटील, मतलीनाथ खुबा, गंगाधर धोत्रे, अजय राठोड, गुजा मुस्कान, काझी सचिन जकापुरे, मिनाज कुरणे उपस्थित होते.



### चैतन्य मंदिरात श्रीरामनवमी साजरी

**करकंब, दि. ७ एप्रिल-**

श्री चैतन्य श्रीराम मंदिर सोमवार पेठ करकंब येथे प्रतिवर्षाप्रमाणे श्रीरामनवमी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.चैतन्य श्रीराम मंदिर हे सुमारे साठ वर्षांपूर्वीचे असून गेल्या अनेक वर्षांपासून गुढीपाडवा ते रामनवमी या काळात रामविजय ग्रंथाचे पारायण, परंपरागत भजनांचे आयोजन करण्यात येते. रामनवमी दिवशी पहाटे चैतन्य जपसंकुल क्र. एक करकंब यांचेवतीने काकडारती आणि विधिवत पूजा करुन पंचवीस तासांचा रामनाम जप आयोजित करण्यात आला होता. दुपारी दोन तास रामजन्मानिमित्त विविध प्रकारच्या भजन गायनानंतर पाळणा गायन होऊन प्रभू रामरायाचरणी पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी करकंब व करकंब पंचक्रोशीतील रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. रामनवमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्ञानेश्वर दुधाणे, दादा धोत्रे, विजय भागवत, धनंजय इदाते, सुरेंद्र इदाते, दत्तात्रय इदाते, संजीवकुमार म्हेत्रे, संतोष बुगड,सतीश दुधाणे, माऊली पिसे, कांतीलाल टकले, विश्वजीत शिंदे, प्रसाद दुधाणे, शिवम रणे, पृथ्वीराज धोत्रे आदींनी अधिक परिश्रम घेतले.



### जवाहर विद्यालयात चावडी वाचन

**अणदूर, दि. ७ एप्रिल-**

जवाहर विद्यालय, अणदूर यांच्या वतीने चावडी वाचन संपन्न झाले. चावडी वाचन कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी तर प्रमुख पाहुणे ग्रा. प. सदस्या स्नेहा मुळे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य अलका कुताडे, प्रतिभा मोकाशे, रामेश्वर कबाडे यांची उपस्थिती होती.विद्यालयाच्या वतीने प्रथमतः मान्यवरांचे पुष्प देऊन स्वागत केले. मुख्याध्यापक,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रा.प.सदस्य, शिक्षक-पालक सदस्य, पालक यांनी इयत्ता पाचवी तील विद्यार्थ्यांना वाचन व गणन, तोंडी उदाहरणे विचारली सर्व विद्यार्थ्यांनी समर्पक वाचन व उत्तरे दिली. लेखन कौशल्यातून पाच वाक्य लिहून दिले व ते उपस्थितांनी तपासून पाहिले. अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी यांनी निपुण भारत, निपुण महाराष्ट्र ही संकल्पना,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या ५ मार्च च्या परिपत्रकानुसार विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान कौशल्य विकसित करण्यासाठी राज्यात निपुण महाराष्ट्र अभियानांतर्गत कृती कार्यक्रम ३० जून पर्यंत राबविला जाणार आहे. या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना मराठी,गणित या सर्व क्रिया अपेक्षित असल्याची भावना मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

# अक्कलकोटमध्ये श्रीराम जन्मोत्सव समितीतर्फे शोभायात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ एप्रिल-**

श्रीराम जन्मोत्सव समितीमार्फत श्रीराम नवमीनिमित्त आज ग्रामदैवत मल्लिकार्जुन मंदिरापासून शोभायात्रा काढण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते श्रीरामाची आरती झाल्यानंतर शोभायात्रेस प्रारंभ झाला. शोभायात्रा शांततेत पार पडली. पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



मल्लिकार्जुन मंदिराजवळ व्यासपीठावर प्रभु श्रीरामाची मुर्ती प्रतिष्ठापना करण्यात आली होती. प्रारंभी हिंदु धर्मातील सर्व ज्ञाती संस्थांचे प्रमुख व सर्व समाज बंधु भगिनी,राजकीय,सामाजिक क्षेत्रातील सर्व प्रतिष्ठीत नागरिक यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. आमदार सचिन कल्याणशेट्टी, अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, वटवृक्ष देवस्थानचे प्रथमेश इंगळे,मिलन कल्याणशेट्टी, आनंद तानवडे, महेश हिंडोळे, आप्पासाहेब पाटील, मल्लिनाथ स्वामी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तालुका कार्यवाह चेतन जाधव,सहकार्यवाह संतोष वगाले आदींच्या हस्ते महारती करण्यात आली. महाआरतीनंतर शोभायात्रेला सुरुवात झाली. हलगी पथक, प्रत्येक समाजाचे दैवत, संत, महापुरुष यांचे प्रतिमा लावलेले रिक्षा पथक, लहान मुलांचे ध्वज पथक, महिला, पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावर्षीच्या शोभायात्रेत हनुमान, शंकर-पार्वती, प्रभू श्रीराम, गोमाता यांची आकर्षक मूर्ती सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. जय श्रीराम, भारतमाता की जय, वंदे मातरम्, हर हर म हादेव या घोषणांनी वातावरण राममय झाले होते. शोभायात्रा मल्लिकार्जुन मंदिरापासून सुरुवात होऊन शहरातील मुख्य मार्गावरुन जाऊन स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथील आई तुळजाभवानी मंदिरात समारोप करण्यात आला. अन्नछत्र शोभायात्रेत आ. सचिन कल्याणशेट्टी, आनंद तानवडे, यशवंत धोंगडे, महेश हिंडोळे, मिलन कल्याणशेट्टी, स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, वटवृक्ष देवस्थानचे प्रथमेश इंगळे, समाजसेवक तम्मामामा शेळके, चेतन जाधव, संतोष वगाले,रामु समाणे, प्रदिप हिंडोळे,श्रीराम जन्मोत्सव समितीचे ऋषीकेश लोणारी, राहुल वाडे, प्रसन्न गवंडी, सौरभ हाळके, धनराज पाटील,प्रितीश किलजे, देवा गवंडी, प्रशांत शिंपी, अभिजीत लोके, दत्ता कटारे, चंद्रकांत दसले, दयानंद बिडवे, श्रीकांत झिपरे, चंद्रकांत जकापुरे,संदीप कटकधोंड, समर्थ आडवितोटे,शिवराज तडवळ, शरणय्या मसुती उपस्थित होते. पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश बागाव, गोपनीयचे मारुती हनुरे, सचिन चव्हाण, राजकुमार कोळी आदींसह पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## श्री विठ्ठल-रुक्मिणी उद्यानाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ एप्रिल-**

तालुक्यातील भंडीशेगाव येथील ग्राम पंचायत मालकीच्या ४२ एकरावरील ड्रीम गार्डन येथे दोन एकर परिसरावरती सुसज्ज अशा श्री विठ्ठल-रुक्मिणी उद्यानाचे सुशोभीकरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. या श्री विठ्ठल रुक्मिणी उद्यानाचा शुभारंभ अवताडे शुगरचे जनरल मॅनेजर सुहास शिनगारे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संजय येलपले व मंगेश ननवरे उपस्थित होते.

श्री विठ्ठल रुक्मिणी उद्यानाबाबत माहिती देताना डॉक्टर श्रीधर येलमार यांनी सांगितले की, या उद्यानात दोन पाझर तलाव असून या पाझर तलावाचे गाळ काढून खोलीकरण करण्यात येणार आहे. जेणेकरून पाझर तलावाम ध्ये पाणी मोठ्या प्रमाणात साठवण करण्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न केला जाणार आहे. तसेच या पाझर तलाव परिसरात सुंदर असे पक्षांना आकर्षित करणारे वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे या परिसरातील नैसर्गिक रित्या अंतर्गत नागमोडी वळणांचे असणारे रस्त्यांचे देखील सुशोभीकरण करण्यात येणार आहे. या बरोबरच या उद्यानामध्ये श्री विठ्ठल रुक्मिणीच्या प्रतिकृती उभा करण्याचा देखील मानस असल्याचे हा प्रकल्प विकसीत करणार्या समितीचे सदस्य तथा कॅप्टन शामराव लोकरे अभ्यासिकेचे अध्यक्ष डॉ.श्रीधर यलमार यांनी यावेळी सांगितले.



**रक्तदात्याचा सन्मान**

विशेष म्हणजे याच कार्यक्रमात डॉ.अनिल कंडरे यांनी ८८ वेळा रक्तदान केल्याबद्दल यावेळी पंढरपूर येथील उद्योजक संजय येलपले यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

दरम्यान भंडीशेगाव येथे ग्रामपंचायत मालकीच्या ४२ एकर जागेवर ड्रीम गार्डनची निर्मिती ग्रामपंचायत व सोलापूर सोशल फाउंडेशन यांच्या सहकार्यातून सामाजिक वनीकरण यांनी सात वर्षांपूर्वी केलेली आहे. या ठिकाणी सतरा हजार पाचशे वृक्षांची लागवड करण्यात आली असून सामाजिक वनीकरणने सदर ड्रीम गार्डन हे ग्रामपंचायतकडे हस्तांतरित केले आहे.

कार्यक्रमास संजय येलपले, सुहास शिनगारे, वामन यलमार,संतोष करचे, रेखा चंद्रराव, सतीश चंद्रराव, माजी सरपंच संतोष ननवरे, गणेश पाटील,डॉ.अनिल कंडरे, बाबासाहेब येलमार,मारुती गिड्डे, महेंद्र येलपले, ज्ञानेश्वर पाटील,ज्ञानेश्वर गिड्डे,सतीश रणखांबे,अनिल जाधव,आनंद यलमार आदी उपस्थित होते.

## बार्शीच्या धम्म परिषदेला डॉ. बाबासाहेबांचे नातू भीमराव आंबेडकरांची उपस्थिती

**बार्शी, दि. ७ एप्रिल-**

बार्शी येथे १० मे रोजी होणाऱ्या बौद्ध धम्म परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू भीमराव यशवंत आंबेडकर उपस्थित राहणार आहेत. भीमराव आंबेडकर हे भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष व समता सैनिक दलाचे प्रमुख आहेत. बार्शीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर येऊन गेले होते.



या घटनेला १०० वर्ष पूर्ण झाले आहेत. १० मे १९२४ रोजी बार्शीमध्ये मुंबई प्रांतिक बहिष्कृत परिषदेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर आले होते. यावेळी त्यांनी नामांतर, देशांतर आणि धर्मांतर या विषयावर ऐतिहासिक भाषण केले होते. या शतकोत्तरी वर्षानिमित्त भारतीय बौद्ध महासभा, नालंदा स्तूप बुद्धीजम ॲण्ड रिसर्च ट्रस्टच्यावतीने दुसऱ्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या बौद्ध धम्मपरिषदेच्या कार्यक्रम प्रसंगी भीमराव यशवंत आंबेडकर यांना बार्शी नगरपरिषदेच्यावतीने मानपत्र दिले जाणार असल्याची माहिती भारतीय बौद्ध महासभेचे बार्शी तालुकाध्यक्ष सत्यजित जानराव, सामाजिक कार्यकर्ते ॲड. विवेक गजशिव यांनी सांगितले. यावेळी १ मे ते १० मे या कालावधीत श्रामणेर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बौद्ध धम्मपरिषद यशस्वी करण्यासाठी बौद्ध महासभा व समता सैनिक दलाचे रमेश पालके, विश्वास वाघमारे, प्रविण आखाडे, शंकर जाधव, पंडीत राजगुरु, सचिन पालके, किरण भालशंकर, सचिन जानराव, समाधान ननवरे, प्रसाद शिंदे, बाळासाहेब सरवदे, कल्पणा तुपेरे, पूजा रिकीबे, निर्मला वाघमारे, आरती सरवदे परिश्रम घेत आहेत.

## मोहोळ येथे शनिवारी मोफत आरोग्य निदान महाशिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ७ एप्रिल-**

गरजू रुग्णांना एकाच छताखाली उपचार मिळावेत म्हणून स्वातंत्र्यसेनानी संदिपान गायकवाड बहुउद्देशीय संस्था व रेड स्वस्तिक सोसायटीच्या समन्वयातून दि.१२ एप्रिल रोजी मोहोळ येथे आरोग्य निदान महाशिबिराचे आयोजन केले असल्याची माहिती मुख्य संयोजक डॉ. कौशिक गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दि. १२ एप्रिल रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत स्वातंत्र्यसेनानी संदिपान गायकवाड सभागृह, सोलापूर रोड, मोहोळ येथे विनामूल्य आरोग्यनिदान महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरामध्ये हृदय, मेंदू, मणका, यकृत, किडनी, अर्धांगवायू, ब्रेनस्ट्रोक, स्त्रीरोग, नेत्र, कृत्रिम अंग प्रत्यारोपण इत्यादी संदर्भातील सर्व गंभीर आजारांच्या तपासणी, उपचार व शस्त्रक्रिया यासह बीपी, शुगर, थायरॉइड, ई.सी.जी. व रक्ताच्या सर्व तपासण्या देखील विनामूल्य केल्या जाणार आहेत.

या शिबिरात रुग्णांच्या तपासणीसाठी पुणे येथील प्रसिद्ध जहांगीर हॉस्पिटल, निरामय पॅरालिसिस सेंटर, मॅक्सकेअर म ल्टीस्पेशल हॉस्पिटल, एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयाचे तज्ञ डॉक्टर फिजिओथेरपिस्ट उपस्थित राहणार आहेत. यात प्रामुख्याने जहांगीर हॉस्पिटलच्या सामाजिक सेवा विभागाचे प्रमुख व सिनिअर ऑनररी कन्सलटन्ट डॉ. अशोक बी. घोणे, डॉ. जे. एस. दुगल, डॉ. राम पाटील, डॉ. मंदार पाटील तसेच निरामय पॅरालिसिस सेंटर, पुणे चे वैद्य व पंचकर्म थेरपिस्ट डॉ. सुनिल साळवे व एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयाच्या नेत्र तपासणी केंद्र मोहोळच्या मंजिरी पाटील, मॅक्सकेअर मल्टीस्पेशल हॉस्पिटल, वैराग, जिल्हा सोलापूर चे स्त्रीरोग व प्रसुतीतज्ज्ञ डॉ. प्रविण मासाळ यांच्यासह नामवंत डॉक्टरांची उपस्थिती राहणार आहे.

महाआरोग्य निदान महाशिबिरात सर्व प्रकारच्या तपासणीसह प्राथमिक स्वरूपाची औषधी याप्रसंगी विनामूल्य उपलब्ध करून दिली जाणार आहेत. तसेच याच शिबिराच्या माध्यमातून कृत्रिम (हात पाय) अंग प्रत्यारोपण व पॅरालिसिस पेशंट निवासी उपचार देखील विनामूल्य करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेला राजेश खपाले, प्रवीण डोके, विजय कोकाटे आदी उपस्थित होते. या आरोग्यशिबिरा संदर्भात राकेश देशम ाने, शैलेश गावडे, अनिल नाईक, मुस्ताक शेख यांच्याशी संपर्क साधावा, असेही संयोजकांच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

## गिरिजात्मक गणेश मंदिरात रामनवमीचा उत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ एप्रिल-**

टाकळी रोड येथील गिरिजात्मक गणेश मंदिराम ध्ये रविवारी (ता.६) रामनवमीच्या निमित्ताने राम जन्मोत्सवाचा सोहळा अत्यंत उत्साहाने साजरा करण्यात आला.

श्रीरामाच्या मूर्तीचा अभिषेक करून रामनामाचा जयघोष करत राम जन्माचा उत्सव करण्यात आला. याप्रसंगी परिसरातील महिलांनी पाळणे गाऊन राम जन्माचा आनंद साजरा केला. कार्यक्रमानंतर सर्वांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.





## रामनवमीनिमित्त कुर्डुवाडीत शोभायात्रा अन् रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ७ एप्रिल-**

कुर्डूवाडी शहरात रामनवमी निमित्त माढा तालुका सकल हिंदू समजा कडून शोभयात्रा, मोटार सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीचे उद्घाटन रामायणाचार्य अक्षय महाराज शेळके यांच्या हस्ते करण्यात आले. शहरातील प्रमुख मार्गावरून मि रवणूक काढण्यात आली.

श्री रामनवमी निम्मित संपूर्ण म ाढा तालुक्यातील राम भक्तांनी एकत्र येवून रॅली काढली होती. शहर व परिसर जय श्रीरामाच्या जय घोषाने दुमदुमले होते. या शोभा यात्रेत हजारो युवक भगवे झंडे, पंचे, भगव्या टोपी परिधान करून सहभागी झाले होते. त्यामुळे संपर्ण वातावरण भगवेमय झाले होते. नागरिकांनी या रॅलीवर शहरात ठिकठिकाणी पुष्पवृष्टी केली. अनेक ठिकाणी रांगोळ्या काढून या शोभायात्रेचे स्वगत करण्यात आले. शहरात यावर्षी ही संगीत श्री रामकथा ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन ही केले होते. महात्मा गांधी चौक या ठिकाणी भव्य श्रीराम प्रतिमा उभारून तिचे पूजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज शाळा क्रमांक १ या ठिकाणी रामप्रसाद व नगर भोजन व्यवस्था करण्यात आली होती. दरम्यान हिंदू देवलय श्रीराम मंदिरच्या वतीने हभप विनायक कुलकर्णी यांचे नारदी कीर्तन आयोजित करण्यात आले होते.

# 'आदिनाथ' ला आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी कटिबद्ध

## खासदार धैर्यशील मोहिते-पाटील; आदिनाथ कारखाना 'संजिवनी पॅनल'च्या प्रचाराचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ७ एप्रिल-**

आदिनाथला आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगत आदिनाथला उर्जीत अवस्थेत आणण्यासाठी केंद्र व राज्य स्तरावरील नेतेमंडळीची भेट घेण्यास आपण कमी पडणार नसल्याची ग्वाही माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी दिली. संगोबा ता. करमाळा येथील सभेत ते बोलत होते. श्री आदिनाथ कारखाना संजिवनी पॅनल'च्या प्रचाराचा नारळ आज फोडण्यत आला. संगोबा येथील श्री आदिनाथ महाराजांचे दर्शन घेऊन प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार जयवंतराव जगताप, विद्यमान आमदार नारायण आबा पाटील, सावंत गटाचे नेते सुनील सावंत, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष अनिरुद्ध कांबळे, जिल्हा दुध संघ माजी उपाध्यक्ष राजेंद्रसिंह राजेभोसले,सभापती अतुलभाऊ पाटील, जि प सदस्या सौ. सवितादेवी राजेभोसले, आदिनाथ माजी संचालक धुळाभाऊ कोकरे, माजी सभापती गहिनीनाथ ननवरे, डॉ वसंत पुंडे, प्राचार्य जयप्रकाश बिले, राष्ट्रवादी तालूकाध्यक्ष संतोष वारे, विकास गलांडे, नगरसेवक संजय सावंत, अल्ताफ तांबोळी, जि प सदस्य बिभीषण आवटे, जालिंदर पानसरे, जि प सदस्य अरुण तोडकर (माळशिरस), माजी उपसभापती संजय जाधव, भाऊसाहेब फुके, डॉ समाधान कोळेकर, आदिसह सर्व उमेदवार उपस्थित होते. यावेळी बोलताना खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी आपल्या भाषणातून आदिनाथ कारखान्याच्या इतिहासास उजळणी दिली.




कारखान्याच्या चालू आर्थिक स्थितीबद्दल सभासदांना माहिती देऊन आगामी काळात आपण या कारखान्याच्या शासनस्तरावर असलेल्या अडचणी सोडवण्यासाठी अविरत प्रयत्न करणार असल्याचे सांगुन या पॅनेलमधील सर्व उम ेवारांना निवडून देण्याचे आवाहन केले. तर माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी आपल्या भाषणातून विरोधकांचा खास आपल्या शैलीत समाचार घेतला.

आदिनाथ कारखान्याच्या या निवडणुकीत नव्या उमेदीचे उमेदवार या पॅनलमधून निवडणुक रिंगणात उतरले असुन या युवाशक्तीच्या उर्जेचा उपयोग आदिनाथला उर्जित अवस्थेत आणण्यासाठी निश्चित होणार असल्याची खात्री त्यांनी बोलून दाखवली. तसेच देशभक्त स्वातंत्र्य सैनिक माजी आमदार नामदेवराव जगताप व सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील हे नेहमीच जिल्हा विकासाच्या मुद्यावर मतभेद सोडुन एकत्र येत असल्याची आठवण करुन देऊन तालूक्यातील गावोगाव आता गटतट बाजुला सारुन आदिनाथ वाचवण्यासाठी मतदारांनी या पॅनलच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचे आवाहन माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी केले. तर विद्यम ान आमदार नारायण आबा पाटील यांनी या कारखान्याच्या उभारणीसाठी कर्मयोगी गोविंद बापू पाटील यांनी खुप मोठा त्याग केला असुन हा कारखाना आमच्यासाठी कुटुंबातील एका घटका समान असल्याचे सांगितले.तसेच आदिनाथ साठी आपण आमदार पदाची ताकद यामागे लावणार असून वेळप्रसंगी कोणतीही राजकीय ताकद पणाला लावण्याची आपली तयारी असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले. प्रास्ताविक आमदार पाटील गटाचे प्रवक्ते सुनील तळेकर यांनी केले. तर यावेळी देवानंद बागल व सुनील सावंत यांनी विचार मांडले. सुत्रसंचलन डॉ समाधान कोळेकर यांनी केले तर आभार डॉ अमोल घाडगे व रविकिरण फुके यांनी मानले. विधीज्ञ राहुल सावंत यांनी मान्यवरांचे स्वागत केले. या सभेस मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या

### अशोक कामटे संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ७ एप्रिल-**

लोकशाहीतील सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन केल्या. सध्या त्याच सभागृहाच्या निवडणुका लांबणीवर चाललेले आहेत. तरी निवडणुका लवकरात लवकर घ्या या मागणीचे निवेदन शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने सोलापूरचे जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. यावेळी कामटे संघटनेचे सदस्य, पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्हा परिषद, तालुका पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकांपर्यंत लोक कल्याणकारी विकासात्मक योजना राबविणारे सभागृह म्हणून ओळख हीच आजतागायत राहिलेली आहे. सध्या या पातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना त्यांचा कार्यक्षमतेनुसार संधी वेळेत मिळणे अपेक्षित असताना यांचा उपयोग फक्त विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीसाठी होत आहे. स्थानीक स्वराज संस्था या कार्यकर्ता घडवणारे सभागृह असेल तर मग गेली जवळपास चार ते पाच वर्षे सभागृह विना लोकप्रतिनिधींचे का ? स्थानिक स्वराज्य संस्था अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्यामधील लोकप्रतिनिधी असणे म्हणजे लोकशाहीतील सत्तेचे विकेंद्रीकरण झाले असे आहे. तरी लवकरात लवकर निवडणुका घ्या, यासाठी आपणाकडे (जिल्हाधिकारी) अशोक कामटे संघटनेचे निवेदन सादर करीत आहेत तरी ते निवेदन माननीय महामहीम राष्ट्रपती, भारतीय निवडणूक आयोग महोदयांकडे पाठवावी अशी मागणी शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे.

## महत्वाचे...



### राज्यस्तरीय पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत गणपती फार्मसी कॉलेजचे यश

**टेंभूर्णी, दि. ७ एप्रिल-**

सरस्वती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी तोंडवली, कणकवली येथे फार्मास्युटिकल सायन्सेसवरील राज्यस्तरीय पोस्टर स्पर्धा आयोजित केली होती, ज्यामध्ये महाराष्ट्रातील विविध फार्मसी कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना फार्मास्युटिकल सायन्सेस क्षेत्रातील त्यांचे संशोधन, नाविन्यपूर्ण कल्पना आणि तांत्रिक ज्ञान प्रदर्शित करण्यासाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ उपलब्ध झाले. यात टेंभुर्णी येथील श्री गणपती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्चच्या विद्यार्थ्यांनी उस्फुर्त असा सहभाग नोंदवला. दुसऱ्या वर्षाचे विद्यार्थी अनिकेत गायकवाड आणि जीवन गावडे यांनी पोस्टर प्रेझेंटेशन प्रकारात तिसरे पारितोषिक जिंकले. औषधी वनस्पतींच्या वापरावरील त्यांच्या संशोधनात दाखवलेल्या विश्लेषणाची खोली आणि सर्जनशील दृष्टिकोन पाहून परीक्षक प्रभावित झाले. ही स्पर्धा औषधनिर्माणशास्त्राच्या क्षेत्रात संशोधनाची महत्त्वाची भूमिका आणि विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रमाला चालना देण्याचे महत्त्व याची आठवण करून देणारी ठरली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रुपाली बेंदगुडे, सचिव डॉ. आर. डी. बेंदगुडे अध्यक्ष ॲड. विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले. स्पर्धेसाठी प्रा. सोनाली तांबवे आणि प्रा. शैलेश पेंदोर यांनी मार्गदर्शन केले.

### सांगोल्यातील श्री व सौ. तांबोळी आदर्श माता-पिता पुरस्काराने सन्मानित

**सांगोला, दि. ७ एप्रिल-**

सांगोला येथील फिरोज तांबोळी व तैय्यबा तांबोळी या दाम्पत्याचा तुफान क्रांतीतर्फे राज्यस्तरीय आदर्श माता-पिता पुरस्काराने गौरव करण्यात आला. समाजात आदर्श कुटुंब मूल्यांची जोपासना करणाऱ्या व आपल्या मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन सुजाण नागरिक म्हणून घडवणाऱ्या दाम्पत्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने हा पुरस्कार दिला जातो. तैय्यबा आणि फिरोज तांबोळी यांनी त्यांच्या मुलाच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न, तसेच सामाजिक कार्यात घेतलेला सक्रिय सहभाग ही बाब तुफान क्रांतीने विशेषत्वाने लक्षात घेतली. त्यांच्या या सन्मानाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.




### पंढरपूरची लेक अनिता जोशी यांचे पुण्यात प्रवचन संपन्न

**पंढरपूर, दि. ७ एप्रिल-**

साईनाथ मंडळ ट्रस्ट बुधवार पेठ रंगारी गणपती शेजारी पुणे येथे चैतन्य भाषा प्रसार मंडळाच्या संस्थापक अध्यक्ष व संस्कृत पंडित अनिता बल्लाळ जोशी यांचे रामनवमीनिमित्त रविवारी (ता.६) सुमधुर, अभ्यासपूर्ण आणि अत्यंत वर्णनीय असे प्रवचन झाले. विशेष म्हणजे पुण्यात प्रवचन देणाऱ्या अनिता जोशी यांचे माहेर पंढरपूर आहे. त्यांनी आपले सर्व शिक्षण पंढरपूर मध्येच पूर्ण केले. संस्कृत पंडित होवून पंढरपूरची लेक विद्येचे माहेरघर असणाऱ्या पुण्यात प्रवचने सादर करते ही पंढरपूरकरांसाठी विशेष गौरवास्पद बाब आहे. दरम्यान पुणे येथील श्री साई मित्र मंडळाने गेली सतरा वर्षे राम नवमी उत्सव, साई भंडारा असे विविध कार्यक्रमांतर्गत अनेक कार्यक्रम घेत आहे. गेली दोन वर्षे अनिता जोशी या इथे राम जन्म प्रवचनाची सेवा देत आहेत. साई मित्र मंडळाचे अध्यक्ष पियुष शहा व त्यांच्या सौभाग्यवती आणि मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी प्रवचनाच्या कार्यक्रमानंतर त्यांचा यथोचित सत्कार देखील केला.



### प्राजक्ता महाडिकची पंजाब नॅशनल बँकेत अधिकारी पदावर निवड

**मोहोळ, दि. ७ एप्रिल-**

मोहोळ तालुक्यातील मौजे अंकोली येथील भैरवनाथ विद्यालयातील माजी विद्यार्थिनी प्राजक्ता लिंबाजी महाडिक हिची पंजाब नॅशनल बँकेच्या अधिकारी पदी नुकतीच निवड झाली आहे. बँकिंग कार्मिक निवड संस्था म्हणजे आय. बी. पी. एस. कडून झालेल्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून त्यामध्ये प्राजक्ता लिंबाजी महाडिक हिची अँग्रीकल्चर फील्ड ऑफिसर म्हणून पंजाब नॅशनल बँकेत निवड झाली आहे. तिचे वडील प्राथमिक शिक्षक आहेत. प्राजक्ताचे माध्यमिक शिक्षण भैरवनाथ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,अंकोली येथे झाले आहे. गणित विषयात निपुण असल्याने ही परीक्षा उत्तीर्ण होऊ शकली, असे तिचे मत आहे. अंकोली व परिसरातून तिचे कौतुक होत आहे. येथील भैरवनाथ विद्यालयातील या दोन वर्षात १२ माजी विद्यार्थी अधिकारी म्हणून वेगवेगळ्या क्षेत्रात निवडले आहेत.



# चैत्री यात्रेसाठी दोन लाख बुंदी लाडूचा प्रसाद तयार

## कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके : एकादशीसाठी ६० हजार राजगिरा लाडूची निर्मिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ एप्रिल -**

चैत्री, आषाढी, कार्तिकी व माघी अशा चार मुख्य यात्रा पंढरपूर येथे होतात. उद्या दि.८ एप्रिल रोजी चैत्री यात्रा असून त्यानिमित्त पंढरपूरात येणाऱ्या भाविकांना श्रींचा प्रसाद पुरेशा प्रमाणात उपलब्ध होण्यासाठी मंदिर समितीमार्फत दोन लाख बुंदीचे व ६० हजार राजगिऱ्याचे लाडू तयार केल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.



आज दशमीदिवशीच भाविकांची दर्शन रांगेत व मंदिर परिसरात मोठी गर्दी आहे. उद्या भाविकांची संख्या वाढणार आहे. पवित्र एकादशीदिवशी श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनानंतर भाविक श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी व राजगिरा लाडू खरेदी करतात. त्यादृष्टीने सहा लाख बुंदी लाडू व ६० हजार राजगिरा लाडू तयार करण्यात आले आहेत. यामध्ये बुंदी लाडू प्रसाद मंदिर समितीमार्फत व राजगिरा लाडू प्रसाद आऊटसोर्सिंग पद्धतीने खरेदी करण्यात येत आहे. ७० ग्रॅम वजनाचे दोन बुंदी लाडू कागदी पिशवीत पॅकिंग करून प्रति पाकीट २० रुपये प्रमाणे व २५ ग्रॅम वजनाचे दोन राजगिरा लाडू पॅकिंग करून प्रति पाकीट १० रुपये प्रमाणे भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यासाठी पश्चिम द्वार, उत्तर द्वार, श्री संत तुकाराम भवन असे एकूण तीन स्टॉल असून, सर्व स्टॉल सकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत खुले ठेवण्यात येत आहेत. बुंदी लाडू प्रसाद एमटीडीसी भक्तनिवास येथील लाडू उत्पादन केंद्रामध्ये हरभरा डाळ, साखर, शेंगदाणा डबल रिफाइंड तेल, काजू, बेदाणा, विलायची इत्यादी पदार्था पासून तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या सर्व नियमांचे पालन करून तयार करण्यात येत आहे. या लाडू प्रसादाची शासकीय प्रयोगशाळेतून खाण्यास योग्य असल्याबाबत तपासणी करून घेण्यात आली आहे. बुंदी व राजगिरा लाडू प्रसाद व्यवस्थेची जबाबदारी अनुभवी विभाग प्रमुख भीमाशंकर सारवाडकर यांना देण्यात आली आहे, याशिवाय सुमारे ९० कर्मचारी परिश्रम घेत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

## बाभळगाव येथे गुरूवारी होणार गुणवंतांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर,दि.७ एप्रिल-**

बाभळगाव (ता.तुळजापूर) ये़थे गुरुवारी १० एप्रिल रोजी ग्रामस्थांच्या वतीने सेवानिवृत्त शिक्षक, देशसेवा व पोलीस खात्यासह शासकिय कर्मचारी, वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर्स. विधीज्ञ अशा विविध क्षेत्रातील गुणवंतांचा गौरव करण्यात येणार आहे. बाभळगाव ग्रामस्थांनी याचे आयोजन केले असल्याचे गौरव सन्मान सोहळा समितीचे अध्यक्ष संभाजीराजे पाटील, सदस्य डॉ संतोष पवार यांनी सांगितले.

अध्यक्षस्थानी जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ उमाकांत चनशेट्टी तर प्रमुख पाहुणे म्हणून धाराशिव जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सतिश हरिदास, सेवानिवृत्त तहसिलदार चंद्रकांत शिंदे, लातुर येथील युवा सिंगर विजेता महाराष्ट्र राज्य शिवशाहीर संतोष साळुंके, सोलापूर येथील अपोलो फर्टीलिटीच्या सचिवा डॉ किर्ती कटारे, नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन यादव, कवी प्रा डॉ अरविंद हंगरगेकर, सरपंच सुरेखाताई कांबळे, उपसरपंच पल्लवी चव्हाण यांची उपस्थिती आहे. यावेळी सेवानिवृत्त प्रा देवदत्त पाटील, दत्तात्रय कांबळे, राम चव्हाण, ज्ञानेश्वर महाबोले, डॉ विष्णु सातपुते, डॉ अभिषेक पाटील, डॉ अभिनंदन काळुंके, डॉ प्राजक्ता पाटील, विधिज्ञ ॲड किशोर पाटील, उत्कृष्ट प्रशासकीय सेवेबद्दल अविनाश धरणे तर पोलीस खात्यातील अक्षय जाधव या गुणवंताचा सन्मान करण्यात येणार आहे.

## आंदोलनापूर्वीच लेखी आश्वासनामुळे मिटला प्रश्न

### निंभोरेचे सरपंच रवींद्र वळेकर यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.७ एप्रिल-**

कुकडी डावा कालवा उपविभाग क्र.१२ चे उपअभियंता राजगुरु साहेब यांनी दहिगाव उपसा सिंचन योजनेचे सुरू असलेले उन्हाळी आवर्तन सोडण्यासाठी येत असणाऱ्या अडचणी दूर करण्यात यश आले असून आज (दि.६) सायंकाळी ६ वाजले पासून टेल भागामध्ये पाणी दिले जाईल असे लेखी निवेदन दिल्यामुळे उद्या करमाळा कुर्डूवाडी रस्त्यावरती होणारे रास्ता रोको आंदोलन स्थगित केले आहे याची नोंद टेल भागातील निंभोरे ,घोटी, मलवडी, साडे, वरकुटे या गावातील शेतकऱ्यांनी घ्यावी अशी माहिती निंभोरे गावचे लोकनेते सरपंच रवींद्र वळेकर यांनी दिली आहे.




योजनेच्या लाभक्षेत्रामध्ये नसलेल्या गावांना सर्रास पाणी दिले जात आहे. टेल भागातील लव्हे, निंभोरे ,घोटी इत्यादी गावांना पाणी सोडण्यास टाळाटाळ केली जात आहे असा आरोप करत जर दि.६ एप्रिल २०२५ पर्यंत टेल भागातील आमच्या गावांना पाणी सोडले नाही तर दि.७ एप्रिल २०२५ रोजी आम्ही करमाळा कुर्डूवाडी रस्त्यावरती रास्ता रोको आंदोलन करू असा इशारा वळेकर यांनी दिला होता. आंदोलन करण्यापूर्वीच त्यांना यश आले आहे. त्यामुळे दहिगाव उपसा सिंचन योजने च्या टेल भागातील शेतकरी सरपंच रवींद्र वळेकर यांचे आभार व्यक्त करत आहेत.

## शेतकरी कर्जमाफीसाठी आमदारांच्या घरासमोर शुक्रवारी मशाल आंदोलन

### प्रहारतर्फे रात्री १२ वाजता शेतकरी पेटवणार मशाली

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.७ एप्रिल-**

सरकारने आश्वासन देऊनही शेतकऱ्यांच्या कर्जमाफी मुद्यावरून घुमजाव केले. अशा विश्वासघातकी सरकारला वठणीवर आणण्यासाठी शुक्रवारी ११ एप्रिलच्या रात्री १२ वाजता राज्यभर सर्व आमदारांच्या घरासमोर मशाली पेटवून आंदोलनाचा इशारा माजी आमदार तथा प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी दिला आहे.




याबाबतचे निवेदन प्रहार संघटनेचे तालुका अध्यक्ष संदीप तळेकर, तालुका उपाध्यक्ष पप्पू ढवळे, प्रहार संघटनेचे इतर पदाधिकारी यांनी करमाळा पोलीस स्टेशनमध्ये दिले. यावेळी अनेक पदाधिकारी उपस्थित होते. या आंदोलनाला मुर्त रूप देण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाची ३० मार्चला एक राज्यस्तरीय बैठक झाली. या बैठकीत पक्ष संघटनावाढीसोबत मशाल आंदोलनावर चर्चा करण्यात आली. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांनी याबाबत संपूर्ण महाराष्ट्रभर आंदोलन पुकारले असून त्यानुसार संपूर्ण महाराष्ट्रभर हे आंदोलन करणार असल्याची माहिती प्रहार संघटनेचे तालुका अध्यक्ष संदीप तळेकर यांनी दिली. या बैठकीला राज्यभरातील प्रमुख नेते, पदाधिकारी, सर्व जिल्हा प्रमुख व तालुका प्रमुख उपस्थितीत होते. शेतकऱ्यांच्या कर्जमाफी आंदोलनाचा पहिल्या टप्प्यात महात्मा फुले यांचे जयंतीचे औचित्य साधून ११ एप्रिलला रात्री राज्यातील प्रत्येक आमदारांच्या घरासमोर मशाली पेटवून आंदोलन करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. विधानसभा निवडणुकीच्या वेळेला महायुतीच्या नेत्यांनी, शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणार असल्याचे जाहीर केले होते. या आश्वासनामुळे शेतकऱ्यांनी महायुतीला भरभरून मतदान करून एकहाती सत्ता दिली. मात्र सत्ता हाती येताच राज्याच्या अर्थमत्र्यांनी पुढील तीन वर्ष तरी, शेतकऱ्यांची कर्जमाफी शक्य नाही असे सांगुन विश्वासघात केला आहे. त्यामुळे राज्यभरातील शेतकऱ्यांमध्ये राज्य सरकारच्या विरोधात असंतोष निर्माण झाला आहे. त्याचीच दखल घेऊन माजी आमदार बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सरकार विरोधात आंदोलनाचा शंखनाद केला. गुढीपाडव्याला झालेल्या प्रहारच्या या बैठकीत महायुती सरकारच्या विश्वासघातकी प्रवृत्तीविरोधात प्रहार जनशक्ती पक्षाकडून मशाल आंदोलन करण्याचे ठरले आहे.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसोबत शेतीसंबंधी इतरही प्रश्नावर राज्यव्यापी आंदोलन करण्याचा निर्णयही घेण्यात आला. यात शेतकऱ्यांचा वाढता उत्पादन खर्च कमी व्हावा यासाठी शेतीची मजूरांकरवी होणारी सर्व कामे रोजगार हमी योजनेअंतर्गत शासनाव्दारे करण्यात यावी. ही पूर्वीची मागणी रेटून धरण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. या आंदोलनाची रुपरेषा आखण्याकरिता बच्चु कडू यांनी मुंबई गाठली असल्याची माहीती आहे.

## स्वातंत्र्य सैनिकाच्या बोगस प्रमाणपत्राद्वारे दोन शिक्षकांनी नोकरी मिळविली

### शिक्षकांवर कारवाई करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

माजी स्वातंत्र्य सैनिकाच्या यादीत नाव नसताना बोगस प्रमाणपत्र सादर करून जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात दोघा शिक्षकांनी नोकरी मिळवल्याची तक्रार शरद धर्मा गायकवाड, (रा. कामती (बु) ता. मोहोळ यांनी पुण्याच्या विभागीय आयुक्तांकडे केली आहे.

विजयकुमार बसवणप्पा गुंडद व राजशेखर धानप्पा गोब्बुर अशी त्या दोन शिक्षकांची नावे आहेत. या दोन शिक्षकांनी अनुक्रमे २ नोव्हेंबर ९३ व १२ ऑक्टोबर ९२ला हंगामी स्वरूपात शिक्षक म्हणून जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात नियुक्ती मिळवली. स्वातंत्र्यसैनिक पाल्याच्या कोटयातून त्यांनी ही नोकरी मिळवली. त्यांनी स्वातंत्र्यसैनिकाचे बोगस प्रमाणपत्र सादर करून नियुक्ती मिळवल्याची गायकवाड यांनी तक्रार केली आहे. या दोघांनी स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असल्याचे बोगस प्रमाणपत्र सादर केल्याचा संशय आल्यावरून गायकवाड यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात माहितीच्या अधिकारात स्वातंत्र्यसैनिकाची यादी मागितली. दोन्ही शिक्षकांची कागदपत्रे, सेवा पुस्तक तपासले असता त्यामध्ये स्वातंत्र्य सैनिक पाल्य म्हणून सेवेत नियुक्त नोंद आहे. परंतु जिल्हाधिकारी कार्यालयाकडे माजी स्वातंत्र्य सैनिक यांची रितसर यादी मागणी केली असता या यादीत गुंडद, गोब्बुर (दोघे रा. मैदर्गी, ता. अक्कलकोट) या दोघांचे नांव दिसून येत नाही. या दोन्ही शिक्षकांनी शासनाची फसवणूक करून बोगस सर्टीफिकेट सादर करून नोकरी मिळवली व ते कार्यरत आहेत, असे गायकवाड यांच्या तक्रारीत नमूद आहे.

> **जिल्हा परीषदेसमोर उपोषण करणार**
>
> संबंधित दोन्ही शिक्षकांवर खातेनिहाय चौकशी करून व बडतर्फ करून संबंधितांवर फौजदारी कारवाई करावे. त्यांनी घेतलेले वेतन वसूल करावे , अन्यथा जिल्हा परीषदेसमोर उपोषण करणार आहे.
>
> **- शरद गायकवाड, तक्रारदार**

## वेळापुरात शतायुषी नागरिकांचा सन्मान; आनंदमूर्ती सेवा मंडळाचा उपक्रम

### 100 वर्षे पूर्ण केलेल्या पाच जणांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**अकलूज, दि. ७ एप्रिल -**

जागतिक आरोग्य दिनानिमित्त वेळापूर (ता. माळशिरस) येथील श्री आनंदमूर्ती सेवा मंडळातर्फे वेळापूर परिसरातील १०० वर्षे पूर्ण केलेल्या जगन्नाथ सुळे, शंकर उरणे, विठ्ठल तुपे, बायडाबाई चंदनशिव व सुभद्राबाई बनकर या पाच शतायुषी नागरिकांचा आनंदमूर्ती जीवन गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला.



नाथ सांप्रदायातील महान योगी प.पू. सदगुरु डॉ. भाईनाथ महाराज कारखानीस यांची प्रतिमा, पूर्ण पोषाख, फेटा, शाल, श्रीफळ व पुष्पहार असे पुरस्काराचे स्वरूप होते. श्री आनंदमूर्ती सेवा मंडळाच्या वतीने नंदकुमार होडगे, सूर्यकांत भिसे, धनंजय माने देशमुख, संजय उरणे यांनी या सन्मान सोहळ्याचे आयोजन केले होते. सन्मानार्थीमधील जगन्नाथ सुळे यांचे वय ११० वर्षे पूर्ण आहे. त्यांनी इंग्रज काळात १९३२ साली बांधलेल्या भाटघर धरणावरील नीरा उजवा कालवा खोदाईचे काम केले आहे. शंकर उरणे हे जिल्हा परिषद शाळेत शिक्षक होते. त्यांचे वय १०० असून ते म्हणाले, पूर्वी इंग्रज काळात टपाल व्यवस्था ही घोड्यावरून असायची. माळशिरस डाक बंगल्यावर पुण्यावरून पत्र यायचे नंतर पंढरपूरपर्यंत घोड्यावरून टपाल वाटले जायचे.विठ्ठल तुपे हे १०३ वर्षाचे शेतकरी म्हणाले, ३०० रुपयाला बैल विकून दोन एकर शेती घेतली. नुकताच नीरा उजवा कालवा सुरू झाला होता. त्यावर शेती पिकवत असे. तो काळ सुखाचा , समृद्धीचा होता. बायडाबाई चंदनशिव या १०४ वर्षाच्या आजी म्हणाल्या पूर्वी व्यवहार पैशावर चालत नव्हते. धान्य देवून किराणा सामान, कापड खरेदी केले जात होते. आज ३२ नातवंडे व परतूंडे घरात आहेत. घर कस गोकुळ झालं आहे. श्रीमती सुभद्राबाई बनकर या १०५ वर्षाच्या आजी म्हणाल्या आज घरात म्हातारं माणूस म्हणजे जीवाला घोर समजला जातो. पण माझ्या मुलांवर, सुनांवर चांगले संस्कार झाल्याने ते माझी चांगली काळजी करतात.

मी आनंदात आहे. या सन्मान सोहळ्याचे निमित्ताने शतायुषी झालेल्या या मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले. नंदकुमार होडगे म्हणाले, घरातील वयोवृद्ध व्यक्ती ही अडचण नसून तेच मोठे धन आहे . ग्रामीण भागात अजूनही या धनाचे रक्षण केले जाते ही मोठी समाधानाची बाब आहे.